म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिल्हा
सं. क्र.

REFBK-0000661

সি০৭০০

REFBK-0000661

सं. नि. ३०८

वा. भा. ६६१

# भूतपिशाच्च निर्णय

हें पुस्तक
गुजरात वर्नाक्युलर सोसाईटीनें गुजराती
भाषेंत छापिलेल्या मूळ ' भूतनिबंध '
पुस्तकाचें मराठी भाषांतर आहे.

मराठींत तयार करणार
**गोविंद मोरोबा कालेकर**

—o—

मुंबईंत
' विश्वंभर ' छापखान्यांत छापिलें.
शके १८३३—सन १९११

( या मराठी पुस्तकासंबधी सर्व हक्क कालेकर
यांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १२ आणे.

# अनुक्रमणिका.

| प्रकरण | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | भ्रम उत्पत्तिचा दृष्टांत | १ |
| २ | हिंदुशास्त्रांतील भूतांविषयींची कल्पना .... | ९ |
| ३ | भूतांची स्थानें व पराक्रम | १४ |
| ४ | जैन शास्त्रांतील भूतांविषयींची कल्पना .... | १६ |
| ५ | खोट्या भूतांची हकीगत | १९ |
| ६ | झालाच्या ग्रंथांतील भूताची गोष्ट .... .... | २२ |
| ७ | मिथ्या भूतांचे पराक्रम | २४ |
| ८ | सर्परूपी भूताची कल्पना | २८ |
| ९ | धनावर राहणाऱ्या सर्पाची गोष्ट .... .... | ३० |
| १० | भूत खेळण्याचे प्रकार | ३० |
| ११ | खिजडीया मामाची गोष्ट | ३४ |
| १२ | चिथरिया मामाची गोष्ट | ३६ |
| १३ | डाकिणीची गोष्ट | ३ |
| १४ | दांतागांवच्या डाकिणीची गोष्ट .... .... | ४ |
| १५ | पहिल्या विभागाचा सारांश | ४ |
| १६ | अधोगतीस गेलेल्या ब्रा[h]णाची गोष्ट .... | |
| १७ | काशीस जाणारा भूत झाला .... .... | |
| १८ | दोन मार्जाररूपी भूतांच[ी] गोष्ट .... .... | |
| १९ | गुजरात्याच्या हिंमतीचा दृष्टांत .... .... | |
| २० | तापी हौदावरील भूतावळ | |
| २१ | सरडा पोटांत शिरल्याचा भ्रम .... .... | |
| २२ | लिंबांत भूत उतरणें | |
| २३ | खिजडीया मामाचें त्रिलगणें | |
| २४ | भूतासंबंधी दंतकथा | |
| २५ | चंडीपाठाचा ( सप्तशतीच[ा] ) उपाय .... .... | |

| करण | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ६ | भूतानें सांगितलेला उपाय | ८२ |
| ७ | भूतबाधेच्या पाळणुकीचे प्रकार .... .... | ८४ |
| ८ | त्रिपिंडी श्राद्धाचें कारण | ८६ |
| ९ | श्रावक लोकांची गोष्ट | ८७ |
| ० | प्रेतपुतळी विधान क्रिया | ९२ |
| १ | चंडीपाठाखेरीज भूत काढण्याचे दुसरे उपाय .... | ९५ |
| २ | पंचाक्षऱ्याची गोष्ट | ९८ |
| ३३ | पंचाक्षऱ्यांचे उपाय | १०० |
| ३४ | भूत घालविण्याचे मुसलमानी उपाय .... .... | १०२ |
| ३५ | भूत घालविण्याचे वैद्यकीय उपाय .... .... | १०४ |
| ६ | भूत काढण्याचे ज्योतिषी उपाय .... .... | १०६ |
| ७ | तिसऱ्या विभागाचा सारांश .... .... | १०९ |
| ३८ | भ्रम उत्पत्तिचा विस्तार | १११ |
| ३९ | मारण मंत्र .... | ११२ |
| ० | मोहन मंत्र .... | ११४ |
| ४१ | भ्रमशोधन विस्तार | ११६ |
| ४२ | अपशकून .... | ११९ |
| ४३ | भ्रमछेदन उपाय | १२१ |
| ४४ | दृष्ट न लागण्याचे उपाय | १२६ |
| ४५ | वस्तूंस दृष्ट न लागण्याचे उपाय .... .... | १२७ |
| ४६ | दृष्टीचा उतारा .... | १२९ |
| ४७ | दृष्ट काढण्याचा प्रकार | १३० |
| ४८ | अंगावर ˜थ फिरण्याचा प्रकार .. .... | १३२ |
| ४९ | देवींचा रोग | १३४ |
| ५० | हनुमन्नाटकाची गोष्ट | १३८ |
| ५१ | अस्सल भूतांविषयीं गोष्ट | १४० |
| ५२ | भूतें कमी होण्याचें कारण | १४४ |
| ५३ | इष्ट कार्य सिद्धीसाठीं कित्येक तोडगे. .... | १४७ |
| ५४ | भूतांच्या अस्तित्वाचें कारण .... | १५० |
| ५५ | ग्रंथाचा सारांश | १५३ |

# मराठी भाषांतर कर्त्यांचा उद्देश.

गुजराती भाषेंत ग्रंथ प्रसार करण्याच्या स्तुत्य उद्देशानें अमदाबाद येथें, गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी या नांवाची एक संस्था बऱ्याच वर्षांपासून स्थापन झाली असून, या मंडळीनें बक्षिसें लावून व ग्रंथ-कारांस उत्तेजन देऊन गुजराती भाषेंत अनेक विषयांवर आजपर्यंत शेकडों ग्रंथ प्रसिद्ध केले व करित आहे. या मंडळीनें संवत् १९०९, सालीं ' भूत पिशाच्च निर्णय ' यासंबंधी उत्तम ग्रंथ लिहिणारास १५० रुपये बक्षिस देण्याचें जाहिर केल्यावरून त्या वेळचे प्रसिद्ध कवी दलपतराम डाह्याभाई यांनीं प्रथम गुजराती भाषेंत **'भूत निबंध'**हा ग्रंथ तयार केला. तो सदर सोसायटीस पसंत पडल्यामुळें ग्रंथकर्त्यास १५० रुपये बक्षिस देऊन तो ग्रथ मंडळीनें छापिला. तो इतका लोकप्रिय झाला कीं, गुजराथी भाषेंत त्याच्या आजपर्यंत ५ आवृत्ति छापिल्या गेल्या. शिवाय आग्रा येथील एका मंडळीनें याचें उर्दु भाषेंत भाषांतर करून छापिलें असून अलेक्झांडर किनलाक फार्बस साहेबांनीं याचें इंग्रजींत भाषांतर करून छापिलें आहे. तेंव्हां अशा या उपयुक्त पुस्त-काचा लाभ महाराष्ट्र वाचकांस व्हावा या हेतूनें त्या पुस्तकाचें " मराठी भाषांतर करून छापण्याची परवानगी आह्मांस द्यावी. " अशी आह्मीं सदर गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीस विनंती केल्या-वरून मंडळीनें कृपा करून आह्मांस परवानगी दिली. तिजबद्दल आह्मीं सदर मंडळीचे फार फार आभारी आहोंत.

हें पुस्तक सर्वस्वी मूळच्या गुजराती पुस्तकाचें जशाचें तसें भाषांतर आहे, अर्थात् आमच्या स्वतःच्या पदरचें यांत कांहीं नाहीं. तथापि यांत गुजराती लोकांत भूत पिशाच्यासंबंधीं समजुती व कल्पना कशा काय आहेत व भूत पीडा शमनार्थ गुजरातेंत काय काय उपाय योजित असतात. हें महाराष्ट्र वाचकांस या पुस्तकाच्या वाचनानें सहज कळेल. आतां यांतील बहुतेक गोष्टी गुजरात प्रांतांतील जरी आहेत तरी तशाच समजुती व कल्पना आमच्या महाराष्ट्रीयांतही बहुतांशानें वहिवाटींत आहेत. सबब तसे खोटे भ्रम व अज्ञान मूलक समजूती यांचें वाचकांस यथार्थ ज्ञान व्हावें हाच हें पुस्तक छापण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे.

पृथ्वीच्या पाठीवरील बहुतेक सर्व प्रदेशांतील लोकांत भूतांच्या अस्तित्वाची कल्पना फार प्राचीन काळापासून चालत आली आहे, इतकेंच नाहीं तर बहुतेकांच्या धर्म इतिहासादि ग्रथांत भूतांच्या अस्तित्वाचे उल्लेखही ठिकठिकाणीं आढळण्यांत येतात, यावरून भूतयोनीं अजिबांत खोटी आहे. असें ह्मणणें ठीक दिसत नाहीं. भूतयोनी दृश्य किंवा जड देहधारी नसल्यामुळें मध्यकाळीं व सांप्रत कित्येक सुधारक भूत पिशाचें मुळींच नाहींत असें ह्मणतात; तथापि सुमारें पन्नास पाऊणशें वर्षांपासून अमेरीकेंतील विद्वान् शोधकांचें लक्ष या बाबतीकडे जावून त्यांनीं आजपर्यंत शोध करून स्पिरिच्युआलिझम, नांवें एक विद्या शोधून काढली, तिजवरून व पुढें थिआसॉफिकल सोसायटीनें वेळोवेळी आपले जे भूतांसंबंधी अनुभव प्रगट केले. त्यांवरून भूतयोनीच्या अस्तित्वांस बरीच

बळकटी आल्यासारखें झालें आहे. तरी खऱ्याच्या नांवाखालीं खोट्याचा प्रसार अधिक व्हावयाचाच. ह्या नियामांनुसार मिथ्या भूतां-संबंधी भ्रम, लोकांत अधिक वाढत जाऊन त्यापासून अनिष्ट व घातुक परीणामही जास्त होत असतात. या गोष्टीस कांहींतरी आळा घालावा, या हेतूनें हें पुस्तक छापिलें आहे.

गोविंद मोरोबा कालेंकर.
भाषांतरकार

# मराठी भाषेंत अद्भूत व गुप्त विद्येचा अगदीं नवीन ग्रंथ.

## सचित्र परलोक विद्या.

### आणि

### मृत मनुष्याच्या आत्म्याबरोबर भाषणादि व्यवहार करण्याची चमत्कारिक गुप्त कला.

मृत मनुष्याच्या पश्चात् त्याचा आत्मा कृतकर्माप्रमाणें बरीं वाईट फळें भोगीत राहतो. ही कल्पना हिंदु लोकांस मान्य आहेच. तथापि युरोप व अमेरिका या खंडांतील कित्येक आधि भौक्तिक विद्या शोध-कांनीही अलिकडे असा शोध लाविला आहे कीं, कांहीं क्रिया व साधनें यांच्या योगानें कोणत्याही मृत मनुष्याच्या आत्म्यास समक्ष

बोलावून त्याजपासून सांकेतिक रीतिनें अनेक प्रकारच्या नव्या जुन्या गोष्टी, गुप्त भेद व नानातऱ्हेच्या अद्‌भुत क्रिया समजावून घेतां येतात. या बाबतींत अमेरिका खंडांतील कित्येक शोधकांनीं अनेक गोष्टी प्रत्यक्ष अनुभवून बऱ्याच गुप्त गोष्टींचा उलगडा केला आहे. या विद्येस त्यांनीं " स्पिरिच्युआलिझम " असें नांव दिलें आहे. या विद्येवर मराठी भाषेंत अद्यापि कोणीही पुस्तक लिहिलें नाहीं, त्यामुळें महाराष्ट्र वाचकांस या अत्यंत अद्‌भुत व गुप्त विद्येची माहिती कळावी, या हेतूनें हल्लीं आह्मीं मराठी भाषेंत " परलोक विद्या " हा ग्रंथ तयार केला आहे. या पुस्तकांत अमेरिकेंतील प्रख्यात तत्ववेत्त्यांनीं व कलकत्ता वगैरे ठिकाणच्या हिंदुस्थानांतील या विद्येच्या शोधकांनीं या विद्येसंबंधानें कस कसे शोध करून काय काय अनुभव घेतले आहेत; याबद्दलची संपूर्ण माहिती दिली आहे. यांत पृथ्वीवरील निरनिराळ्या धर्मांत मरणोत्तर स्थितीसंबंधी कस कशा समजूती व कल्पना आहेत यांचें दिग्दर्शन प्रथम करून या विद्येची हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून माहिती आहे; अशा बद्दल महाभारतांतील एक सुंदर कथानक देऊन अमेरिका खंडांत या विद्येचा उगम केव्हां, कोठें, कसा झाला व पुढें निरनिराळ्या शोधकांनीं याबद्दल कोठें कस कसे अनुभवसिद्ध प्रयोग केले व त्यावेळीं कोण कोणते आत्मे कसकसे प्रगट होऊन त्यांपासून कशा चमत्कारिक गोष्टी घडून आल्या या बद्दलची माहिती, त्या त्या वेळीं प्रगट झालेल्या आत्म्यांचे काढून घेतलेले फोटो यांसह दिली

असून शिवाय " स्पिरिच्युआलिझम " च्या चक्राची योजना तें बसविण्याचे नियम, आत्म्याला आव्हाहन करण्याचे प्रकार, आत्मा आल्याचें प्रमाण, त्यापासून भूत भविष्य वर्तमान संबंधी प्रश्न कसे कसे समजावून घ्यावे व आत्म्यापासून अनेक प्रकारचीं कृत्यें कशीं करवून घ्यावीं; याबद्दलची माहिती अशीं स्पष्ट व खुलासेवार दिली आहे कीं, वाचक जनांनी प्रयत्न केल्यास त्यास कोणत्याही मृतात्म्या बरोबर भाषणादि व्यवहार करितां येईल. यांत नानाप्रकारचे चमत्कारिक प्रसंग बरेच आल्यामुळें हा ग्रंथ वाचण्यास फारच मनोवेधक आल्हादकारक आणि आश्चर्यजनक असा झाला आहे. म्हणून हा वाचल्यानें एका आश्चर्यजनक विद्येची अगदीं नवीन माहिती वाचकांस अनायासानें प्राप्त होणार आहे. सबब प्रत्येक महाराष्ट्र वाचकानें हें पुस्तक एक वेळ तरी अवश्य वाचून पहावें.

पुस्तक जाड कागदावर सुवाच्य टायपांनीं छापत असून याचीं रॉयल सोळापेजी पृष्ठें सुमारें १६० वर होतील. यांत वेळो वेळीं प्रगट झालेल्या आत्म्याचीं काढून घेतलेलीं कित्येक ( फोटो चित्रेंही दिलेलीं आहेत. बांधणी जाड पुठ्ठ्याची असून किं० २ रु. ठेविली जाईल. परंतु तूर्त जे कोणी हें पुस्तक घेण्याबद्दल आगाऊ नांवें नोंदवितील त्यांजकडे पुस्तक तयार होतांच ट. व्ही. पी. खर्चासह फक्त १॥ रु० किं. आकारून व्ही. पी. नें पाठवूं. पुस्तक जानेवारी १९१२ चे आरंभा छापून तयार होईल. तूर्त फक्त घेण्याबद्दल सह्या पाठवा.

प्रो. जी एम्. कार्लेकर,

पत्ताः—डंकनरोड नजीक दुर्गादेवीच्या देवळा शेजारील घर मुंबई नं. ४

# प्रस्तावना व उद्देश.

## श्लोक

**नमस्ते नीलकंठाय सच्चिदानंद रूपिणे ॥**
**योगिने वृषपालाय भूतानाम् पतये नमः ॥ १ ॥**

संवत् १९०५ ज्येष्ठ वद्य ९ शुक्रवारीं गुजरात वर्नाक्युलर सोसाइटीचें काम चालविणारी मंडळी अमदाबादेंत सोसाईटीच्या लायब्ररींत जमली होती. तेथें जे साहेब आले होते त्यांचीं नांवें—१ रेवरंड जी. डब्ल्यु. पेरीटस २ क्यापटेन फुल जेम्स ३ ए. के. फारबस. यांनीं ठराव केला कीं, खालीं लिहिलेल्या विषयावर ज्याचा निबंध पसंत होईल; त्याला १५० रुपयांचें इनाम देण्यांत येईल.

'शरिरांत भूत येतें' असा भ्रम सर्व लोक मानतात. तो भ्रम कशानें उत्पन्न होतो ? याचीं कारणें शोधून खरी हकीगत लिहावी.

भ्रमानें मानलेल्या भूतास शरिरांतून काढण्याकरितां गुजराथेंत कोणकोणते उपाय करितात. इत्यादि सविस्तर विषयावर निबंध सहा महिन्यांचे आंत लिहावा.

वर लिहिल्याप्रमाणें ठराव ऐकून, मी झालावाड्यांतील वढवाणांत राहणारा ज्ञातीनें श्रीमाळी ब्राह्मण, त्रवाडी दलपतराम डाह्याभाई अशा विषयावर निबंध लिहिण्याचें मनांत आणून, १ भूत-

**भ्रम उत्पत्ति २ भ्रम शोधन सत्यवार्ता ३ भ्रमछेदन वर्तमान उपाय आणिक ४ भूत भ्रमादिक वार्त्ताविस्तार** अशा नांवाचा चार प्रकरणांचा हा ग्रंथ करण्याचें मनांत आणिलें. त्यांत माझ्या मनाचा अभिप्राय असा आहे कीं, मी प्रथम बाळपणापासून कर्म-कांडाच्या ग्रंथांसहित सामवेदाचा अभ्यास केला आहे व व्याकरण शिकल्यावर कित्येक पुराणें माझ्या वाचण्यांत व ऐकण्यांत आलीं आहेत. त्या शास्त्रांत भूतांच्या गोष्टी पुष्कळ आल्या आहेत. मुस-लमानी शास्त्रांत या भूतांस सैतान व ख्रिस्ती शास्त्रांत मलिनदेव असें ह्मणतात.

पण त्यांत असा फरक पडतो कीं, हिंदु लोक ह्मणतात— मनुष्याचा जीव मेल्यावर भूत होतो. आणि मुसलमान व ख्रिस्ती लोक ह्मणतात सैतान पृथ्वीच्या अगोदरपासून होतें. त्यानंतर जीव उत्पन्न होतो. आणखी मुसलमान ह्मणतात कीं, चांगल्या मनु ष्याचें सैतान नाश पावतें. व भ्रष्ट मनुष्याचें सैतान ( भूत ) होतें

जैनधर्मी लोक भूतास कुतोहळी देव ह्मणतात, त्यावरून वेदादिशास्त्रांतील गोष्टी खोट्या आहेत असें मी ह्मणत नाहीं; परं शास्त्रांत लिहिलें आहे कीं, मनुष्य स्वर्गांत जाऊन पुनः ये होता आणि स्वर्गांतील देवता मनुष्याजवळ येत होत्या. अशा गो प्राचीनकाळीं घडल्या असतील, परंतु सांप्रत अशा गोष्टी खऱ्या मानण्यालायक नाहींत.

आणखी त्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, मंत्रानें अमूक काम होतें, बाण चालतो. हें खरें असेल, पण हल्लीं केवळ परमेश्वराच्या नांवाचा मंत्र, मेल्यावर जिवाचें कल्याण करतो; परंतु दुसऱ्या जातीचे मंत्र तंत्र सिद्ध होत नाहींत.

ज्या समयीं प्रत्यक्ष हनुमान ( मारुती ) होता, त्यासमयीं तो चांगल्या व वाईट मनुष्यांच्या पाहण्यांत आला असेल. पण सांप्रत कोणी ह्मणतात कीं, हनुमान माझ्या आंगांत येऊन खेळतो. ही गोष्ट मला खरी वाटत नाहीं. कारण कीं, कोणत्याही शास्त्रांत हनुमान मनुष्याच्या अंगांत येतो असें लिहिलेलें नाहीं. तो हनुमान सदा सर्वकाळ रामचंद्रजीच्या सेवेंत राहणारा, मग त्यापासून निराळा होऊन, मनुष्याच्या अंगांत कसा येणार ?

भूतादिक देव भूत लोकांत राहतात. ते खरोखर पृथ्वीवर पूर्वीं आले असतील, पण आजकाल कोणी ह्मणतात कीं, मी भूत दृष्टीनें पाहिलें, माझ्या अंगांत भूत येतें. ह्या गोष्टी खऱ्या नाहींत. कारण कीं, माझीही भूत पाहण्याची इच्छा होती, जरी कोणी सांगितलें असतें कीं, येथून वीस कोस लांब अमूक ठिकाणीं भूत राहतें, तरी तें पाहण्यासाठीं गेलों असतों असा माझा स्वभाव होता.

अशा रीतीनें आज माझी अठ्ठावीस वर्षांची उमर झाली, पण भूतादिकांची खरी गोष्ट कोठेंही माझ्या पाहण्यांत आली नाहीं. व त्र शास्त्रांपैकीं **मंत्र महोदधि, शारदा तिलक व रुद्रयामल** इत्या-

दिकांचा अभ्यास माझ्या पिढीपासून चालत आला आहे. त्या मंत्रांचे प्रयोग, कित्येक मंत्र साधण्याकरितां दिवाळीच्या रात्रीं व ग्रहणसमयीं जतीच्या वेषानें मी करून पाहिले होते; त्यांतील कित्येक तोंडानें सांगण्यासारखे व लिहिण्यासारखेही नाहींत.

नंतर मला स्वामीनारायणाच्या साधूची संगती झाल्यापासून, केवळ जिवाच्या कल्याणाकरितां वेदमंत्रांशिवाय दुसऱ्या मलीन मंत्रांवरील माझा विश्वास उडून गेला. त्यामुळें ते उपाय करण्याचें मी सोडून दिलें. कारण त्या मंत्रांत कांहींच तत्व दिसलें नाहीं. त्या मंत्रप्रयोगांच्या कांहीं रीति या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत लिहीन. पण मंत्र प्रगट करण्याची माझी इच्छा नाहीं. कित्येक यावनी मंत्र व बौध मंत्र लिहिण्यासारखे असतील तेवढेच लिहीन. पण असें समजावें कीं, कोणत्याही मंत्रानें मुलगा मुलगी उत्पन्न होईल, मिळकत मिळेल किंवा शत्रु मरेल. ही गोष्ट सांप्रतकाल खरी मानूं नये. कारण कीं, मी सर्व प्रकार करून पाहिले आहे पण त्यांपासून कांहीं झालें नाहीं, भूताच्या व मंत्रांच्या भ्रमा कित्येक साधीं—भोळीं—माणसें जिवास मुकतात. कित्येक उन्मा रोगाच्या दुःखानें हैराण होऊन मरतात; याकरितां तशा भोळ माणसांचा तरुणोपाय होऊन सुख प्राप्त व्हावें या हेतूनें हें पुस्त मी तयार करीत आहें. हें पुस्तक वाचून व ऐकून विचार केल्या भूतांबद्दलचा भ्रम मिटेल. अशा हेतूनें या पुस्तकाचें नांव "भूत पिशाच्च निर्णय" असें ठेविलें आहे.

मेहरबान आलेक्झांन्डर किन्लाक फार्बस साहेबानें या पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर करून विलायतेंत प्रसिद्ध केलें आहे. त्यानंतर आग्र्यांतील एका मंडळीनें गुजरात वर्नाक्युलर सोसाईटीची परवानगी घेऊन उर्दु भाषेंत तर्जुमा करून पारशी अक्षरांत छापून प्रगट केलें आहे. यामुळें आग्रा इलाख्यांत हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे.

अझून गुजराथेंत भूतांबद्दलचा वहिम साफ मिटला नाहीं, ह्मणून ह्या पुस्तकाचा जास्त प्रसार झाला पाहिजे. त्याचा खपही पुष्कळ आहे. सबब ह्या पांचव्या आवृत्तीच्या २ हजार प्रती सोसाईटीनें छापविल्या आहेत. सोसाईटीचे सेक्रेटरी मेहरबान एम्. एच. स्काट साहेबांच्या हुकमावरून—

दलपतराम डाह्याभाई आसिस्टंट सेक्रेटरी. सही.

# सचित्र हिप्नॉटिझम्.

## ( प्राणाकर्षक वशीकरणविद्या )

**हिप्नॉटिझम्** ह्या अत्यंत अद्भुत व आश्चर्यजनक विद्येचा लाभ महाराष्ट्र वाचकांस व्हावा, ह्मणून वरील नांवाचें पुस्तक हल्लीं मराठी भाषेंत अगदीं नवीनच छापलें आहे. यांत ही विद्या कशी साध्य करावी; मनुष्य पशुपक्ष्यादि प्राण्यांवर या विद्येचे प्रयोग कसे करावे, त्यांस वश करून आपल्या इच्छेप्रमाणें कसें वागवावें, अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक रोग, व्यसनें व विकार औषधाशिवाय या विद्येनें कसे बरे करावे. तसेंच मंडळीपुढें मनोरंजक, अदभुत व आश्चर्यकारक असे आस्वलाचा, अग्नि पेटल्याचा. पाण्यांत बुडल्याचा, विमानांत बसल्याचा, हजामाचा, वगैरे अनेक तऱ्हेचे चमत्कार कसे दाखवावे, दुसऱ्याचे मनांतील हृद्गत कसें जाणावें, आपले विचा दूरस्थळीं कसे पाठवावे, डोळे बांधले असतांही प्रेक्षकांनीं छपवि लेली वस्तु कशी शोधून काढावी; इच्छिलेलीं कार्यें कशीं सिद्धीस न्यावीं; इत्यादि विषयांची माहिती, क्रिया, प्रयोग व १९ चित्रां कृतींसह अशी स्पष्ट व खुलासेवार दिली आहे कीं, असें पुस्त मराठी भाषेंत अद्याप मुळींच प्रसिद्ध झालें नाहीं. याची रॉयल सोळ पेजी २२५ वर पृष्ठें असून बांधणी जाड पुठ्याची आहे. याची किं २॥ रु. आहे. तरी तूर्त ट. व्ही. पी. सह १॥। रुपयांत देउ

**पत्ताः—डंकनरोड, दुर्गादेवीच्या देवळा शेजारील घर, मुंबई नं. :**

**प्रो० जी० एम्० काळेकर**

# भूत-पिशाच्च निर्णय.

## प्रकरण १ लें

## भ्रम उत्पत्तिचा दृष्टांत

गुजराथेंत भूताबद्दल भ्रम उत्पन्न होतो, त्याचा एक दृष्टांत असा आहे कीं—एक भोळा मनुष्य रानांत जात होता, तेव्हां एक भयंकर जागा पाहून भिऊं लागला, आणि त्याच्या मनांत आलें कीं, आतां या बाजूनें वाघ येईल कीं त्या बाजूनें येईल? इतक्यांत तेथील झाडांच्या पानांचा आवाज झाला, तो ऐकतांच तो भीतीनें घाबरून समजला कीं, खरोखर वाघ आला. असें जाणून मागच्या वाटेनें धूम पळत सुटला. पळतां पळतां रस्त्यांत पडला. त्याचें दांत पडले, तोंडातून रक्त वाहूं लागलें. हातांचें कोंपर फुटले, ढोंपरें रक्तबंबाळ झालीं. भीतीनें पुनः उठून पळूं लागे. पुनःपडे, पुनः पळे. असा पळत असतां दुसऱ्या मनुष्यानें त्याला पाहिलें, तेव्हां त्यानें त्यास हांक मारून ह्मटलें—अरे तूं कां पळतोस? पळणारा ह्मणाला—माझ्यामागें वाघ येत आहे.

दुसरा ह्मणाला—तूं मागें तोंड करून पहा, तुझ्यामागें कोणी येत नाहीं. असें ऐकतांच तो पळत असतांच मागें पाहूं लागला. तों वाघ दिसला नाहीं, ह्मणून उभा राहिला. तेव्हां दुसरा जवळ येऊन ह्मणाला—वाघ कसा होता? तो ह्मणाला—मी जन्मापासून वाघ पाहिलाच नाहीं कसा असतो तो. पण सर्व लोक बोलतात कीं, या ठिकाणीं वाघ राहतो. त्यामुळें त्याठिकाणीं मला वाघासारखा आवाज आला. त्यावरून समजलों कीं, हा वाघच असेल व तो माझ्या मागें येत होता व त्याच्या पायांचा आवाज मी ऐकत होतों ह्मणूनच मी धांवत पळत जात होतों.

नंतर त्याच्या शरीरास फार लागल्यामुळें त्याच्यानें चालून जाववेल असें नव्हतें. ह्मणून तो दुसऱ्या मनुष्याच्या साह्यानें घरीं जाऊन बिछान्यांवर पडला. पुढें तो तें ठिकाण पाहावयास गेला, तेथें वाघाचें एक पाऊल सुद्धां लागलेलें नव्हतें पण शरीराला इजा झाली तें खरें झालें आणि वाघाची गोष्ट खोटी ठरली.

अहो, माझे देशमित्रहो! जशी या मनुष्यानें पहिल्यापासून वाघाची गोष्ट ऐकिली होती, त्यामुळें अशा खोट्या वाघाचा भ्रम उत्पन्न होऊन शरीरास दुःख प्राप्त झालें. जसा बिळांत सर्पाचा भ्रम व्हावा किंवा शिंपल्यांत रुप्याचा भास व्हावा, तसा शास्त्रांतील

भूतांच्या खऱ्या गोष्टी ऐकल्यानें किंवा लोकपरंपरेनें पाखंडी लोकांनीं चालविलेल्या भूतांच्या खोट्या गोष्टी ऐकल्यानें भूतांचा भ्रम उत्पन्न होतो.

ते भ्रम मुख्य दोन प्रकारचे आहेत, मेलेलें मनुष्य भूत होऊन, अंगास बिलगतें हा एक भ्रम आणि दुसरा जीवंत मनुष्यास लागतें व तो त्या भूतांच्या गोष्टी शास्त्राच्या विश्वासा वरून खऱ्या मानणें योग्य आहेत. पण लोक परंपरेनें पाखंडी व भोळ्या लोकांनीं चालविलेल्या ज्या भूतांच्या खोट्या गोष्टी आहेत व माझ्या पाहण्यांत ज्या रीति आल्या आहेत ( त्या सर्व गोष्टी या पुस्तकांत मी लिहीन. ) त्या खऱ्या मानणें योग्य नाहींत. त्यांत हिंदु लोकांच्या शास्त्राचा वृत्तांत जो मी ऐकला आहे, त्याच्या रीति पुढें लिहितों.

---

## प्रकरण २ रें.

—०—

### हिंदुशास्त्रांतील भूतांविषयींची कल्पना.

हिंदु लोकांच्या गरुड पुराणादि शास्त्रांत लिहिलें आहे कीं, मनुष्य मेल्यावर, त्याच्या मागें त्याचे पुत्र वगैरे असतील, त्यांनीं सपिंडदान करावें. तें केलें नाहीं तर मरणाराचा जीव भूत होतें,

त्यांत एक पिंड मेल्याठिकाणीं शव नांवाचा, घराच्या दरवाज्याच्याठायीं दुसरा पिंड पांथक नांवाचा, चव्हाठ्यावरील तिसरा पिंड खेचर नांवाचा व चवथा विश्रांति ठिकणचा भूत नांवाचा. एवढे पिंड दिल्यानंतर पुढील क्रिया ज़री झाल्या नाहींत तरी त्या जिवाची भूतगति होते.

चितेच्याठायीं पांचवा पिंड साधक या नांवाचा व सहावा पिंड प्रेत नावांचा करितात. नंतर त्यादिवसापासून १० दिवसपर्यंत नित्य एक पिंड दिल्यानें प्रेताचें शरीर आंगठ्या एवढें बनतें. ( मी ऐकलें आहे कीं, विलायतेंतील लोक सांगतात आंगठ्या एवढें भूत असतें ) त्याची रीत अशी आहे कीं—

पहिल्या दिवशीं माथें उत्पन्न होतें. दुसऱ्या दिवशीं डोळे, कान व नाक; तिसऱ्या दिवशीं तोंड, कंठ, हात व छाती होते. चवथ्या दिवशीं बेंबी, लिंग व पाठ, पांचवे दिवशीं कमर, ढोपर व जांग; सहावे दिवशीं घोंटे व पायांचीं बोटें; सातवे दिवशीं हाडें व मांस; आठवे दिवशीं नख व केंश, आणि नववे दिवशीं वीर्यादि सर्व शरीर बनतें. दहावे दिवशीं भूक व तहान उत्पन्न होते. त्यांच्या शमनार्थ पिंडदान करावें. बहुतकरून गुजराथेंत दहावे दिवशीं दसपिंड दानासह करितात. कोणी कोणी प्रत्येक दिवशी पिंडदान करितात.

नंतर त्याचा मोक्ष होण्याकरितां अकरावे दिवशीं नारायण बलिश्राद्ध किंवा नीलोत्सर्ग वीधि करितात. बारावे दिवशी सपिंड-श्राद्ध ( प्रेताचीं देवगति होण्याचें श्राद्ध ) करितात. तें श्राद्ध ज्याचें होत नाहीं तो प्रेतरूप राहतो. त्या प्रेतास अर्धे देव व अर्धें भूतजाती असें ह्मणतात.

श्राद्ध करण्यांत जाणून अथवा न जाणून चूक झाल्यास, त्या मरणाराची अधोगती होते. हीं पिंडदान आदि श्राद्धें हिंदूत करितात. पण श्रावक लोकांत करित नाहींत. त्यांची रीत निराळी आहे ती पुढें लिहिण्यांत येईल. वर लिहिलेल्या पुराणांत लिहिलें आहे कीं, जीव यमपुरींत जाऊन केल्या पापपुण्याचीं फळें भोगितो.

यमपुरींत नरकाचीं कुंडें पुष्कळ आहेत. त्यांत मोठीं आणि मुख्य अशीं एकविस आहेत. त्यांचीं नांवें—रौरव, महारौरव, तामिस्त्र, अंधतामिस्त्र, शाल्मली, कुंभीपाक अशीं आहेत. तेथें यमधर्माचें राज्य आहे. त्याच्यापाशीं मुख्य चाकर चौदा कोटी आहेत. आणि दुसरेही चाकर पुष्कळ आहेत. ते मेलेल्या मनुष्याचा जीव यमपुरींत घेऊन जातात. ती यमपुरी नव्वद हजार योजनें दक्षिण दिशेस पृथ्वीच्या खालीं आहे.

तेथें जिवास, कर्मानुसार फळें भोगवून, चौऱ्याशीं लक्ष योनींत शरिरांत जीव घालतात. तीं शरीरें एकविस एकविस लाख प्रका-

च्या चार जातीचीं आहेत. १ अंडज ( अंड्यापासून जन्म ) २ उद्भिज्य ( जमिनींतून जन्म ) ३ स्वेदज ( घामापासून जन्म ) ४ जारज ( वीर्यापासून जन्म ) कित्येक पुण्यवान् देवलोकीं जातात. ज्यांनीं जसें पुण्य केलें असेल तसें सुख भोगून पुनः पृथ्वीवर मनुष्य जन्मास येतात.

आकाशांतील तारा ( नक्षत्र ) तुटलेला खालीं पडतांना पाहतांच हिंदु लोक समजतात कीं, याचें देव लोकीचें पुण्य सरलें ह्मणून तेथून पडला तो आतां मनुष्य जन्म घेईल. आणि थोडें पुण्य असलेला जीव मलिनदेव जातींत राहतो. तो जसा उत्तरेकडे मेरु पर्वतावर अलकापुरींत शंकराचा मित्र जो कुबेर त्याचा चाकर यक्ष आहे, त्या जातींत जातो.

तसेंच शंकराचे चाकर विनायकादि, गांधर्व, वैताल, ब्रह्मराक्षस कुष्मांड, भैरव, ग्रह, जित्रंभक इत्यादिक मलिन जातींत उपजतात. बायका देखील स्वर्गलोकीं देवी किंवा अप्सरा होतात. थोडें पुण्यवाल्या स्त्रिया यक्षिणी, किन्नरी, मातृका किंवा दुर्गेच्या दासी ज्या शाकिणी इत्यादिक आहेत. त्या होतात.

ते मलिन देव व देवी देखील मनुष्यास भूत प्रेताप्रमाणेंच पीडा करितात. असें या शास्त्रांत लिहिलें आहे, व या मृत्युलोकावर दुसरा भूर्वलोक आहे तेथें हे मलिनदेव राहतात. त्यांच्यावर स्वर्ग लोकांत इंद्रादिक उत्तम देव राहतात. शंकराच्या सैन्यांत देखील भूत

प्रेतादिक मलिनदेव राहतात. ज्या मनुष्याचा मरणसमयीं मुला-बाळांत बायकोत, घरांत, मिळकतींत हेतु राहतो, तो असा कीं, त्या हेतु मुळेंच शरीरांतून जीव लवकर बाहेर निघत नाहीं. त्यामुळें फार दुःख भोगावें लागतें. तो मेल्यावर त्या जीवाचें भूत होतें.

जो मनुष्य लढाईत हत्यारानें समोरासमोर मरतो. तो स्वर्गांत जातो. जो कंटाळून मागें फिरून मरतो तो नरकांत जातो. आणि जो समोरासमोर किंवा मागें पळून मरतेवेळीं धनादिकांत आपला हेतु ठेवून पुढें लिहिल्याप्रमाणें मरतो तो भूत होतो.

जे आपल्याच हातानें हत्यारानें मरतात, किंवा विष खाऊन, फांस लावून, अथवा अपघात करून मरतात ते भूत होतात. जे सर्पदंशानें, वाघाच्या भक्षणानें, पाण्यांत बुडाल्यानें, चेंगरल्यानें, भाजल्यानें, विजेनें, चोरापासून, कुत्र्यादिकांच्या दंशानें, शिंग-वाल्या जनावरांच्या मारण्यानें अशा प्रकारें ज्याचें मरण होतें तो मेल्यावर भूत होतो.

आतां अंतरिक्षमरण ह्मणजे बाजेवर किंवा माचावर मेल्या-नंतर त्याला कोणी अपवित्र मनुष्यानें स्पर्श केल्यास तो भूत होतो. असे पुष्कळ प्रकार भूत होण्याचेच सांगितले आहेत. त्याबद्दल वेदाच्या कर्मकांड ग्रंथांत अशा अकालीं मृत्यूचें प्रायश्चित् ह्मणजे दोष निवारण सांगितलें आहे. तें मेलेल्या मनुष्याच्या

पुत्रानें करावें. तें न केलें तर मरणाऱ्या मनुष्यास भूतगती प्राप्त होते. अशाप्रकारें हिंदु शास्त्रांत भूतांची उत्पत्ति सांगितली आहे. आतां त्या भूतांचीं राहण्याचीं स्थानें व त्यांचे पराक्रम लिहितों.

---

## प्रकरण ३ रें

—०—

### भूतांचीं स्थानें व पराक्रम.

भूतें व प्रेतें बहुतकरून स्मशानांत राहतात. तीं यज्ञाचे कामीं येत नाहींत. हलक्या जातीचीं जीं झाडें चिंच, वड व बाभळ यांवर, उजाड जाग्यांत, ज्या ठिकाणीं मरण झालें असेल तेथें, चव्हाट्यांत ह्मणजे चार रस्त्याच्या चौकांत अशा ठिकाणीं भूतें राहतात असेंही कोणी सांगतात. व त्यासाठीं तशा ठिकाणीं बलिदान वगैरे उतारे ठेवितात. भूताचा गळा ( कंठ ) सुईच्या आग्रा एवढा असतो व त्याच्या पोटांत पाण्याची ताहान बारा घागरींची निरंतर असते. आणि जेथें जेथें पाण्याचीं ठिकाणें आहेत, तेथें तेथें वरुण देवाची चौकी असते, त्यामुळें तेथील पाणी त्यांस पिऊं देत नाहींत. मनुष्य झाड्यास गेला असतां गुद धुतल्यावर जें पाणी टाकून देतो; तेवढेंच भूतांच्या पिण्यांत येतें. कोणी सांगतात कीं,

बाभळीच्या झाडावर तसें पाणी टाकिल्यास, त्या झाडाच्या कांट्यावर जेवढें पाणी राहतें तेवढेंच भूतें पितात. आणि लीद, मूत्र, विष्टा व खरखटें पाणी हीं भूतप्रेताच्या खाण्यांत येतात. आणखी नवऱ्याशिवाय जी स्त्री ह्मणजे विधवा, दुसऱ्या एखाद्या परपुरुषावरोबर संग करते, तेव्हां त्या दोघांचें वीर्य व रुधीर भूतांच्या खाण्यांत येतें.

---

## श्लोक प्रेतमंजरीचा.

भर्तृ हीनाचया नारी परवीर्यं निषेवते ॥
तद्वीर्यं रक्त संयुक्तं प्रेतो भूंजती तत्रवै ॥ १ ॥

पवित्र भूत ह्मणजे ज्याचें सपिंडी श्राद्ध झालें आहे, परंतु पुत्रादिकांत हेतु राहिल्यानें जें भूत झालें असेल त्याला पूर्वजदेव असें ह्मणतात. व तें त्याच्या घरांत किंवा पिंपळाच्या किंवा शमिच्या झाडावर राहतें. या भूतप्रेताचा पराक्रम असा आहे कीं, तें एखादेवेळीं मुडद्यांत शिरून बोलूं लागतें. एखादेवेळीं त्याचें पूर्वींचें जसें शरीर होतें तसें दाखवितें. एखादेवेळीं मनुष्यांत शिरून बोलतें, एखादेवेळीं एखाद्या मनुष्यास तापादिक अनेक प्रकारची पीडा करतें. व लोक परंपरेनें ऐकण्यांत येतें कीं, भूत एखादेवेळीं पशुसारखें रूप दाखवून, लगेच अग्निच्या ज्वाळे-

सारखें होऊन भिववितें. व कोण्यावेळीं अकस्मात् भयंकर आरोळ्या देऊन बोलतें.

आणखी मी ऐकलें आहे कीं, भूत कोणा मनुष्याच्या पाठोपाठ आलें, कोणी मनुष्यास उचलून नेऊन दुसऱ्या ठिकाणीं ठेवून आलें. कोणी बायकोस भूतसंगानें गर्भ राहिला. अशा हजारों गप्पा लोकांच्या तोंडून मी ऐकिल्या आहेत. त्या लिहिल्या असतां या ग्रंथाचा विस्तार होईल. यासाठीं थोड थोड्या गोष्टी सर्व प्रकारच्या लिहिन. आतां जैन शास्त्राची कल्पना लिहितों.

## प्रकरण ४ थें.

—०—

### जैन शास्त्रांतील भूताविषयीं कल्पना.

जैन शास्त्राच्या संग्रहणी प्रकरण वगैरे ग्रंथांत लिहिलें आहे कीं, पृथ्वीच्या खालीं आठ जातीचें व्यंतर देव राहतात व आठ जातीचे वाणव्यंतर राहतात. त्यांत एकेका जातीचे दोन दोन इंद्र आहेत, एक दक्षिण भागाचा इंद्र व एक उत्तर भागाचा, त्यांच्या शरिराचे रंग निरनिराळे आहेत. ते व्यंतर व वाणव्यंतर देव पृथ्वीवर येऊन मनुष्यांत शिरून बिलगतात. एखादेवेळीं एखाद्या मनुष्यास आपलें भलतेंच रूप दाखवितात. या व्यंतर व वाणव्यंतर जाती खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत.

| व्यंतरजाती ८ | | | | वाणव्यंतरजाती ८ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यंतरजाती | दाक्षिणेंद्र | उत्तरेंद्र | वर्ण | वाणव्यंतर | दाक्षिणेंद्र | उत्तरेंद्र | वर्ण |
| पिशाच्च | काळ | महाकाळ | शाम | अणपंनी | संनिहित | शामाणिव | शाम |
| भूत | सरूप | प्रतिरूप | कृष्ण | पणपंनी | धाई | विधाई | कृष्ण |
| यक्ष | पूर्णभद्र | माणिभद्र | शाम | इसीवाइ | इसी | इसीपाळ | शाम |
| राक्षस | भीम | महाभीम | धवल | भुयवाइ | इसर | महेशर | धवल |
| किन्नर | किन्नर | किंपुरुष | नील | कंदी | सुवत्स | विशाल | नील |
| किंपुरुष | सपुरुष | महापुरुष | धवल | महाकंदी | हास | हासरति | धवल |
| महोरग | अइकाय | महाकाय | शाम | कोहंड | सेय | महासेय | शाम |
| गंधर्व | गीतरति | गीतयश | शाम | प्रयत | पयग | पयगवइ | शाम |

वर लिहिलेल्या देवांच्याखालीं भवनपति देव राहतात. तेही एखादेवेळीं पृथ्वीवर येतात. त्यांच्या खालीं नारकीना जीव राहतात. पृथ्वीच्यावर आकाशांत पांच प्रकारचे ज्योत देव राहतात. त्यांच्यावर आर्कीच्या देव लोकांत विमानवाशी देव राहतात. ते कोण्यासमयीं आपल्या इच्छेनें किंवा कोण्यामंत्रानें वश होऊन पृथ्वीवर येतात. पण ते कोणास दुःख देत नाहींत.

त्यांच्यावर नवग्रैवेक व पंचअनुत्तर विमानी देव राहतात. ते मोठे सामर्थ्यवान् आहेत; ते कोणत्याही वेळीं पृथ्वीवर येत नाहींत. हे जे पृथ्वीच्या वरचे व खालचे देव सांगितले, त्यांत जे जीव तपस्वी व चांगल्या परिणामवाले असतात ते उत्पन्न होतात. पण पापी जीव त्या देवांत जन्म पावत नाहींत.

कोणी मनुष्य अष्टम ह्मणजे तीन उपास करून देवांस बोलवित होता. पण अशा वेळीं देव कोणत्याहीप्रकारें कोणाच्या बोलावण्यानें पृथ्वीवर येत नाहींत. त्यावरून समजावें कीं, व्यंतर व वाणव्यंतर देवही अशा समयीं येत नाहींत. त्यांचें सामर्थ्य मनुष्यांपेक्षां जास्त आहे. आजकालच्या भूतपिशाच्यांसारखें ह्या देवांस मानूं नये. आजकाल पाखंडी व भोळ्या लोकांनीं रचलेल्या खोट्या भूतांच्या गोष्टी चालत आहेत. त्याबद्दलची माहिती लिहितों.

# प्रकरण ५ वें.

## खोट्या भूतांची हकीकत.

शास्त्राप्रमाणें भूतांच्या गोष्टी वर लिहिल्या गेल्या. आतां त्यांच्या विरुद्ध ह्मणजे खोट्या भूतांचीं लक्षणें लिहितों. बांधवहो ! ज्या रीतीनें तुमचा अज्ञानरूपी अंधकार नाहींसा होईल, असा विचार बुद्धिपूर्वक करा. शास्त्रांत लिहिलें आहे कीं, भूतें देवजाती आहेत. त्यांच्यांत माणसांपेक्षां बळ व पराक्रम जास्त आहे. तर मग सांप्रत कोणी पाखंडी किंवा भोळा मनुष्य भूताचें नांव घेऊन अंगांत आल्यासारखें दाखवितो. त्यावेळीं दुसरा हिंमतवाला मनुष्य त्या भूतास ह्मणतो कीं, तूं माझ्या शरीरांत येऊन बैस. ह्मणजे मी तुला खरें ह्मणेन. किंवा याच्या अंगांतून निघून निराळें होऊन बोल, तर मी खरें मानीन. त्यावेळीं तें अंगांत आलेलें भूत तसें करूं शकत नाहीं. त्यामुळें शोधक लोक त्या भुताची फार मस्करी करितात. त्याचा अपमान करून त्यांस झिटकारून टाकतात. तें असें कीं, जर एखाद्या गरीब मनुष्यास अशीं भाषणें बोलल्यास जसा त्याचा दुसरा कांहीं जोर चालत नसून तो मनांत लाजील होतो तद्वत् तें भूत त्यास कांहीं करूं शकत नाहीं.

कोणी मनुष्य त्यास कुत्र्याच्या विष्टेची किंवा मिरच्यांची धुरी देतात. कोणी चाबकानें किंवा काठीनेंही मारतात, त्यावेळीं भूत गरीब होऊन रडूं लागतें. अशा या भूतांच्या गोष्टी हिंदु किंवा मुसलमानी शास्त्रांत कोठेंही लिहिल्या नाहींत. जेव्हां मनुष्यानें मारतांच भूत रडूं लागतें, तेव्हां बायकापोरेंही मस्करी करितात. अशीं भूतें जर खरीं मानावीं तर ज्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, भूतांत देवांसारखा पराक्रम आहे; तीं शास्त्रें खोटीं पडतात.

खेळणारें भूत सांगतें कीं, मी अमूक ठिकाणीं राहतों. तेथून या मनुष्याच्या अंगांत आलों आहे. तें निघून जातांना सांगतें कीं, मी आपल्या ठिकाणीं जातों. त्यावेळीं कोणी मनुष्य भूतास ह्मणतो—"चल तूं व मी एकांतस्थानीं जाऊन गोष्टी बोलूं, तूं याच्या शरिरांतून निघून, माझी गोष्ट ऐकून पुनः याच्या शरिरांत शीर आणि मी बोललेली गोष्ट सांग पाहूं? तरच मी खरें मानीन." ही गोष्टही भूत करूं शकत नाहीं.

यावरून विचार करावा कीं, मूर्ख व पंडित अशा दोन्हीं मनुष्यांची परिक्षा तावडतोब होते. मग देव व पाखंडी मनुष्यांची परिक्षा करणें यांत मोठें नवल तें काय? जें खरें भूत असेल, तें कधींही खोटें व्हावयाचें नाहीं. आणि खोटें भूत असेल, त्यास शहाणा मनुष्य कधींही खरें ह्मणणार नाहीं. पहा, जर एखाद्या मनुष्यास सभेंत खोटा पाडला असेल तर तो आपल्या शक्तिप्र-

माणें मेहनत करून आपला खरेपणा दाखवील. तर मग खऱ्या भुतास कोणी मनुष्य खोटें कशावरून करील कीं, ज्याचा पराक्रम मोठा आहे आणि कोणत्याही मनुष्यास तें दिसत नाहीं; अशा प्रकारची भूतांच्या अंगांत जाण्या येण्याची शक्ति आहे.

शरीरांत भूत शिरतांना किंवा बाहेर निघतांना तें कोणाही मनुष्यास दिसत नाहीं तेव्हां एक पाणी भरलेला तांब्या कांहीं दूर अंतरावर ठेवून भूतास ह्मणावें. तूं याच्या शरिरांतून निघून तो तांब्या जवळ आणून ठेव. यांत कांहीं खेळण्यासारखी मेहनतही नाहीं. मग सर्व लोक तुला मानतील.

जर तें भूत एवढाही पराक्रम करूं शकणार नाहीं, तर शास्त्रांत ज्या भूतांच्या गोष्टी लिहिल्या आहेत, तसें भूत हें नव्हे, हें भूत भ्रमानें मानलेलें समजावें किंवा अंगांत खेळविणारा पाखंडी जाणावा.

या ग्रंथांत ज्या ठिकाणीं भूतांच्या गोष्टीचा निषेध केला आहे; तो अशा प्रकारच्या भूतांचा जाणावा; शास्त्रांत सांगितलेल्या भूतांचा नव्हे. जसे बहुरूपि लोक चतुर्भुज आदि देवांचा वेष घेतात तसा या भूतांचा वेष समजावा. ह्मणून समंजस मनुष्यानें अशा भूतांची मस्करी करणें योग्य आहे. आणि त्यास खरें मानणारा देखील मस्करी करण्यास योग्य आहे.

अशा भुतांच्या गोष्टी सुमारें तिनशें चारशें वर्षांपासून चालत आल्या आहेत, असें समजतें. कारण कीं. अस्सल भुतांचे परा-

क्रम ग्रंथांत मोठ मोठे लिहिले आहेत. त्यांतील झाला रजपुताच्या ग्रंथांत एका भूताच्या पराक्रमाची गोष्ट आहे. ती खालीं लिहितों.

## प्रकरण ६ वें.

—o—

### झालाच्या ग्रंथांतील भुताची गोष्ट.

झाला गराशियाच्या ग्रंथांत लिहिलें आहे कीं—पाटणचा राजा करणवाघेला याची बहिण, केशर मकवाणा यानें बायको केली होती. त्याला हरपाळ नांवाचा पुत्र झाला. त्याला बावरें भूत व शक्तिदेवी साहाय्य होती. करणवाघेला यास एक भूत दुःख देत होतें, तें रात्रीं प्रत्यक्ष येऊन करणाबरोबर लढाई करीत असे.

नंतर एके दिवशीं हरपाळाच्या साह्यानें त्या भुतास करणानें जिंकलें. त्यावेळीं भूत ह्मणालें—तूं मागशील तें देतों पण मला सोडून दे. करणानें सांगितलें, मी सांगेन तें काम करशील तर सोडतों.

तेंव्हां भूत ह्मणालें—तुझें काम मी करीन, पण सर्व काम पुरें झालें ह्मणजे मी तुला खाईन. तें त्याचें ह्मणणें करणानें कबूल केलें. नंतर त्या भुतास करणानें जीं जीं कामें सांगितलीं,

तीं तीं सर्व पूर्ण केल्यावर, तें भूत त्यास खावयास तयार झालें. तेव्हां हरपाळाच्या सल्लयानें करण त्या भुतास ह्मणाला—आतां एक मोठें लांकूड घेऊन ये. तोंच भूत मोठें लांकूड घेऊन आलें. मग करणानें सांगितलें हें लांकूड उभें जमिनींत पुरून त्यावर चढ उतर कर. हें काम पुरें झालें ह्मणजे मग मला खा. अशा रीतीनें भुताच्या भीतींतून करण सुटतांच, हरपाळास ह्मणाला—तूं जें मागशील तें तुला देतों. असें ऐकून हरपाळ ह्मणाला— मी एका रात्रींत जितक्या गांवांत तोरणें बांधीन व गुढ्या उभारीन तितके गांव मला द्यावे. तें त्याचें ह्मणणें करणानें कबूल केलें. नंतर हरपाळानें बावन्या भुतास व शक्तिदेवीस हुकूम देऊन, एका रात्रींत अठराशें गांवांत तोरणें बांधविलीं. त्या अठराशें गांवाचा झालावाड परगणा गुजराथ देशांत आहे. त्याची पूर्वीची तक्तगादी पाटडीही होती. त्या हरपाळाला तीन मुलगे झाले. त्यांतील एक मांगुजी हा लिमडी गांवांत राहिला. दुसरा शेखरोजी हा चचारण गांवांत राहिला व तिसरा सोटोजी हा पाटडींत राहिला.

आतां विचार करा कीं, अशा रीतीचे पराक्रम समंजस लोकांदेखत केले तर तें भूत खरें समजावें. अयोध्येंत तुळसीदासाला भूत प्रसन्न झालें होतें. त्यानें तुळसीदासास सांगितलें कीं, तुम्हांस पाहिजे असेल तें मागा. तेव्हां तो ह्मणाला—मला रामचंद्रजीचें

दर्शन करीव. त्यावर भूत बोललें—माझें सामर्थ्य एवढें नाहींच; पण मारुतीचें दर्शन तुला करवीन. नंतर मारुतीचें दर्शन करून दिलें. अशीं भूतें सांप्रत दिसत नाहींत. पण मनाच्या कल्पनेचीं भूतें भोळ्या लोकांच्या पाहण्यांत येतात. त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी पुढें लिहितों.

---

## प्रकरण ७ वें.

—०—

### मिथ्या भुतांचे पराक्रम.

एके ठिकाणीं दहा पुरुष एकत्र जमून बसले होते, ते भुतांच्या गोष्टी सांगूं लागले. एक ह्मणाला—मी एके समयीं रात्रीच्या वेळीं चव्हाट्यावरून घरीं येत होतों. तों एक लहान दोन वर्षांचें मूल रस्त्यात उभें राहून रडत होतें. त्यास पाहतांच मला दया येऊन मी त्यास जवळ बोलाविलें. आणि उचलून घेतलें. पुढें मी चालत असतां तें मूल मला इतकें जड वाटलें कीं, त्याचा भार मला सहन होईना. त्यावरून मी समजलों कीं, हें कांहींतरी कौटाळ असावें. नंतर मी त्यास खालीं टाकून दिलें, त्याबरोबर अग्निसारखा भडका होऊन तें उडून गेलें. तेव्हां मी ह्मणालों—तुझे दांत पाडो हनुमान्! नंतर मी आपल्या घरीं आलों. जर मी

त्यावेळीं हनुमान ( मारुती ) चें नामस्मरण केलें नसतें तर त्या भूतानें मला खरोखरच झडपलें असतें.

ही गोष्ट ऐकून दुसरा ह्मणाला—एके दिवशीं माझा चुलता चांदण्यारात्रीं शेतांतून गाडी जोडून घरीं येत होता. तों रस्त्यांत एक बकरें उभें होतें. त्यास पाहतांच चुलत्यानें विचार केला कीं, या बकऱ्यास कोणी जनावर मारून टाकील. यास्तव गांवांत घेऊन गेलों तर धर्म होईल. असें जाणून त्यास गाडीवर घतलें. नंतर अर्ध्या वाटेस येतांच, त्या बकऱ्याचा पाय जमिनीपर्यंत लांब होऊन, तें खालीं घसरूं लागलें. असें पाहून चुलता भीतीनें गाडीवरून खालीं उतरला व आपला जीव घेऊन पळत सुटला तो मोठ्या प्रयासानें गांवांत येऊन, ती गोष्ट सर्वांस सांगूं लागला. तेव्हां आमचे शेजारीं राहणारे पांच सहा मनुष्य ढाली, तरवारी, घेऊन बैल व गाडी आणण्याकरितां निघाले. तों बैल हळू-हळू गांवाकडे येत होते ते त्यांस मिळाले. तेव्हांपासून चुलता सहा महिनेपर्यंत आजारी पडला.

नंतर तिसरा ह्मणाला—एके दिवशीं मी पहांटेच्या सुमारास झाड्यास जाण्यास निघालों तो दोन डाकिणी उभ्या होत्या. त्यांच्या हातांत सोन्याचे चुडे होते व दागिनेही आंगावर पुष्कळ होते. त्या मला ह्मणाल्या—आह्मीं येऊं ? तेव्हां मी त्यांस कांहींच उत्तर दिलें नाहीं. मी भिऊन तसाच घरीं येऊन दार लावून बसलों.

चवथा सांगूं लागला—आमच्या शेजाऱ्याची बायको मरून हडळ झाली आहे. ती त्याच्या घरांत विष्टा व मांसाचे तुकडे आणून टाकते व आपल्या सवतीस खाटेवरून खालीं टाकून देते, दिवसा ढवळ्या घरावर धोंडे मारते, एखादेवेळीं घरांतील अन्न खाऊन जाते, कधीं कधीं सवत दळावयास उठली ह्मणजे तिच्याबरोबर दळूं लागते. आणि कधीं येतें येतें असें बोलते. तें तिचें बोलणें शेजारीपाजारी यांसही ऐकूं येतें. एखादेवेळीं पेटींतील रुपयांची पिशवी काढून, रुपये रस्त्यावर टाकते, पण पेटीचें कुलूप जशाच्या तसेंच असतें.

अशा गोष्टी चालत असतात. याचें कारण, कित्येक लोक मन प्रसन्न करण्यासाठीं अशा खोट्या कल्पना बनवून जगांत सांगत असतात.

आतां त्या बकऱ्याचा पाय जमिनीपर्यंत घसरतांना दिसला, त्याचा तपास केला असता, तर समजलें असतें कीं, गाडींतून पाय बाहेर निसटला असेल व चांदण्यातून त्याची छाया जमिनीवर दिसली असेल ? त्यामुळें तो भोळा मनुष्य भूत समजून पळाला असेल ! आणि तें बकरें रस्त्यांत कोठें पडलें असेल !

तिसऱ्याच्या गोष्टींत ज्या डाकिणी दिसल्या. त्यांचें कारणही त्याचप्रमाणें दुसरें कांहीं असेल ! त्यांच्या शोधाबद्दलची माहिती

दुसऱ्या विभागांत लिहीन. हडळीची जी गोष्ट सांगितली, ती देखील बहुतकरून त्याच्या घरांतील किंवा शेजारचें एखाद्या मनुष्यानें असें काम केलें असेल. यासाठीं मेहनत करून जो याबद्दल तपास करील त्यास शोध लागल्यावांचून राहणार नाहीं. परंतु भोळे लोक भुतांचाच भ्रम धरून कांहींच तपास करीत नाहींत.

एखादेवेळीं कान व डोळे यांसही भ्रम उत्पन्न होऊन, कोणी मला बोलावित आहे, असा भास होतो. किंवा माझ्याजवळ बसला होता, त्यानें मला कांहीं सांगितलें, माझ्यामागें कोणी बोललें, कोणी मनुष्य येथें येऊन परत गेला, अशा प्रकारचे समंजस मनुष्यांसही एखादे वेळीं भ्रम उत्पन्न होतात. तेव्हां जवळ बसणारास विचारून किंवा तपास करून निश्चय करावा कीं, हा तर मला मिथ्याभास झाला. असाच एखादा भोळा मनुष्य एकांतस्थळीं बसला असेल व त्याला असा मिथ्याभास होईल; तर तो हें सर्व भुतापासूनच झालें असें समजेल.

कित्येक लोक असें समजतात कीं. सर्परूपीं भूत असतें, सर्पाचा जीव मनुष्यांत शिरून बोलतो. पण या गोष्टींत कांहींच अर्थ नाहीं व शास्त्रालाही मिळत नाहीं. ती सर्परूपी भुताची कल्पना पुढें लिहितों.

## प्रकरण ८ वें.

### सर्परूपी भुताची कल्पना.

एका वाण्याच्या घरांत परगांवचे दोन पाहुणे आले होते. त्या पाहुण्यांस घरांत बसवून ती घरधनीण पाणी आणण्याकरितां गेली. घरधनी बाहेर गेला होता. त्यावेळीं त्याचे घरांत एक मोठा सर्प निघाला. तो पाहतांच, एका पाहुण्यानें त्यास काठीखालीं दाबून धरलें व एक पाहुणा त्यास पकडण्यासाठीं दुसऱ्या माणसांचा शोध करूं लागला.

इतक्यांत ती घरधणीन बाई पाणी भरून घरांत आली, तिनें तो दाबून धरलेला सर्प पाहतांच, ह्मणाली—"यास सोडून द्या. हा आमचा पूर्वज देव आहे. तो, माझ्या सासूच्या अंगांत येऊन खेळतो. व माझ्या सासऱ्याचें नांव घेऊन सांगतो कीं, माझ्या मिळकतींत माझा जीव राहिला आहे. ह्मणून मी सर्प होऊन या घरांत राहिलों आहे." ह्यानें एके दिवशीं आमच्या शेजाऱ्यास दंश केला होता. त्यावेळीं एक यती उउतरण्यास आला होता. तेव्हां अंगांत येऊन सांगूं लागला कीं, माझ्या पुत्राबरोबर यानें भांडण केलें ह्मणून दंश केला आहे, यापुढें माझ्या मुलाबरोबर भांडणार

नाहीं; अशाबद्दल कोणी जामीन होईल तर मी उतरून जाईन. त्याप्रमाणें कबूल करतांच उतरला. त्या दिवसापासून आमच्या शेजाऱ्याच्या घरांतही कधीं कधीं सर्प निघतो. त्याला कोणी पकडीत नाहीं. कदाचित् कोणी धरून त्याला बारा कोसपर्यंत जरी पोंचवून आले, तरी याठिकाणीं पुनः येतो. कित्येक वेळां माझ्या पायां खालींही सांपडला होता, पण मला दंश केला नाहीं.

एखादे वेळीं जर मी पाणी भरण्यास गेलें आणि माझें मूल एकटेंच घरांत रडत असलें, तर हा सर्प माझ्या मुलास सांभाळतो, असें माझ्या पाहण्यांत पुष्कळ वेळां आलें आहे." असें सांगून त्या सर्पास धरूं दिलें नाहीं. त्याला नमस्कार करून जाऊं दिला.

नंतर तो पाहुणा त्यास शरण येऊन ह्मणाला—हे सर्प बापाजी ! मी तुह्मांस दाबून धरिला, तो माझा गुन्हा माफ करा; मी तुमचा मुलगा आहे.

आतां विचार करा कीं, सर्प मुलास सांभाळील, ही गोष्ट कांहीं संभवनीय नाहीं. पण भोळे लोक शपथा घेऊन अशा गोष्टी सांगतात. त्या कशावरून खऱ्या मानाव्या ? नंतर त्या सर्पास एके दिवशीं एका मांजरानें मारून टाकलें.

तेव्हां घरधन्यानें त्याला स्मशानांत नेऊन पांच शेर तूप, एक नारळ व अर्धा शेर चंदन व लांकडें यांत जाळून टाकलें.

अशा सर्प झालेल्या पूर्वजांच्या गोष्टी माझ्या ऐकण्यांत पुष्कळ आल्या आहेत. या लोक परंपरेच्या गोष्टींवरून, जर कोणी मनुष्य मेलें आणि त्याच्या वरांत त्याच वर्षांत सर्प निघाला तर भोळे लोक समजतात कीं, हा अमूक मनुष्य मेला तोच मरून सर्प झाला.

आतां धनावर सर्प असल्याची एक गोष्ट धोळका गांवांतील मी पुष्कळ लोकांच्या तोंडून ऐकिली आहे ती लिहितों.

## प्रकरण ९ वें.

—o—

### धनावर राहणाऱ्या सर्पाची गोष्ट.

धोळका गांवांत एका श्रीमाळी ब्राह्मणानें दुसऱ्याची एक जमिन विकत घेतली. ती खणीत असतां, तींत भुयार निघालें, त्यांत द्रव्य पुष्कळ होतें, त्यावर एक मोठा सर्प राहत असे. तो सर्प रात्रीं ब्राह्मणाच्या स्वप्नांत येऊन ह्मणाला:—येथें माझी मिळकत आहे. तीवर मी राहत आहें तर हें भुयार तूं खणुं नको; व या मिळकतीची इच्छाही धरूं नको,

यांची तूं इच्छा धरसील तर तुझा वंश मी चालूं देणार नाहीं असें ऐकून त्या ब्राह्मणानें दुसरे दिवशीं कढविलेलें तेल त्या भुयारांत ओतलें. त्यामुळें तो सर्प मरून गेला. मग त्या ब्राह्मणानें ती मिळकत काढून घेतली व त्या सर्पाचें घराचे चौकांत आणून अग्निदहन केलें.

त्या धनावर त्या ब्राह्मणानें मोठ मोठ्या इमारती बांधल्या. पण त्याचा वंश राहिला नाहीं. तसेंच त्या ब्राह्मणाच्या मुलीचा व ज्यांनीं ज्यांनीं तें द्रव्य खाल्लें होतें त्यांचा, त्यांच्या वकिलाचा, व कुलगुरूचीहा वंश राहिला नाहीं. या गोष्टीस सुमारें ४० वर्षें झालीं.

या ठिकाणीं मी ह्मणतों कीं, स्वप्नांत सर्प बोलतो ही गोष्ट कांहीं आश्चर्याची नव्हे. परंतु जागृत मनुष्यापुढें सर्प बोलतो ही एक कौतुकाची गोष्ट आहे.

अशा गोष्टींवरून लोक मानितात कीं, जेथें धन असतें तेथें मोठा सर्प राहतो व जेथें सर्प राहतो तेथें धन असतेंच. सुमारें तीन वर्षां पूर्वीं अमदाबाद शहरांत एक वडनागरी अब्रुदार मनुष्य होता. त्याला एका ठक सैय्यदानें सांगितलें कीं, समुद्राच्या बाजूस एके ठिकाणीं जमिनींत धन आहे, त्यावर एक मोठा सर्प राहात आहे ती जागा तुह्मीं विकत घ्या. नंतर मी मंत्र साधनानें त्यावरील सर्प काढून टाकीन. मग सर्व धन तुमच्या हातीं सांपडेल असें त्या सैय्यदाचें वचन ऐकून त्यानें ती जमिन विकत घेतली.

तेव्हां तो सर्पही त्याच्या दृष्टीस पडला, त्यावरून त्यास विश्वास आला कीं, या ठिकाणीं खरोखरच धन आहे. नंतर तो सैय्यद त्यास ह्मणाला—आतां त्या सर्पास काढण्याकरितां मंत्र साधनास दहा हजार रुपये खर्च होईल.

मग त्या वडनागऱ्यानें तितके रुपये त्या सैय्यदास दिले. त्या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर त्या वडनागऱ्याचा विश्वास जाऊन, रुपये मागण्याकरितां त्या सैय्यदाजवळ गेला. पण त्यानें दिले नाहींत. ह्मणून सैय्यदावर फिर्याद केली. तेव्हां सरकारानें त्यास पकडून कैदेंत टाकिलें. परंतु रुपये गेले ते हातीं लागले नाहींत.

एवढ्यासाठीं मी लिहितों कीं, बांधवहो! पृथ्वींत धन आहे व त्यावर सर्प राहतो अशी गोष्ट खरी मानून कधींही ठकूं नये व असा भ्रम धरूं नये, आतां भूत खेळण्याचे प्रकार लिहितों.

## प्रकरण १० वें.

### भूत खेळण्याचे प्रकार.

जेव्हां भोळ्या मनुष्याचें मन वायु आदि रोगांपासून उदास होतें, तेव्हां मनास खेद वाटून तो कांहीं बोलत नाहीं. त्यावेळीं त्याचे आप्त व शेनारीपाजारी एकत्र मिळून विचारतात कीं,

तुला काय होतें ? तेव्हां तो भोळा मनुष्य ह्मणतो—माझा जीव घाबरतो, मला कांहीं सुचत नाहीं. आणि असेंही वाटतें कीं, आतां रडूं लागेन.

नंतर विचारणारे ह्मणतात—तूं कोठें गेला होतास ? तूं कोठें भिऊन घाबरलास ? असें ऐकतांच तो मनुष्य विचार ..रूं लागतो. इतक्यांत तेथें जीं जीं माणसें येतात तीं त्यास विचारूं लागतात. तेणेंकरून तो भोळा मनुष्य रडूं लागतो. नंतर सर्व लोक ह्मणतात—याला कोणीतरी झडपिलें असावें. असें ऐकून तो भोळा मनुष्य मनांत विचार करितो कीं, मला भुतानें झडपलें असावें. तोंच त्याचें शरीर हालूं लागतें.

असें होतां होतां त्याचें अंग जास्त जास्त हालूं लागतें. त्यावेळीं भूताचा भ्रम नसलेला मनुष्य जाणून बुजुन स्वतः त्याच्या सारखा चाळा करूं लागला; तर त्याच्याप्रमाणें त्यास अंग हाल- वितां येत नाहीं. परंतु पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें त्याच्या सारखें अंग हालवून खेळतां येईल.

भूत भ्रमिष्ट मनुष्य असें समजतो कीं, माझ्या अंगांत भूत खेळतें. मी खेळत नाहीं. आणि हें खेळण्याचें कारण असें आहे कीं, जसें एखाद्या मोठ्या लढाईंत कित्येक मनुष्यांचीं डोकीं कापित असतां, किंवा उघड्या तरवारीनें समोरासमोर

ऱढत असतां, किंवा कांहीं भीतीनें, कित्येक मनुष्यांचीं शरिरें थरथर कांपूं लागतात. पण त्यांत जीं धैर्यवान् मनुष्यें । असतात, त्यांचीं अंगें कांपत नाहींत. याचें कारण जशीं लहान मुलें तोफेचा आवाज ऐकून बहिरीं होतात; तशीं मोठीं मनुष्यें होत नाहींत. कारण त्या मुलांचे कान कोमल असतात, त्यामुळें बहिरीं होतात. तसेच कोमल हृदयाचे मनुष्य भूत भ्रमानें खेळतात. पण कठिण हृदयाचे खेळत नाहींत.

असे हे खेळणारे, जाणून ढोंग करीत नाहींत. त्यांच्या मनाच मला भुतानें पछाडलें खरें असा पक्का निश्चय झालेला असतो. व खेळतेवेळीं त्याला शरिराचें भान अर्धें असतें. तो जाणून बुजुन शरीर हालवीत नाहीं. कित्येक ढोंगी लोक मुद्दामच आंगांत आ-ल्याचें दाखवितात. आतां शमीच्या झाडावर राहणाऱ्या भुताची गोष्ट लिहितों.

## प्रकरण ११ वें.

—o—

### खिजडीया मामाची गोष्ट.

गुजराथेंत अशी चाल आहे कीं, नेवतीचें, वरखडीचें, शमीचें बाभ-ळीचें, चिंचेचें झाड रानांत असेल, तर तें कोणी तोडून नेऊं

नये ह्मणून, त्याच्या रक्षणार्थ त्या झाडावर शेंदुराचा त्रिशूळ करितात. किंवा आजुबाजुचे दगड जमवून ते त्याच्या बुंधाशीं रचतात, त्यावरून त्या रस्त्यानें जाणारीं येणारीं मनुष्यें त्या झाडाच्या बुंधाशीं दोन दोन दगड टाकून जातात. याचें कारण असें समजतात कीं, या ठिकाणीं देवाचें स्थान आहे. तेथें दोन दगड टाकिल्यानें, जसें एखादें देऊळ बांधित असतां, त्यावर दोन दगड चढवावे ह्मणजे पुण्य लागतें; तसें आपणासही लागेल.

कोणी कोणी दुसऱ्याचें पाहूनच दगड टाकितात. तेथें आसपास दगड नसल्यास जुन्या कपड्याचा तुकडा फाडून त्या झाडास बांधतात. नंतर जीं माणसें तिकडून येतात तींही कपड्याची चिंधी बांधतात. व तेथें चिथरिया ( चिंध्या ) मामाचें स्थान आहे असें सर्व लोक समजतात.

जेथें कोणी मनुष्य मेलें असेल, तेथें बाहुलें करितात. आणि कोणी अपघातानें मेला असेल, तेथें दगडांचा ढीग करितात. अशा जाग्यांत खिजडीयामामाचें किंवा चिथरिया मामाचें स्थानही असेल, असें समजतें. पण त्यांच्या आंगांत खेळण्याबद्दलच्या गोष्टी वगैरे शास्त्रांत कोठें आढळत नाहींत. त्यामुळें माझ्याही मानण्यांत येत नाहींत तरी चिथरिया मामाची ऐकलेली गोष्ट पुढें लिहितों.

# प्रकरण १२ वें.

—०—

## चिथरिया मामाची गोष्ट.

कोणी पांच इसम मार्गशीर्ष महिन्यांत परदेशीं चालले होते. ते एका ठिकाणीं उतरले. तेथून मागील गांव व पुढील गांव सुमारें दोन कोसाचे अंतरावर होते. त्यावेळीं सकाळचे प्रहरीं फार थंडी वाजत होती. त्यांच्या हुक्क्यांत विस्तव होता, परंतु जवळ पेटविण्यास कांहीं नव्हतें. नंतर एका झाडाजवळ बसून सुखीं पानें व गवत गोळा केलें व पागोटीच्या पदराच्या चिंध्या फाडून विस्तव पेटवावयास गेले, तों विस्तव विझून गेला.

नंतर त्या चिंध्या एका डहाळीस अडकवून ते चालते झाले. त्या रस्त्यानें जीं माणसें येत तीं येथें चिथरिया मामाचें स्थान आहे असें समजून, त्याच ठिकाणीं चिंध्या गुंडाळून जात. पुढें एक महिना लोटल्यावर ते पांचहीजण त्याच ठिकाणीं फिरून आले, व त्या चिथरिया मामास पाहून त्याचें कारण समजून हंसूं लागले. मग त्या बांधलेल्या चिंध्या काढून घेऊन, पौष महिन्याची थंडी होती; त्यामुळें त्यांची शेकोटी केली.

अशा मामांचीं स्थानें बहुतकरून ज्या देशांत झाडें थोडीं असतात, त्या देशांत पुष्कळ पाहण्यांत येतात. तो मामा आपणास त्रिलगेल

ह्मणून माणसें त्यास भीत असतात. त्याबद्दलच्या कल्पना दुसऱ्या विभागांत लिहीन.

त्यास मामा ह्मणतात, याचें कारण असें कीं, बायकांस भ्रम पुष्कळ असतो. कारण त्यांची बुद्धि मंद असून, त्या विद्या शिकलेल्या नसतात, ह्मणून त्यांस समजूत नसून फार भीत असतात. बायकांस ज्या पुरुषापासून स्वार्थ अथवा भय आहे असें वाटतें, त्या मनुष्यास भाऊ ह्मणून बोलावित असतात. व त्या आपल्या मुलास घेऊन तशा भुतांच्या स्थानापाशीं जात येत असतात; तेव्हां मूल विचारतें कीं, आई हें काय आहे ? तेव्हां आई ह्मणते—तो तुझा मामा आहे.

नंतर ते मूल मोठें झाल्यावरही त्यास मामा ह्मणतें. जसा एखादा बायकोच्या माहेरचा मनुष्य असला ह्मणजे ह्याला मुलाचा मामा ह्मणतात, तसा बायकोच्या भ्रमानें त्यास भूतमामा ह्मणत असतील. सांप्रतकाळीं पुरुषांत जास्त भ्रम नाहीं. तरी बायका अशा स्थानीं जातांच, तेथें जरूर एक दगड टाकितात. व चिथरीया मामास देखील जवळ चिंधी नसली तरी लुगड्याचें सुत काढून त्याचेवर चढवितात. कदाचित भूलचुकीनें चढविण्याचें राहिलें तर भ्रमानें कित्येक बायकांच्या आगांत येऊन त्या बोलतात कीं, मी मामा आहे, माझ्या स्थानाजवळ येऊन, माझ्यावर चिंधी चढ-

विली नाहीं. ह्मणून मी हिच्या आंगांत आलों आहे. नंतर उतारा काढून सुटका करितात.

कित्येक ठिकाणीं रानांत डोंगराच्या टोंकासारखें असल्यास, त्यावर कोणी कोणी पांच किंवा सात दगड एकावर एक रचतात. तें पाहून तिकडे जाणारे त्यावर आणखी एक दगड ठेवितात. बहुतकरून त्या रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या बायका दगड वर ठेवल्याशिवाय पुढें जातच नाहींत. त्या असें समजतात कीं, येथें देवाचें स्थान आहे. त्यावर दगड चढविल्यानें घरसूत्र चांगलें चालतें, नवें घर मिळतें अशी ही अज्ञान लोकांत परंपरेनें चाल चालत आली आहे. आतां डाकिणीची गोष्ट लिहितों.

---

## प्रकरण १३ वें.

—०—

### डाकिणीची गोष्ट.

ज्योतिष ग्रंथांत लिहिलें कीं, द्वितिया, सप्तमी व द्वादशी या दिवशीं अनुक्रमें आश्लेषा, कृत्तिका व शततारका हीं नक्षत्रें आणि मंगळवार, आदितवार, व शनिवार अशा योगावर मुलीचा जन्म झाल्यास, तिला विष कन्या असें ह्मणतात.

## श्लोक

**भद्रासु सार्प्प माग्नेय वारुणं च क्रमाद्यदा ॥**

**भौमाऽर्काकींदिनं यत्र जाता स्याद्विषकन्यका ॥ १ ॥**

ती कन्या वरल्यानें, जसें विष खाणारास मरण येतें, तसें त्या वरणारास मरण येईल. कोणी सांगतात कीं, एखाद्या मनुष्यास अशा योगावर मुलगा झाल्यास त्या मुलाचे दृष्टींत विष असतें. ह्मणजे त्याची दृष्टी ज्या वस्तूवर पडेल ती वस्तु दुसरा मनुष्य सुखानें भोगणार नाहीं, कारण त्या वस्तूचा नाश होईल. दुसऱ्या मनुष्यावर त्याची दृष्ट पडल्यास त्या मनुष्यास पीडा होईल. त्या दृष्टीचा प्रकार भुताच्या अवस्थेसारखा होतो. व अशा योगावर जन्माशिवाय दुसरें कारण लोक सांगतात कीं, अर्डाच अक्षरांचा मंत्र साधल्यानें डाकिण होते.

ती डाकिण ब्राह्मणांत, वाणीन किंवा दुसऱ्या जातीची होते. त्यांतही बहुतकरून चारण[1] व वाघेरीं या दोन जातीच्या बायकांबद्दल लोकांत भ्रम होतो.

डाकिणीनें झडपल्यास ती खेळत असतां, मी अमूक चारण आहें, मला हिनें हांक मारली ह्मणून मी हिच्या घरीं आलें, ही चांगलें लुगडें नेसून माझ्याजवळ येऊन गेली, ह्मणून त्या लुगड्यावर माझी दृष्ट बसली. तें लुगडें माझ्या घरीं येऊन मला

१. गुजराथेंत ह्या जाती प्रसिद्ध आहेत.

द्यावें, ह्मणजे मी तिची सुटका करीन. नंतर तें लुगडें तिच्या घरीं देण्यास जाते, तें ती हातांतून ओढून घेते. तेव्हां झडपल्याचा भ्रम नाहींसा होतो.

या चारणेची उपजिविका बहुतकरून अशीच चालते. तिच्या मनांत असें वाटतें कीं, मी डाकण आहे; माझी दृष्ट ज्याचेवर पडेल तो मनुष्य आजारी पडेल व ज्या वस्तूवर माझी दृष्ट पडेल ती वस्तु दुसरा कोणी भोगूं शकणार नाहीं. त्या डाकिणीची एक गोष्ट मी बारा वर्षांपूर्वी ऐकिली आहे. ती पुढें लिहितों.

## प्रकरण १४ वें.

—०—

### दांतागांवच्या डाकिणीची गोष्ट.

एकेवेळी अंबाजीच्या यात्रेस कांहींमंडळी जात असतां दांतागावाजवळ उतरली होती, त्यांतील तिघे ब्राह्मण दांतागांवच्या विहिरीजवळ जेवण करीत बसले होते. त्यांनीं लाडू बनवून तयार केले इतक्यांत त्या गांवांतील एक बाई पाणी भरण्याकरितां तेथें आली. तिची नजर त्या लाडूवर गेली. तेव्हां त्या बाईनें विचार केला कीं, माझी नजर या लाडूवर बसली आहे. जर हे ब्राह्मण ते लाडू खातील तर त्यांस फार दुःख होईल.

असा विचार करून ती बाई त्या ब्राह्मणांस ह्मणाली—महाराज. तुह्मीं माझ्या घरीं चला, मी तुह्मांस तूप, गूळ व पीठ देतें,

त्यांचे लाडू तुह्मीं पुनः करा. हे केलेले लाडू जर तुह्मीं खाल तर तुह्मांस दुःख प्राप्त होईल. ही गोष्ट त्या ब्राह्मणांच्या लक्षांत आली.

नंतर त्यांतील एक ब्राह्मण त्या बाईच्या घरीं जाऊन दुसरें सामान घेऊन आला व त्याचे लाडू केले. प्रथमचे लाडू फेंकून दिले; तों तेथें तीन चार कुत्रीं होतीं त्यांनीं खाल्ले, नंतर दोन घटका जातांच त्या कुत्र्यांस उलट्या होऊन, तीं हैराण झालीं. त्यांचीं आंतडीं ओकून ओकून बाहेर येऊं लागलीं, त्यामुळें तीं मेल्यासारखीं पडलीं. असें पाहतांच त्या ब्राह्मणांनीं विचार केला कीं, जर आपण ते लाडू खाल्ले असते, तर आपणासही यांच्यासारखें दुःख झालें असतें. पण ती बाई आपणांस प्रथमच बोलली ह्मणून निभावलों.

अशीच दुसरी एक गोष्ट मी ऐकली आहे कीं, असेच दृष्ट पडलेले लाडू जमिनींत पुरले होते. ते थोड्या वेळानें उकरून पाहतां त्यांचें रक्त झालें होतें. आणखी ऐकलें होतें कीं, ते लाडू एका भांड्यांत झांकून ठेविले होते. दोन घटकानंतर पाहतां त्यांत किडे पडले होते.

अशा गोष्टी चांगल्या मनुष्यांच्या तोंडून जरी ऐकिल्या, तरी स्वतः नजरेनें पाहिल्याशिवाय किंवा तपास केल्याशिवाय, माझा

विश्वास बसत नाहीं. व अशी गोष्ट माझ्या नजरेसमोर कधीं घडलेली मी पाहिली नाहीं.

गुजराथेंत पांच सहा माणसें एकत्र मिळून बसलीं असतां, तेथें भुतादिकांच्या गोष्टी निघाल्यास, तीं सर्व माणसें भुतांबद्दलच्या तीन तीन चार चार गोष्टी सांगतात. त्यावेळीं भोळवटासारखें मला गुपचूप ऐकावें लागतें. पण काय करूं ? माझ्या पाहण्यांत भूत आलेलेंच नाहीं. तेव्हां मी त्या ठिकाणीं काय गोष्ट सांगू. त्यामुळें मी लाचार बनत असें.

आतां या डाकिणीच्या बिलगण्याचाही तपास केला पाहिजे कीं, कशाप्रकारें डाकिणीच्या शरिरांतून जीव निघून दुसऱ्या मनुष्याच्या शरिरांत जातों, व पांचजणास एकाच वेळीं बिलगतो आणि ती भुतासारखीच बोलते. ह्मणून तिच्या पराक्रमाची परीक्षा केली पाहिजे. आतां पहिल्या विभागाचा सारांश लिहितों.

## प्रकरण १५ वें.

—०—

### पहिल्या विभागाचा सारांश.

गुजरात व्हर्नाक्युलर मंडळीनें विचारलें—गुजराथेंत भुतांचा वहीम कशानें उत्पन्न होतो ? त्या प्रश्नाचा मी विचार करून पाहिला,

तेव्हां मला असें समजलें कीं, पुढें लिहिल्याप्रमाणें लोकांच्या गप्पाष्टक गोष्टी ऐकण्यांत आल्यामुळें भुतांच्या गोष्टी मनांत बिंबल्या जातात, ह्मणून भोळीं माणसें एखादी पडछाया पाहून किंवा रात्रीं एखाद्या मनुष्यास किंवा जनावरास पाहून अथवा एखादा शब्द ऐकून किंवा भयंकर आवाजामुळें भूतभासानें भ्रमिष्ट होतात.

सांप्रतकाळीं धीट मनुष्याच्या शरिरांत भूत शिरून खेळत नाहीं. तसेंच त्यास खोट्या भुताची गोष्ट खोटी अशी वाटते. पण असें समजणारे क्वचित निघतील.

अशा भुतांबद्दलच्या दंतकथा या देशांत पुष्कळ वर्षांपासून चालत आल्या आहेत. व मी ऐकलें आहे कीं, विलायतेंत देखील अशा भुतांच्या गप्पा पुष्कळ चालत होत्या. नंतर जेव्हां शोधक लोक शोध करूं लागले तेव्हां समजण्यांत आलें कीं, त्या गोष्टी खोट्या आहेत. त्यामुळें आतां त्या देशांत भुतांचा भ्रम बहुतकरून कमी होत चालला आहे.

गुजराथेंत आजपर्यंत अशा गोष्टींचा शोध करण्याची चाल मुळींच नव्हती. ह्मणूनच या भ्रमाच्या गोष्टी जात नाहींत. मी समजतों कीं, हें पुस्तक वाचल्यानें एतद्देशीय लोकांस भुतादिकांचा शोध करण्याची इच्छा होऊन अशा गोष्टींचें ज्ञान होईल. व खोट्या भुतांचा भ्रम उत्पन्न होणार नाहीं.

पुढें दुसऱ्या विभागांत अशा भूतांच्या शोधांच्या खऱ्या गोष्टी लिहून प्रगट करीन.

इति श्रीदलपतराम विरचिते भाषागद्य बंदे भूतादिक भ्रम भंजन ग्रंथे भूतादिक भ्रमोत्पत्ति वर्णनं नाम प्रथम विभागम् ॥ १ ॥

---

पहिला विभाग समाप्त.

# भूत-पिशाच्च निर्णय.

## विभाग दुसरा.

### प्रकरण १६ वें.

—०—

**अधोगतीस गेलेल्या एका ब्राह्मणाची गोष्ट.**

आतां या दुसऱ्या विभागांत या भूतांच्या शोधाची खरी हकिगत लिहितों. एक ब्राह्मण मेल्यानंतर सात महिन्यांनीं आपल्या बायकोच्या आंगांत येऊन खेळूं लागला. ती बायको जातीनें अगदीं गरीब होती. परंतु खेळतेवेळीं तिचा एवढा दरारा वाटे कीं, तिच्या समोर उभें राहून तिला जबाब देण्याची शक्ति कोणाच्यानें होईना. त्याचवेळीं त्या मरणाराचा एक मित्र तेथें आला. तेव्हां ती बाई त्यास ह्मणाली, या दादा, एके दिवशीं आपण दोघेजण एकांतांत बसलों होतों; तेव्हां मी तुला काय सांगितलें होतें? ती गोष्ट ऐकून घे. असें ऐकून तो मित्र ह्मणाला—होय, ती गोष्ट मी ऐकली आहे.

इतक्यांत त्याच्या शेजारचा वाणी तेथें आला. त्याला ती बाई ह्मणाली, हे वाणीया ! मी तुला रुपये दिले होते ते अझून तूं माझ्या बायकोजवळ कां सांगितलें नाहीं ? तेव्हां वाणी ह्मणाला, होय, तुझे रुपये साडेपंचाहत्तर माझे जवळ आहेत, ते मी तुझ्या बायकोजवळ देईन.

अशा प्रकारें ती बाई नेहमीं आंगांत येऊन खेळूं लागली. व तिनें त्यांस सांगितलेल्या गोष्टी लोकांनीं ऐकून, त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. त्याबद्दल मी विचार करून पाहिला तेव्हां असें समजलें कीं, तो ब्राह्मण आपल्या मित्राबरोबर एकांतांत नेहमीं गोष्टी करीत असे. त्यावरून त्या बाईनें अनुमानानें सांगितलें असेल, पण त्या भोळ्या मनुष्यानें असें जाणलें असेल कीं, माझा मित्र माझ्याजवळ एक दिवस बोलला होता खरा कीं, मला मुलगा नसल्यामुळें मी मेल्यावर माझी गती चांगली होणार नाहीं. कारण कीं, शास्त्रांत लिहिलें आहे, ज्याला मुलगा नसेल त्याला सद्गति नाहीं.

## श्लोक

अपुत्रस्य गतिर्नास्ति स्वर्गं नैवच नैवच ॥ १ ॥

हीच गोष्ट मला ऐकावयास सांगत होता, वाण्यानेंही असें जाणलें असेल कीं, हा बायकोच्या आंगांत येऊन बोलतो. तेंच सांगते. असें जाणून साडे पंच्याहत्तर रुपये सांगून दिले असतील.

आणि त्या वाण्यावर सर्व लोकांचा वहीम होता. त्यावरून त्या बाईनें अनुमानानें सांगितलें असेल, पण तें सांगणें खरें ठरलें.

नंतर एके दिवशीं आह्मीं दोघे तिघेजण मिळून तेथें गेलों. तेव्हां आह्मांस तेथील लोक ह्मणूं लागले कीं, तुम्हालाही कांहीं विचारावयाचें असल्यास विचारा. ती बरोबर दाखला सांगून देईल. नंतर ती बाई जसा तिचा नवरा आह्मांस बोलावित असे, तशीच बोलावूं लागली. तेव्हां आह्मीं सांगितलें, आमच्या व तुमच्या देण्या-घेण्याच्या हिशोबांत कांहीं भूल राहिली आहे. ह्मणून बरें झालें कीं, आज तुह्मी आले आहांत; तर ती चूक काढून टाका.

त्यावेळीं त्या बाईनें खेळतां खेळतांच तोंडानें हिशोब करून सांगितलें. तेव्हां आह्मीं त्या धन्याची हातानें लिहिलेली चोपडी त्याच्या घरांतून आणून, त्या बाईच्या पुढें ठेविली आणि सांगितलें कीं, या चोपडींतून तुमचें लिहिलेलें नांव वाचून आह्मांस दाखवावें. तेव्हां ती बाई ह्मणाली, मी चोपडीचें अक्षर वाचावयास शि-कलें नाहीं. असें ऐकून सर्व लोक हंसूं लागले. मग आम्हीं आ-पल्या मनाचा निश्चय केला कीं, या भुताचें बोलणें अगदीं खोटें आहे.

आणखी पहा कीं, हें भूत जर भोळ्या मनुष्यांत शिरून बोलतें, मग पशूच्या शरीरांत शिरून त्याला बोलावयास लावण्यास काय

हरकत आहे ? जर तेंच भूत पशूच्या आंगांत शिरून बोलेल तर आम्हीं त्यास खरें मानूं.

आम्हीं त्या बाईस जे जे प्रश्न विचारले त्यांपैकीं एकाचेंही उत्तर तिनें बरोबर दिलें नाहीं. आणि दुसरीं मनुष्यें विचारित होती कीं, आमच्या मामाचें नांव काय ? चुलत्याचें नांव काय ? त्यांचीं उत्तरें तावडतोब देत होती. आणखी आम्हीं विचारलें कीं, अमूक दिवशीं वाचित होता, त्या ग्रंथाचें नांव काय ? त्याचा जबाब दिला नाहीं. तेव्हां आम्हीं जाणलें कीं. हें सर्व ढोंग आहे आतां एक काशीस जाणार भूत झाला, त्याची गोष्ट पुढें लिहितों.

## प्रकरण १७ वें.

—०—

### काशीस जाणारा भूत झाला.

एक ब्राम्हण आपल्या बायकोबरोबर भांडण करून काशीस गेला. पुढें सहा महिन्यानंतर त्याचे घरीं कागद आला कीं, अमूक ब्राम्हण अमक्या गांवीं मेला. त्याचेजवळ कपडे आणि २० रुपयांचें सामान होतें. तें त्यानें मरणापूर्वीं सांगितल्याप्रमाणें आम्हीं गांवच्या लोकांनीं जमून त्याचा खर्च करून त्यास अग्नि दिला. मरणापूर्वीं त्याचेपासून गांवाचें, भावाचें व बायकोचें नांव विचा-

रून घेतलें होतें. त्यावरून हा कागद आम्हीं गांवच्या लोकांनीं लिहून पाठविला आहे.

असा कागद वाचून त्याच्या भावानें त्याचें क्रियाकर्म करून त्याच्या बायकोचे चुडे फोडणें इत्यादि कृत्य केलें. नंतर एक महिना झाल्यावर तो आपल्या बायकोच्या स्वप्नांत येऊन म्हणाला— मी भूत होऊन आलों आहें. तूं माझी चाकरी केली नाहींस म्हणून तुला मी पीडा करीन.

असें स्वप्न पडतांच ती जागी होऊन रडूं लागली. सकाळीं तिला ताप भरला व ती खेळूं लागली. ती म्हणूं लागली कीं, कधीं कधीं मी माझा धनी दृष्टीनें पाहतें. मरणाराचा जो भाऊ होता तो भुतादिकांच्या गोष्टी खऱ्या मानित नव्हता. तो म्हणे कीं, मी दृष्टीनें भूत पाहीन किंवा माझ्या आंगात येईल तेव्हां मी खरें मानीन.

सुमारें सात महिने लोटल्यावर एके दिवशीं दोन घटका रात्रीं ती बाई घरांत बसून रडत होती. त्यावेळीं तिच्या घराच्या दरवाज्यांत तो मरणार, ब्राम्हण प्रत्यक्ष दिसला. त्याला पाहतांच, ती बाई रडण्याची बंद झाली. पण तिला भीति वाटूं लागली.

त्यासमयीं समोरच्या घराच्या बारींत त्या मरणार ब्राह्मणाच्या भावाची बायको बसली होती, तिच्या तो दृष्टीस पडला. तेव्हां

तिनें आपल्या नवऱ्यास बोलावून ह्मटलें—पहा तो तुमचा भाऊ उभा आहे. असें ऐकतांच तो आपल्या भावास पाहण्याकरितां खालीं आला. इतक्यांत तो नाहींसा झाला.

नंतर त्यानें आपल्या भावजईस विचारलें कीं, माझा मरणार भाऊ आतां दिसला होता तो कोठें गेला ? तिनें सांगितलें—मी डोळे मिटून उघडले इतक्या अवकाशांत नाहींसा झाला तो पुन: दिसला नाहीं.

मग घरांतून बाहेर निघून शेजाऱ्यांस विचारूं लागला, तेव्हां एकानें सांगितलें कीं, मी घरांत जातांना पाहिला. ह्मणून दुसऱ्यास सांगण्यास गेलों व पुन: येऊन पाहतों तों दिसला नाहीं. असा तपास केला परंतु कांहींच खरें झालें नाहीं.

नंतर त्याच्या भावाचें मूल आजारी पडलें. तेव्हां त्याच्या बायकोस संशय आला कीं, आपला मेलेला दीरच आपणास पीडा देत आहे. त्यानंतर एके दिवशीं बकऱ्याच्या रूपानें शेजाऱ्याच्याही दृष्टीस पडून, लागलाच नाहींसा झाला व त्याच्या भावाच्या बायकोस मांजराच्या रूपानें दिसला. अशा गोष्टी पुष्कळ पसरल्यामुळें रात्रीच्यावेळीं गल्लींतून कोणी मनुष्य त्या भुताच्या भीतीनें बाहेर जात नव्हतें.

ती बाई आंगांत आल्यावर आपल्या दिरास ह्मणे कीं, तूं मला भूत झाल्यावर पाहिला असेल तर शपथ वाहा, तेव्हां तो बिचारा

कांहीं बोलेना. तो विचार करूं लागला पण कोणतीच गोष्ट त्याच्या विचारांत येईना. त्यावरून त्याचें मन डगमगूं लागलें आणि मनांत ह्मणाला कांहीं अंशीं भुतांच्या गोष्टी खऱ्या असतील.

त्या भुताचा मोक्ष होण्याकरितां, त्यानें पुष्कळ उपाय केले. शेवटीं त्याच्या सांगण्यावरून त्याची घरांत स्थापना केली. तरी त्या बाईच्या आंगांत यावयाचा तो येतच होता.

या गोष्टीस दोन वर्षें लोटल्यावर, तो काशीस जाणारा ब्राह्मण त्या गांवाच्या शेजारवाडींत एक गोसावी राहत होता, तेथें येऊन उतरला व गोसाव्यास पूर्वींची सर्व हकिगत सांगून ह्मणाला— मी माझ्या घरीं मेल्याबद्दल कागद पाठविला होता. व एके समयीं दोन घटका रात्रीस गुपचूप मी घरीं पाहण्यास गेलों होतों. त्यावेळीं मनांत आणलें कीं, या रांडेला चांगली रडूं दे मग घरीं जाईन. असा विचार करून सेतुबंध रामेश्वराच्या यात्रेस जाऊन आलों.

नंतर त्या गोसाव्यानें त्याच्या भावास, तुझा भाऊ आला आहे अशी खबर दिली. तेव्हां त्याचा तो भाऊ तेथें येऊन, त्यास घरीं घेऊन गेला व घरांत स्थापलेलें स्थान काढून टाकिलें. त्यास आलेला पाहतांच सर्व लोक त्या बाईची थट्टा मस्करी करूं लागले व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें.

त्या गोष्टीचा विचार करितां कित्येकजण असें ह्मणूं लागले

कीं, भूत, प्रेत व पिशाच्च वगैरे आकाशांत नेहमीं फिरत असतात. तीं मनुष्याच्या शरिरांत शिरून अशा खोट्या गोष्टी सांगतात.

वर लिहिलेल्या ब्राह्मणाचे दोन मुलगे हल्लीं जीवंत आहेत, त्याचें नांव प्रगट केल्यानें त्यास दुःख होईल, ह्मणून लिहिलें नाहीं.

आतां हा ग्रंथ करणारा ह्मणतो कीं, बांधवहो ! या गोष्टीचा विचार करून पहा की, जर तो ब्राह्मण परत आला नसता, तर समंजस मनुष्यांसही भुतांबद्दल भ्रम राहिला असता. यासाठीं अशी गोष्ट नजरेनें पाहून, अशा भुतांचा भ्रम कोणी धरणार नाहीं.

आतां मांजररूपी भुताची गोष्ट पुढें लिहितों.

---

## प्रकरण १८ वें.

—०—

### दोन मार्जाररूपी भुतांची गोष्ट.

एखादा मनुष्य अशा भुतांच्या गोष्टी खऱ्या मानीत नसला, तर त्याचें आणि माझें पुष्कळ संभाषण चालतें. त्या मनुष्यानें भुतांच्या शोधाच्या गोष्टी ऐकल्या असतील, त्या तो मला सांगतो व मी ऐकल्या असतील त्या त्यास सांगतों. आतां एका मनुष्याच्या तोंडून ऐकलेली गोष्ट मी खालीं लिहितों.

दोन रजपूत बंधु समोरासमोर हत्यारांच्या लढाईनें एका घरांत मरण पावले होते. त्या घरांत एक कुणबी भाडोत्री राहत होता. व त्या घरवाल्याच्या गोधडयांची एक रास व कपडयांची एक गठडी एका कोनांत ठेविली होती. त्या घरांत एके समयीं दोन मोठीं मांजरें भांडूं लागलीं. तेव्हां तो कुणबी भिऊन घराबाहेर पडला व सर्व शेजाऱ्या पाजाऱ्यांस बोलावूं लागला.

नंतर शेजारच्या घरांतून दिवा आणून, पांच सात असामी मिळून तीं मांजरें पाहण्याकरितां घरांत शिरले; इतक्यांत तीं मांजरें तेथेंच नाहींशीं झालीं. त्यांचा पुष्कळ तपास केला, पण कोणाच्या पाहण्यांत तीं आलीं नाहींत.

तेव्हां तो कुणबी रात्रीं शेजाऱ्याच्या घरीं निजला व सकाळीं उजाडल्यावर दुसरें घर भाडयानें घेऊन त्यांत राहूं लागला. त्याचें सामान वगैरे त्या भूतांच्या घरांत होतें; तें पांच सहा असामी बरोबर घेऊन, आपल्या या नव्या घेतलेल्या घरांत घेऊन आला.

त्या घरास घरधन्यानें कुलूप मारून टाकलें. त्या घरांत दर चवथे किंवा पांचवे दिवशीं त्या मांजराचें भांडण होत असे. त्यावेळीं जे मनुष्य भुतांच्या गोष्टी खऱ्या मानीत नव्हते; त्यांस गांवांतील लोक सांगत कीं, तुह्मांस भूतें पाहावयाचीं असतील तर अमक्या रजपुताच्या घरांत दिवसाढवळ्या भूतें भांडत असतात, तीं जाऊन पहा.

नंतर कोणी पाहावयास गेला व कदाचित् त्या मांजरांचें भांडण चाललें असलें तर घर उघडून आंत गेले कीं, तीं मांजरें लगेच नाहींशीं होत. त्यांचा बाहेर जाण्याचा रस्ताही कोठें आढळेना. त्यावरून समंजस मनुष्यास त्याचें आश्चर्य वाटत असे. तीं शेजाऱ्याच्या घरांतील अन्नही खाऊन जात असत. कोणी सांगे कीं, एक पुरुष मी हातांत तरवार घेतलेला त्या घरांत बसलेला आज रात्रीं पाहिला ! अशा प्रकारच्या अनेक दंतकथा चालत असत.

त्याच गांवांत एका ब्राह्मणाच्या घरीं विवाह होता. त्याच्या जानवशाकरितां जागा कोठें मिळेना. तेव्हां सर्वांनीं ठरविलें कीं, या भुतांच्या घरांत सामान पडून राहील. व रात्रीं निजण्याबसण्याची सोय शेजारच्या घरीं करतां येईल.

ही गोष्ट सांगणारा ब्राह्मण जानोशांत होता. अशी या भुतांची गोष्ट ऐकून, त्यांच्या शोधाकरितां ह्मटलें कीं, मला याच घरांत रात्रीं निजावयाचें आहे.

तेव्हां दुसऱ्या मनुष्यांनीं सांगितलें कीं, हे दादा ! अशी दांडगाई करूं नको. उगाच जिवावर जोखम आणूं नको. अमूक ठिकाणीं एक मनुष्य भुताचा शोध करण्यास गेला होता, त्याला भुतानें पछाडल्यामुळें मरण आलें ? अशा अनेक गोष्टी सांगून त्याला तेथें निजूं दिलें नाहीं. आणि पुनः सांगितलें कीं, तुह्मी भुताची

गोष्ट खरी मानीत नसाल, तर पहा एखादवेळीं! या घरांत भूतें भांडण करितात तीं ऐका.

नंतर एके दिवशीं तीं मांजरें घरांत भांडत असतां, त्यांचा आवाज त्यानें ऐकिला, तेव्हां दार उघडून पाहूं लागला तों तेथें कोणी नसून, तीं बाहेर जाण्याचा रस्ताही त्यास आढळला नाहीं मग त्या ब्राह्मणानें त्या घराची चावी आपल्याजवळ ठेविली आणि रात्रीं दिवा घेऊन, गुपचूप त्या घरांत जाऊन निजला. थोड्या वेळानें तीं मांजरें भांडूं लागलीं. तेव्हां तो जागा होऊन उठून बसला. इतक्यांत तीं मांजरें पळून गेलीं. त्यांचा पळून जाण्याचा रस्ता, जुन्या कपड्यांची जी गठडी कोनांत ठेविली होती तिच्या खालून होता. सकाळीं तो रस्ता सर्वांस दाखवून, ती वाट त्यानें बंद करून टाकली.

त्यांतील एक मांजर शेजाऱ्याच्या घरीं आलें होतें, त्यास पाहतांच तो ब्राह्मण ह्मणाला—हेंच मांजर रात्रीं भांडत होतें. त्या दिवसापासून तो ब्राह्मण बारा दिवसपर्यंत त्या घरांतच निजला. पण तेव्हांपासून त्या मांजराचें भांडण मुळींच झालें नाहीं. व भूतही कोठें आढळलें नाहीं.

अशी भुतांबद्दल शोध करण्याची हिंमत आपल्या लोकांत थोडी असते. गुजराथेंत हिंमतवानाचा एक दृष्टांत मी ऐकिला आहे, तो खालीं लिहितों.

# प्रकरण १९ वें.

—०—

## गुजराथ्याच्या हिंमतीचा दृष्टांत.

एक शिपाई एका गांवीं जात होता. त्याला रस्त्यांत फार तहान लागली, ह्मणून रस्त्यांत शेताच्या बाजूस एक हौद पाहून पाणी पिण्याकरितां तेथें गेला. त्यांत एक बेडूक डरांव डरांव असें ओरडत होता. तें ऐकून तो मियां शिपाई बाहेरच उभा राहून ह्मणाला, "अबे, साले डरांव डरांव क्या करते हो? डरे ओ तो दुसरा, हम डरनेवाला नहीं. हमकू तु पिछानता है? हमारा नाम समसेरखां है. हम सरकार हजुरकी नोकरी करनेवाला! हमारा बावा बडी लढाईमें मर गया है. उसका बेटा हम है. जो जल भरना होय तो, वहां नजदिक आयके भर लेवुं. लेकिन जा तेरेकु छोड देता हूं." असें बोलून मियां निघून गेला. नंतर दोन कोस पुढें जाऊन पाणी प्याला.

हिमतवान् माणसें गुजराथेंत पुष्कळ आहेत. त्यांस भुतांचा भ्रम उत्पन्न होणें हें कांहीं अशक्य नाहीं. मी तर असा विचार करितों कीं, अशा भुतांच्या गोष्टी खऱ्या मानणें हेंच मोठें आश्चर्य होय. अशा खोट्या भ्रमाचा खरा विश्वास कसा येत असेल? तीं मनुष्यें आपल्या मनांत काय समजत असतील? आणि अशा

गोष्टी खऱ्या मानण्यांत त्यांस काय लाभ होत असेल ? आतां एवढी मात्र गोष्ट खरी कीं, भूत काढणाऱ्या लोकांची उपजीविका यांतून चालत असते. त्यापासून तशा लोकांस लाभ आहे. परंतु दुसऱ्या लोकांस त्या भ्रमापासून मोठें दुःख होऊन माणसांची हानी होते. यास्तव जो समंजस मनुष्य परोपकारी असेल, त्यानें असे भ्रम मिटविण्याचे उपाय करावे. ही एक पुण्याची वाट आहे. जसें एखादें जनावर आपली छाया पाहून, भडकून पळतां पळतां खळग्यांत पडतें, तद्वत् पशुसारखीं जीं बिचारीं भोळीं मनुष्यें आहेत, तीं भुतांच्या भ्रमानें भडकून मरण पावतात.

आतां तापी हौदावरील भुताची एक गोष्ट मी ऐकिली आहे, ती खालीं लिहितों.

## प्रकरण २० वें.

—०—

### तापी हौदावरील भुतावळ.

जोधपूर शहरांत उजाड जाग्यांत एक तापी नांवाचा हौद आहे, त्यांत भुतावळ राहते. अशा गोष्टी परंपरेनें चालत आल्या आहेत. तेथें आठ वर्षांवर भुतावळीचा जोर जास्त वाढला आहे, तो असा कीं, तिकडे जाणाऱ्या येणाऱ्या हडळी पुष्कळ लोकांच्या पाह-

येतात. व रात्रीं त्या ठिकाणीं कोणी मनुष्य जाऊं शकत नाहीं. जर कांहीं जरूरीचें काम असलें आणि कोणी तिकडे गेला तर त्यास हडळ समोर मिळते, तिच्या तोंडांतून अग्निसारखा भडका निघतांना पाहतांच, तो मनुष्य तेथून पळत सुटतो.

या हडळीचें बिलगणें पुष्कळ मनुष्यास झालें असून त्यांतील चार पांच मनुष्यें मरण पावलीं, व कित्येकांचे आंगावरून उतारेही काढिले. जे कोणी भुतांच्या गोष्टी खोट्या मानतात, त्यांस प्रत्यक्ष भूत या हौदावर पाहण्यास मिळेल.

त्या शहरांत एक ब्राह्मण जोशी शंभुदत्त कवि ह्मणून होता. तो तेथील राजाचा आश्रित होता तो भुतांच्या गोष्टी कधींही खऱ्या मानीत नव्हता. त्यानें एके दिवशीं रात्रीं त्या हौदावर हडळ जातांना पाहिली; तिच्या तोंडातून अग्निच्या ज्वाळा निघतांना पाहतांच, तो ब्राह्मण विचार करूं लागला कीं, माझ्या दृष्टीस कधीं खोटा भ्रम उत्पन्न झालेला नाहीं आणि भुतांच्या गोष्टीही मी कधीं खऱ्या मानित नाहीं. असें असतांही हडळ माझ्या पाहण्यांत आली ? तर हें काय असेल ? या गोष्टीचा शोध बरोबर केला पाहिजे.

असा विचार करून, ती गोष्ट त्यानें राजास सांगितली. व राजाचे पांच शिपाई बरोबर घेऊन, एके दिवशीं रात्रीच्यावेळीं तेथें गेला. जातांच ती हडळ आंत शिरतांना दृष्टीस पडली. तिच्या मागें तो धांवत गेला, त्याबरोबर तिनें त्यास भिवविण्याकारितां हा-

ताची टाळी वाजविली. हुंकार शब्द उच्चारले, दगड फेंकू लागली व तोंडातून अग्निच्या ज्वाळा काढून दाखवूं लागली. तरी तो न डगमगतां आडवी ढाल धरून त्या हौदांत गेला.

त्या हौदास आंतून दुसरा रस्ता होता, तेथें अंधार असून कचरा भरलेला होता. त्या रस्त्यानें ती हडळ पळूं लागली. तेव्हां तो ब्राह्मण शिपायांसह मागोमाग जाऊन तिचे केंस धरून मागें ओढून तिला मारूं लागला. तेव्हां ती ह्मणूं लागली कीं, मी भूत किंवा प्रेत नव्हे मी मनुष्य आहें, मला माराल तर मी मरेन, मी अमक्या ब्राह्मणाची बायको आहें. दुसरा अमूक मनुष्य मला भुलवून येथें घेऊन येतो. मी येथें येतां जातांना कोणी मला पाहतील, ह्मणून त्यांस भिवविण्याकरितां राळ व गंधक कागदाचे भुंगळींत घालून ती भुगळी पेटवून जवळ ठेवितें. ती फुंकून मी अग्निच्या ज्वाळा दाखवीत असतें.

मी ज्या पुरुषाकरितां येथें आलें आहे, तो अझून आला नाहीं. तुह्मी माझी अब्रू घ्याल तर मी अपघात करून मरेन. त्यानें तुह्मांस पाप लागेल. ह्मणून माझी फजिती करूं नका. इतःपर मी कधींही येथें येणार नाहीं. जर आलें तर माझें नाक, कान कापा. ही माझी विनंती ऐकून, मला सोडून द्या. त्या दिवसांपासून त्या हौदांतील भुतावळीबद्दलचा भ्रम नाहींसा होऊन, ती गोष्ट जगजाहीर झाली.

अशा गोष्टी मी पुष्कळ ऐकल्या आहेत. आणखी पाहिलें आहे कीं, कित्येक व्यभिचारिणी स्त्रिया, जार पुरुषाबरोबर प्रिति संबंध ठेवून, सासरीं जात नाहींत, त्यांस सासरीं राहणें आवडत नाहीं. व याराशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं. तेव्हां आंगांत आणून खेळूं लागतात आणि सांगतात कीं, तेथें मला भूत नडतें ह्मणून सासरीं राहवत नाहीं. अशा मिषानें याराबरोबर राहतात.

कित्येक भोळया माणसांस खऱ्या मनानें भुतांचा भ्रम उत्पन्न होतो. तो असा कीं, एका भोळया मनुष्यास पोटांत सरडा गेल्याचा भ्रम झाला. त्याची गोष्ट खालीं लिहितों.

---

## प्रकरण २१ वें.

### सरडा पोटांत शिरल्याचा भ्रम.

एक भोळा मनुष्य उतावळीनें झाड्यास जाऊन बसला. त्यावेळीं एक सरडा त्याच्या समोरून धांवत आला. त्याचें घर त्या झाड्यास बसलेल्या मनुष्याच्या दोन पायांच्यामध्यें जमिनींत असावें. तेथें तो नाहींसा झाला. तो सरडा समोरून येतांना त्या भोळया मनुष्यानें पाहिला पण कोठें गेला तें त्यानें पाहिलें नाहीं. त्या मनुष्याला मुळव्याधीचा विकारही होता. तेव्हां त्यास असा भ्रम झाला कीं, माझ्या पोटांत सरडा शिरला.

नंतर त्या भ्रमानें पुष्कळ वैद्यांस विचारून औषधें खाऊं लागला. कित्येक मनुष्यांनीं ती गोष्ट खरी मानली नाहीं पण त्या भोळ्या मनुष्याच्या मनाला पक्केंपणीं असें वाटलें कीं, सरडा माझ्या दोन पायांच्यामध्यें आलेला मी पाहिला खरा. आणि तो तेथें नाहींसा होण्यासारखें टिकाणही नव्हतें. व तेव्हांच माझ्या पोटां-तही दुखूं लागलें. ह्मणून मी तेथें चांगलें न्याहाळूनही पाहिलें होतें. पण तो दिसला नाहीं. त्यावरून तो माझ्या पोटांत खरो-खरच गेला. ज्या मनुष्याला असें दुःख कधीं झालेलें नाहीं व कधीं ऐकलेंलेंही नाहीं तो खरें कसें मानील ?

नंतर पुष्कळ माणसांनीं त्याला खोटा ठरविला. तेव्हां ती गोष्ट कोणाजवळ बोलत नसे. परंतु त्या भ्रमामुळें त्यास काळजी उत्पन्न होऊन त्याचें शरीर शुष्क झालें व सदोदित आजारी राहिला. पुढें त्याला एक समंजस वैद्य मिळाला. त्यानें एकांत स्थानीं त्या मनुष्यास नेऊन रोगाचें कारण विचारलें आणि म्हटलें. हा रोग तुला कशानें झाला आहे ? तेव्हां तो ह्मणाला—मला कांहीं माहिती पडत नाहीं; पण मी तुह्मांस असें विचारतों कीं, सरडा पोटांत जातो हें खरें काय ? वैद्य ह्मणाला होय, जातो खरा.

मग तो भोळा मनुष्य ह्मणाला—मी कित्येक वैद्यांस व दुसऱ्या मनुष्यांस ही गोष्ट ऐकविली. ती ऐकून त्यांनीं मला मूर्ख ठरविलें. ह्मणून मी ती गोष्ट कोणाजवळ बोलत नाहीं. पण एके दिवशीं

नला तसा प्रकार झाला होता. असें बोलून पूर्वीपासून झालेली हकिगत त्या वैद्यास सांगितली.

तेव्हां वैद्य मनांत समजला कीं, या मनुष्याच्या मनांत भ्रम बसलेला आहे. तो भ्रम गेल्याशिवाय याच्या शरिरास सुख वाटावयाचें नाहीं. नंतर वैद्यानें त्याला औषध सुरू केलें. प्रथम त्याला अन्न पचन होण्याच्या गोळ्या दहा पंधरा दिवसपर्यंत दिल्या. पौष्टिक अन्न सुरू केलें; नंतर एरंडेलाचा जुलाब दिला. मग त्या वैद्यानें एका नीच जातीच्या मनुष्याकडून एक मेलेला सरडा मागविला व तो त्याच्या झाड्यास जाण्याच्या ठिकाणावर ठेविला. आणि त्याच्यावर राख टाकविली. त्यानें जुलाब घेतांच त्याला तीन चार पातळ झाडे झाले. ते पातळ झाडे त्या राखेवर पडतांच तो राखेखालील सरडा दिसूं लागला. तो पाहतांच, तो भोळा मनुष्य मोठ्या उतावळीनें वैद्यास व जीं माणसें त्याची गोष्ट खरीं मानीत नव्हतीं त्यांस सांगूं लागला कीं, माझ्या पोटांतून सरडा निघाला.

मग त्या वैद्यास त्यानें बक्षिस दिलें, त्या दिवसापासून त्या भोळ्या मनुष्याचा भ्रम निघाल्यामुळें त्याच्या शरीरास सुख वाटूं लागलें. अशाच प्रकारें गुजराथेंतील भोळ्या माणसांचा भुतांबद्दल भ्रम नाहींसा होतो. पण तशा माणसांस चांगली समजूत दिली तरी त्यांचा भ्रम जात नाहीं. कदाचित् तोंडानें होय ह्मटलें तरी भोळ्या मनुष्यांच्या मनांतील भ्रम जात नाहीं.

ज्यावेळीं पक्का भूत उतरणारा मिळतो. तेव्हां त्या भुतास धरून एका कांचेच्या बाटलींत भरून, ती बाटली समुद्रांत टाकितात. किंवा जमिनींत खळगा खणून गाडतात अथवा लिंबांत उतरून तें लिंबू पुरून टाकतात. त्याबद्दलची खरी गोष्ट पुढें लिहितों.

---

## प्रकरण २२ वें.

—०—

### लिंबांत भूत उतरणें.

सुमारें तीस वर्षांपूर्वीं एक भाट एका गांवांतील राजाजवळ रुपये मागत होता. तो राजा देत नव्हता. तेव्हां त्या भाटानें आपल्या जातीचीं सुमारें चाळीस माणसें जमवून त्या राजाजवळ गेला. वेशीच्या दरवाज्याजवळ जातांच, हा भाट आल्याची बातमी राजास कळतांच, त्यानें दरवाजा बंद करून घेतला. मग तो भाट गांवाबाहेरच राहिला.

त्या सर्वांनीं तीन दिवस निराहार उपवास करून चवथे दिवशीं आत्महत्या केल्या. त्यांत कित्येक पुरुषांनीं आपले हात कापले, एका म्हातारीचें डोकें कापून दरवाज्याला तोरण बांधलें. कित्येक बायकांनीं आपले स्तन कापले, एका म्हाताऱ्यास गळीं घातला. एका पोरीस किल्ल्यावर आपटली. नंतर तो भाट

स्वत: तेलाचे कपडे अंगांत घालून ते पेटवून जळून मेला. तो जळतेवेळीं असें म्हणाला कीं, मी तर मरतोंच, पण या राजाच्या दरबारच्या जागीं बिनडोक्याचा खवीस होऊन राहीन व या ठाकूरचा जीव घेईन; त्याचा वंशही राहूं देणार नाहीं. असें बोलून मरण पावला.

त्याचीं बाकी राहिलेलीं माणसें घरीं गेलीं. पुढें तिसरे दिवशीं त्या माडीच्या दादरावरून भुतानें राणीस खालीं लोटून दिलें. त्यामुळें तिच्या शरीरास फार इजा झाली. तो बिनडोक्याचा खवीस त्या माडीवर कित्येक माणसांच्या पाहण्यांत आला नंतर त्या ठाकुराच्या अंगांत येऊन खेळूं लागला. रात्रीच्यावेळीं माडीवर धोंडे फेकूं लागला, एका मुलीस पछाडून तिचा जीव घेतला. असे पुष्कळ प्रकार त्या भुतानें केले. त्यामुळें दिवसास देखील त्या माडीवर कोणी जाईनासें झालें.

त्या भुतास काढण्याकरितां जोगी, जती, फकिर व ब्राम्हण देशोदेशींचे बोलावून आणिलें. जे कोणी त्या भुतास काढण्याकरितां येऊन ठाकूरास खेळवित असत, त्यांसच तें भूत ठाकुराच्या अंगांत येऊन मारूं लागे आणि अशी भयंकर आरोळी देई कीं, तिच्यामुळें भूत काढणाराची हिंमत खचून तो निराश होई.

अशा प्रकारें पांच वर्षें लोटलीं, या भ्रमानें कित्येक माणसें मरून गेलीं. पण कोणाचा उपाय चालला नाहीं. नंतर एक पर-

दे गी जति त्या गांवांत आला होता, त्याला गाडी पाठवून दरबारांत आणिलें. त्याच्याबरोबर सात आठ माणसें होतीं. तो जादुविद्या जाणण्यांत मोठा प्रसिद्ध होता, तो या गांवांत आला

मग त्यानें कित्येक वस्तु मागवून त्या माडींत बसून प्रयोग केले. प्रथम त्या माडींत सुत मंत्रून वाटोळें लाविलें. दूध व पाणी मंत्रून सभोंवार धार सोडिली. लोखंडाचे खिळे मंत्रून, त्या माडीच्या चार कोनांत चार व दरवाज्यांत दोन ठोकले. नंतर ती माडी सारवून, मध्यें देवाची स्थापना केली, तरवार उघडी ठेविली, तूप, तेलाचे दिवे लाविले आणि मग मंत्र साधनास बसला.

एकेचाळीस दिवस प्रयोग केल्यावर कांहीं उतारे ठेविले. कित्येक जातींचीं बळिदानें घेऊन दररोज स्मशानांत जात होता. तो ठाकूर दुसऱ्या ठिकाणीं राहत असून, त्याच्या आंगांत भूत खेळत होतेंच. तें ह्मणत असें कीं, अरे मूढा, तूं मला काढावयास आला आहेस ? मी जाणार तर नाहींच परंतु तुझ्या जिवाला मात्र धोका बसेल !

तो जती त्या माडीच्या बाऱ्या व जाळया गच्च लावून प्रयोग करीत बसत असे. पण लोक असें सांगत कीं, त्या माडीवर त्या समयीं धोंडे पडत होते व बाऱ्या, दरवाजे व जाळ्या यांवरही धोंडे वाजत असत.

प्रयोग पुरा झाल्यावर त्या जातीच्या माणसांनीं माडीवर स्थापलेल्या देवाजवळ त्या ठाकूरास नेलें. आणि माडीवर बोललें असतां तें बोलणें जितकें लांब ऐकूं जाईल तितक्या जाग्यांत त्या ठाकूराच्या कोणाही मनुष्यास राहूं दिलें नाहीं.

नंतर ठाकूराच्या आंगावर उडीद फेंकून, व थाळी वाजवून, त्यास खेळवूं लागले. तेव्हां ठाकूर मस्ती करूं लागला; त्यावेळीं जती व त्याचीं माणसें यांनीं त्यास खूब चोपून मार दिला.

अशाप्रकारें त्याचें शरीर निर्बल करून, मग त्याच्या दरबारांतील माणसें जवळ बोलाविलीं. (प्रथम त्या माणसांस असें समजाविलें होतें कीं, येथून बोलणें ऐकूं न जाईल, एवढ्या जाग्यांत जो कोणी राहील, त्याच्या शरीरांत तें भूत शिरेल. ) व तेथें हवन करून एक लिंबू पुढें ठेवून भुतास ह्मणाला—तूं आतां यांत शिर. तेव्हां ठाकूर ह्मणाला कीं, तूं तर काय ! पण तुझा देव आला तरी मी याच्या शरिरांतून निघणार नाहीं.

अशी मेहनत करतां करतां दुपारचे बारा वाजले. नंतर त्या माडीवरून उतरून खालीं चौकांत मंडळ केलें. कित्येक प्रकारचे धूप मागविले. पाणी मंत्रून शिंपडलें. असें करून त्या भुतास लिंबांत उतरलें. तेव्हां तें लिंबू नाचूं लागलें. असें पाहतांच सर्व माणसें त्या जतीची वाहवा वाहवा करूं लागलीं. व लिंबांत भूत उतरलें असा सर्वांनीं एकच गोंगाट केला.

तें लिंबु नाचतांना पाहतांच, त्या ठाकुरास आश्चर्य वाटून तो खेळण्याचा बंद झाला. आणि मनांत समजला कीं, माझ्या शरीरांतील भूत या लिंबांत उतरलें.

नंतर त्या जतीनें गांवांतील सर्व लोकांदेखत तें लिंबु गांवाच्या पूर्व दरवाज्यानें बाहेर काढलें, लिंबु नाचत असतां, वांकडें तिकडें जाऊं लागलें कीं, जती पुढें काठी लावून अडवित असे. मग तें नीट सरळ रस्त्यानें चाले. जतीनें बरोबर डांक वाजविणारेही घेतले होते तसेंच सनया, ढोल पुढें वाजत होते. कित्येक मनुष्यांच्या हातांत उघड्या तरवारी देऊन ठाकुरासही बरोबर घेतला होता. तें लिंबू नाचत असतां, त्याच्या मागून राई, सिरस व मीठ टाकीत असे.

अशाप्रकारें तें लिंबु गांवाच्या सीमेवर नेलें. आणि तेथें सात हात खोल खाडा खणून त्यांत पुरलें व त्याच्यावर १। मण राई, १। मण सिरस व ७ मण मीठ टाकिलें. त्यावर माती व धोंडे रचून, त्या धोंड्यांच्या सांधींत शिशाचा रस करून ओतला आणि त्या खळगीच्या चारी दिशांस सवा सवा गज लांबीचे खिळे मंत्रून ठोकले.

ज्यावेळीं लिंबु सिमेवर नेवून पोंचविलें, त्यावेळीं गांवांतील लोकांचा विचार असा झाला होता कीं, हें भूत आपल्या गांवाच्या

---

१ मी समजतों कीं, नाक्यानाक्यावर लिंबु नाचवून दाखविलें असेल, आणि मग हातांत घेतलें असेल. )

सिमेच्या बाहेर पुरलें असतां बरें होईल. पण तेथें शेजारच्या गांवचेही लोक पाहण्यास आले होते; ते ह्मणाले कीं, तुमच्या गांवची सीमा सोडून, आमच्या हद्दींत जर या भुतास पुराल तर तुमचा आमचा मोठा तंटा होईल.

तेव्हां जती त्या माणसांस ह्मणाला—कांहीं चिंता करूं नका. या भुतास सात हात खालीं जमिनींत गाढूं व त्यावर मीठ टाकूं. ह्मणजे तें मीठ त्याचें शरीर खाऊन थोड्याच दिवसांत मरेल. व वर शिसें ओतूं ह्मणजे तें भूत बाहेर निघूं शकणार नाहीं.

मग तें भूत त्या ठाकुराच्या हद्दींत पुरून गांवांत आले. तेव्हांपासून त्या गांवांतील लोकांचा भुताबद्दलचा भ्रम नाहींसा झाला. मग त्या ठाकुरानें जतीला शेला पागोटें दिलें. त्यावेळीं सर्व लोकांनीं निश्चय केला कीं, असे भूत काढणारे समर्थ या हिंदुस्थानांत थोडेच असतील. पण त्याचें कारण कोणाला समजलें नाहीं.

आतां त्याचें कारण माझ्या समजण्यांत जें आलें तें लिहितों—प्रथम माझ्याजवळ भूत काढण्याचे मंत्र व तंत्रें पुष्कळ होतीं. पण लिंबांत भूत उतरण्याचा मंत्र नव्हता. तो शिकण्यासाठीं कोणी मंत्र तंत्र जाणणार देशी किंवा परदेशी मिळाल्यास मी त्याची चाकरी करीत असें. व त्यांस कांहीं पैसेही देत असें. त्यांचेजवळ तो मंत्र मागितला तेव्हां ते ह्मणत—हा मंत्र शिकविणारानें शपथ

घातलेली आहे कीं, हा मंत्र दुसऱ्या कोणास शिकवूं नये. ( सर्व जादुगार लोकही असेंच सांगतात. )

नंतर एक जादुगार ब्राह्मण मला मिळाला, त्याची व माझी चांगली मैत्री जमली. तेव्हां तो ह्मणाला—लिंबांत पारा भरून तें गरम केलें असतां नाचूं लागतें. दुसरें कांहीं कारण नाहीं. पण ती कृति मी करून पाहिली नाहीं. कदाचित या रीतीनें तसें न झाल्यास, दुसरी कांहीं वस्तु लिंबांत घातल्यानें तें नाचत असेल, ही खरी गोष्ट आहे.

त्या जतीनें इतकें जे अवडंबर केलें तें सर्व भोळया लोकांचा भ्रम मिटण्याकरितांच होय. जसा पोटांत सरडा शिरल्याचा भ्रम त्या वैद्यानें नाहींसा केला, तसाच भुताचा भ्रम मिटतो. भ्रमाची उत्पत्ति अशाच प्रकारें होते; दुसरें कांहीं कारण नाहीं.

ज्या ठिकाणीं भुतांबद्दल संशय मानिला असतो, त्या ठिकाणीं पाय लचकून पडल्यास तेथेंही भुतांचा भ्रम उत्पन्न होतो कीं, मला कोणी धक्का मारला, त्यामुळें मी पडलों. नंतर भूतानें पछाड- ल्याचा भ्रम उपजतो. जसें भूत लिंबांत उतरतात तसेंच कांचेच्या बाटलींतही उतरतात. तें उतरण्याचे वेळीं बाटलींत मोठा आवाज होतो. तो ऐकून खेळणारा मनुष्य आश्चर्यचकित होऊन खेळ- ण्याचा बंद होतो. आणि मनांत समजतो कीं, माझ्या आंगांतील भूत या बाटलींत येऊन बसलें आहे. मग त्या भुताबद्दलचा भ्रम

माहींसा होतो. ती बाटली गांवांच्या सीमेवर नेऊन लिंबासारखीच पुरतात. किंवा समुद्रांत टाकतात, त्याबद्दलच्या गोष्टीही लोकांत पुष्कळ चालतात.

एकेवेळीं एका सावकारास समुद्रांतून एक बाटली मिळाली होती. तिचें तोंड उघडतांच आंतून भूत निघालें, कोणी म्हणतात. घराचा पाया खोदीत असतां एक बाटली सांपडली, तींतून भूत निघून कांहीं बोललें. अशा मी पुष्कळ गप्पा ऐकिल्या आहेत, त्या किती लिहूं ! त्या बाटलींत आवाज होण्याचें कारण असें असेल कीं, भुजच्या राजाच्या दरबारांत एक वाद्य मी पाहिलें होतें. तें कांचेच्या बाटलीसारखेंच होतें त्याची कळ चढवून सत्संगी रणछोड भाई उभा राहिला. तोंच त्यांत मोठा शब्द होऊं लागला. आणखी हुडरमध्यें एका फकिरानें बाटलींत भूत उतरलें होतें. त्या बाटलींत पारा भरला होता. ती बाटली गांवाबाहेर नेऊन गाडली होती. तेव्हां तेथें एका मनुष्यास लपवून ठेविला होता. त्यानें तऱ्हेत-ऱ्हेच्या आरोळ्या मारल्या होत्या. हेंच बाटलींतून आवाज हो-ण्याचें कारण असावें असें मला वाटतें. पण भुतांच्या गोष्टी मला खऱ्या वाटत नाहींत.

जीं भोळीं मनुष्यें आहेत, त्यांसच भूत पछाडतें; दुसऱ्यास पछाडित नाहीं. आतां खिजडिया मामाची गोष्ट मी ऐकिली आहे ती लिहितों.

# प्रकरण २२ वें.

---

## खिजडिया मामाची गोष्ट.

एक संघवी डिपो नांवाचा वाणी आहे, त्यानें स्वतः पाहिलेली ही गोष्ट मला सांगितली कीं, आह्मी सुमारें सोळा वर्षांच्या वयाचे होतों. तेव्हां एके दिवशीं सर्व भाऊबंदाची टोळी मिळून, गांवापासून अर्ध्या कोसावर एक धर्म तलाव आहे, तेथें स्नानाकरितां जात होतों. त्या रस्त्यांत एक खिजडिया मामाचें स्थान आहे. त्या ठिकाणीं गेलों. त्यावेळीं एकजण ह्मणाला—या खिजडिया मामाला एकेक धोंडा जो मारणार नाहीं, त्याला बापाची शपथ ?

नंतर सर्व मुलांनीं एकेक धोंडा त्या खिजडिया मामावर मारला. त्यांत एक भित्रा मुलगा होता. त्यानें भुताच्या भीतीनें जवळच एक बाभळीचें झाड होतें त्यावर धोंडा मारला. तरी त्याच्या मनांत भीति राहिलीच.

तो मुलगा घरीं आल्यावर त्याला ताप आला व आंगांत येऊन खेळूं लागला. आणि ह्मणाला—मी खिजडिया मामा आहें. मला यानें एक धोंडा मारिला ह्मणून मी यास पछाडलें आहें. तेव्हां दुसरा मुलगा ह्मणाला—धोंडे दुसऱ्या मुलांनीं मारले व हा मुलगा भिवून यानें बाभळीच्या झाडावर धोंडा मारला होता तेव्हां खेळ-

गारा मुलगा ह्मणाला—जेव्हां एका मुलानें या खिजड्यास एकेक धोंडा मारा ह्मणून शपथ घातली, तेव्हां मी शमीच्या झाडावरून उठून, बाभळीच्या झाडावर जाऊन बसलों. ह्मणून मला या मुलाचा धोंडा लागला. आतां यास मी सोडणार नाहीं.

नंतर त्या मुलास पुष्कळ पीडा दिली. तेव्हां धोळक्याचा एक कुंभार तेथें आला होता. त्यानें ताईत भारून त्याचेवरील भूत काढलें. त्याचें कारण असें कीं, त्या भ्रमिष्ट मुलाचे मनाचा समज असा झाला कीं, हा ताईत माझ्या हातांत बांधीला असतां भूत पळून जाईल. अशा प्रकारें त्याचा भ्रम नाहींसा झाल्यानें त्याचें भूत गेलें. अशा प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी पुष्कळ आहेत त्या सर्व लिहिल्या असतां ग्रंथाचा विस्तार फार होईल. यासाठीं भुतां-संबंधीं कित्येक संक्षिप्त दंतकथा खालीं लिहितों.

## प्रकरण २४ वें.

—०—

### भूतांसंबंधीं कित्येक दंतकथा.

ज्यांस भुतांची भीति वाटते, त्यांसच भूत पछाडतें. त्याबद्दलच्या मी पुष्कळ गोष्टी ऐकिल्या. व पाहिल्या आहेत. त्या लिहिल्या

असतां, त्यांचा शेवट होणार नाहीं. जो भीत नाहीं त्यास तें पछाडित नाहीं. त्यांच्या ही गोष्टी आहेत.

१ एका तलावाच्या कांठीं एक मोठी शिळा पडली होती. तीवर बसून दहा माणसांनीं कपडे धुतले. त्यांपैकीं एक मनुष्य भ्याला, त्याला जीनानें पछाडलें. त्यापासून त्याला दुःख भोगावें लागलें.

२ एका पिंपरीच्या झाडाखालीं एका देवीचें स्थान होतें. तें आठ सुतारांनीं कापलें. त्यांतील एका सुतारास देवीनें पछाडून ती ह्मणाली—प्रथम यानें माझ्यावर घाव घातला

३ एका वाघरण डांकिणीबरोबर दहा बारा वाण्यांचा तंटा झाला होता. त्यांतील दोघांस तिनें पछाडलें आणि खेळून ह्मणाली कीं, माझ्याबरोबर जेवढ्यांनीं तंटा केला, त्या सर्वांचा मी जीव घेईन. पण दुसऱ्यांस मग कांहीं झालें नाहीं.

४ सुरतेंत मोठ्या हवेलींत भुतांच्या भ्रमानें कोणीही मनुष्य रहात नाहीं. ती जागा स्वामी नारायणाच्या धन्यानें थोडे पैसे देऊन विकत घेतली आहे. अशा भुतांच्या भ्रमाच्या रिकाम्या जागा गुजराथेंत पुष्कळ आहेत. अशा जागा कोणी हिमतवान् इसम विकत घेऊन ठेवतात; त्यांच्या पाहण्यांत भूत येत नाहीं.

५ एक जमीनदार देवीच्या मूर्तीसमोर लघवी करावयास बसला होता. त्याच्या आंगांत येऊन देवीनें एक रेडा व एक बकरा मागितला. तेव्हां त्या गांवच्या वाण्यांनीं त्या देवीला एका कोसावर

नेऊन पुरलें. नंतर अशा गोष्टी चालविल्या कीं, देवीनें माझ्या स्वप्नांत येऊन सांगितलें मी चुकीनें रेडा व बकरा मागितला व सकाळीं असे जीव माझ्यासमोर मारावयास आणतील ह्मणून मी पळून अमूक ठिकाणीं लपून बसलें आहे. तर त्या जिवास मारूं नका ह्मणून सांगा.

६ एक रजपूत भुतांच्या गोष्टी खऱ्या मानीत नव्हता. तो भुतें असलेल्या घरांत निजे. त्याला भुतांच्या गोष्टी सांगणाऱ्या एका इसमानें मिठाईंत कैफी पदार्थ घालून खावविला. व त्याचा कैफ चढतांच दुसऱ्या माणसांस तेथें बोलावून, याला भूतानें पछाडलें ह्मणून ठरविलें. नंतर त्याचा तो कैफ उतरल्यावर हें त्याचें कपट कळून आलें.

७ एक यात्रेकरूंचा मेळा जत्रेस जात होता. ते एका गांवाहून रात्रीचे निघाले. तेथून वाटाड्याबरोबर घेतला. होता त्या मेळ्यांतील दोन शिपाई पुढें गेले. तें त्या मेळेवाल्यास माहीत नव्हतें. पुढें एक हौद लागला, त्यांत पाणी पिण्याकरितां ते दोघे उतरले. मागून मेळेवाले येत होते, त्यांस पोंचविणारे वीसजण होते. त्यांच्या हातांत भरलेल्या बंदुका व तिरकमठे होते. त्यांच्याबरोबर तो वाटाड्या गोष्टी करीत चालला होता कीं, आतां पुढें रस्त्यांत एक हौद येईल, त्यांत भूतें राहतात. त्यामुळें दिवसाढवळ्या देखील या रस्त्यानें मनुष्य कोणी जात नाहीं.

असें सांगत असतां, तो हौद जवळ आला. त्यांतून ते दोघे शिपाई पाणी पिऊन बाहेर आले. त्यांस पाहतांच तो वाटाड्या पळूं लागला. त्याच्या मागें सर्व मंडळीही पळत सुटली, कित्येकांच्या बंदुका, पागोट्या व जोडेही रस्त्यांत पडून राहिले.

कित्येक पडले, त्यांच्या शरीरांस इजा झाली. कांहींसे पुढें गेल्यावर ते एके ठिकाणीं मिळाले. तेव्हां मेळेवाल्यानीं पोंचविणारास ठपका दिला कीं, आमचीं माणसें कित्येक पडलीं, त्यांच्या शरीरास लागलें व कित्येक पळूं शकलीं नाहींत. तीं मागें राहिलीं, त्यांस टाकून तुह्मीं पळून गेलां हें कांहीं चांगलें केलें नाहीं. मग तुह्मीं आमचें पोंचतें करण्याचें काम कसें कराल ?

नंतर पोंचविणारे बोलले कीं, आमच्यापुढें लुटारूस्वार शंभर जरी आले तरी त्यांच्यासमोर लढून मरूं. पण भुतांसमोर आमचा जोर चालत नाहीं.

नंतर त्या हौदाच्या दुसऱ्या रस्त्यानें ते मेळेवाले गेले. व ज्यावेळीं त्या दोघां शिपायांस पाहून सर्व पळाले होते, त्यावेळीं ते दोघे समजले कीं, लुटारू आले. त्यामुळें यात्रेकरू पळूं लागले. नंतर ते सर्वजण पुनः हौदांत उतरले. व दोन घटकांनीं बाहेर निघून सर्व एके ठिकाणीं जमले. ही गोष्ट कळतांच, सर्व लोक हसूं लागले. कित्येकांनीं सर्वांस ठपका दिला कीं, तुह्मीं कां बोलले नाहींत ? कीं, आह्मीं आहों तुह्मीं भिऊं नका.

८ एका सावकाराचे खासगी शिपाई खजिना घेऊन जात होते. ते एका गांवांत शेटच्या दलालाच्या घरीं रात्रीं वस्तीस राहिले. तेव्हां ते ह्मणाले आह्मांस उतरण्यास एक एकांत जागा द्या. तेव्हां तो बोलला कीं, एक घर एकांताचें आहे, पण त्यांत भूत राहतें. मग शिपाई बोलले, आह्मीं दहाजण आहों. शिवाय पोंचविणारे पंधराजण बरोबर आहेत. इतक्याजणांस भूत काय करील ? आह्मीं भुतांस भीत नाहीं.

नंतर ते सर्वजण त्या घरांत उतरून, रात्रीचे झोंपी गेले. मध्य-रात्रीच्या सुमारास एक चोर भिंत फोडून आंत शिरला. त्यानें प्रथम टाळ्या वाजविल्या, त्याबरोबर ते दहाजण उठून पळत सुटले. नंतर पोंचविणारे, उठून ढाली तरवारी घेऊन बाहेर उभे राहिले; पण आंत जाण्याची कोणाची छाती होईना. व दिवा लावण्यासही कांहीं साधन नव्हतें. त्यांत एक ह्मातारा होता तो ह्मणाला— आतां आपण दरवाजा बाहेरून गच्च बंद करून येथेंच आडवे निजूं या. नंतर त्यांनीं तसें केलें. सकाळीं उठून पाहतात तों चोरानें भिंतीस भोंक पाडून सामानसुमान घेऊन गेला. फक्त आंगांतील कपडे व त्यांत असलेले पैसे मात्र राहिले.

९ एका गृहस्थाच्या घरीं एक पाहुणा आला होता, त्याला आपल्या राहात्या घरापासून कांहीं अंतरावर दुसरें एक घर होतें त्यांत निजावयास जागा दिली. तो पाहुणा अर्ध्या रात्रीं जागा

झाला आणि तोंडावरील पांघरूण काढून पाहूं लागला तों दोन बायका त्याच्या दृष्टीस पडल्या. त्यांच्या नेसलेल्या साडयांवर चंद्राचें चित्र दिसलें. तें पाहतांच त्याला भीति वाटूं लागली. तेव्हां मारुतीचें नामस्मरण करून, कित्येक देवांच्या शपथा घातल्या कीं, तुह्मीं येथें उभ्या राहाल तर तेतिसकोटी देवांची शपथ, माता बेचारजीची शपथ., मेलडी देवीची शपथ, व कालिकेची शपथ !

असें पुष्कळ बडबडला, पण त्या गेल्या नाहींत. नंतर तो भ्याल्यामुळें मोठ्यानें ओरडूं लागला. तें त्याचें ओरडणें ऐकून शेजारचे लोक जागे होऊन, तेथें आले व त्यास आंतील दाराची कडी काढावयास सांगूं लागले तेव्हां तो ह्मणाला—मला दोघीजणीं दाबून धरून मारीत आहेत, मला उठण्याची शक्ति नाहीं.

नंतर त्या लोकांनीं दरवाज्याच्या फळ्या काढल्या, त्याबरोबर तो पाहुणा खाटेवरून उठून पळत असतां दरवाज्यांत अडखळून पडला.

त्या घरांत अंधारांत दोन बायका उभ्या होत्या. त्यांस पाहतांच ते शेजारचे लोक थरथर कांपूं लागले. त्यांत कोणी धैर्यवान् होता, त्यानें त्यांच्यावर दगड फेंकले, तरी त्या जाग्यावरून हालल्या नाहींत.

इतक्यांत तेथें चौकीवाला आला, त्यानें तीर मारला तो त्यांच्या आंगांत शिरून राहिला. पण त्या कांहीं बोलल्या नाहींत. मग

कोणी दिवा लावून आणला व चांगला तपास करूं लागले. तेव्हां तेथें त्या अंधारांत दांडीवर गोदड्या होत्या, त्यापैकीं साडीची केलेली गोदडी होती, तीवर चंद्रासारखा आकार काढलेला होता.

१० या दुसऱ्या विभागाचा सारांश असा. गुजरात व्हर्नाक्युलर मंडळीनें ठरविलें होतें कीं, भुतांच्या शोधाची खरी हकीगत लिहावी. त्यामुळें मी शोध करून पाहिला. तेव्हां सांप्रतकाळीं भुतांबद्दल ज्या गोष्टी लोकांत चालत आहेत, त्या मला खोट्या वाटतात. हें पुस्तक वाचून समंजस लोक हिंमत धरून भुतांचा शोध करतील, तर त्यांच्याही ही गोष्ट लक्षांत येईल. आतां तिसऱ्या विभागांत शरीरांत बसलेल्या भुतांस काढण्याकरितां जे जे उपाय गुजराथी लोक करितात. ते पुढें लिहितों.

इति श्रीकविदलपतराम विरचिते भाषागद्यबंधे भुतादिक भ्रमभंजन ग्रंथे भ्रम शोधन सत्यवार्त्ता वर्णन नाम द्वितियविभागम् ॥ २ ॥

---

दुसरा विभाग समाप्त.

# भूत-पिशाच्च निर्णय.

## विभाग ३ रा.

### प्रकरण २५ वें.

—०—

#### चंडीपाठाचा ( सप्तशतीचा ) उपाय.

जसा कोणी कागदाच्या केलेल्या वाघाला मारण्याकरितां फौज घेऊन जातो, तसा भ्रमानें मानलेल्या भूतांस काढण्याकरितां, शास्त्रांत सांगितलेले उपाय कधीं कधीं लागू पडत नाहींत. त्यावरून अज्ञानी लोक समजतात कीं, जसे आजकालचे लोक शास्त्रांच्या मर्यादेंत राहात नाहींत, तसे देव देखील राहात नाहींत. पण असें समजूं नये. देव कधीं शास्त्रांची मर्यादा तोडणार नाहींत. मनानें मानलेलें खोटें भूत शास्त्रांचे उपाय मानित नाहीं आतां ते उपाय सांप्रत ज्या रीतीनें करितात, ते लिहितों.

एखाद्या माणसास ताप येतो, मुका होतो, दांतखिळ बसते अशीं लक्षणें झालीं असतां, त्याचीं आप्त माणसें समजतात कीं,

याला भूतानें पछाडलें आहे. मग त्याला विचारूं लागतात; पण तें बोलत नाहीं. असें पाहून चंडीपाठाचें पारायण करणाऱ्या ब्राह्मणास बोलविण्यास जातात. त्याला येण्यास वेळ लागला कीं, त्याचीं आप्त माणसें व शेजारी येऊन ह्मणतात कीं, याला मिरच्यांची धुरी द्या. किंवा कुत्र्याच्या विष्टेचा धूर द्या. ह्मणजे याच्या अंगांत भूत आहे तें बोलेल.

मग तसा धूर दिल्यावर एकादेवेळीं तें मनुष्य बोलूं लागतें. व कधीं बोलत नाहीं. नंतर चंडीपाठ करणारा ब्राह्मण आला ह्मणजे प्रथम पवित्रपणानें आसनावर बसून, एका चौरंगावर एक नवें लाल रंगाचें वस्त्र पसरतो. त्यावर गव्हांच्या दाण्याचें अष्टदल यंत्र ( आठ पानांचें यंत्र ) करतो. त्याच्या नव कोठ्यांत नव गव्हांच्या रासी करून, त्यांत नवदुर्गेचें आवाहण करितो ( आकृति नंबर १ पहा. )

नंतर त्यावर पाण्याचा कळस ( तांब्या ) भरून ठेवितो. त्यावर नारळ किंवा फक्त नारळच स्थापनेसाठीं ठेवून, त्याची पूजा करितो. गुग्गुळाचा धूप व तुपाचा दिवा लावतो. नंतर ज्याला भूतानें पछाडलें असेल, त्याला पवित्रपणानें समोर बसवितो.

मग तो ब्राह्मण पाठ चालू करून नवार्णव ( नव अक्षरांचा मंत्र ) मंत्रानें तांदूळ किंवा पाणी मंत्रून त्या मनुष्याच्या अंगावर

फेंकतो, त्यामुळें तो खेळूं लागतो. खेळणें जोरांत यावें ह्मणून कांशाची थाळी वाजवितो.

तो ब्राह्मण जेव्हां नवार्णव मंत्रानें किंवा पाणी मंत्रून, त्या भुतास बोलावितो, तेव्हां तें खेळणारें मनुष्य आपल्या घरांतील एखाद्या मरणाराचें नांव घेऊन, मी अमका आहें. माझी मिळकतींत, घरांत किंवा बायकोत आशा राहिली आहे. त्यामुळें माझी अधोगति झाली आहे. माझी मिळकत तुह्मीं वापरित आहां, माझ्या मुलाचा सांभाळ नीट करित नाहीं. ह्मणून मी तुह्मांस पीडा करीन. यास्तव माझा उद्धार होण्यासाठीं मी सांगतों ते उपाय करा.

असें त्याचें भाषण ऐकून घरांतील माणसें तसें करण्यास कबूल होतात. व भुताकडून पीडा न करण्याबद्दल शपथ घेववितात, दुर्गेच्या मांडलेल्या आसनावर व चंडीपाठाच्या पोथीवरही हात ठेववितात. तो चंडीपाठ मार्कंडेय पुराणांत आहे. त्यांत श्लोक लिहिला आहे कीं,—

## श्लोक

यह भूत पिशाच्यादि यक्ष गांधर्व राक्षसाः ॥
ब्रह्मराक्षस वेतालाः कुष्मांडा भैरवादयाः ॥ १ ॥
नश्यन्ति दर्शनात्तस्य कवचे हृदि संस्थिते ॥

या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, ग्रह, भूत, पिशाच्च, यक्ष, गंधर्व, राक्षस, ब्रह्मराक्षस, वेताळ, कुष्मांड आणि भैरवादि मिळून जे देव आहेत, ते सर्व जो मनुष्य चंडी ( सप्तशती ) पाठ करितो त्या मनुष्यांस पाहून पळतात. आतां भूतांची गति होण्याचा उपाय, भूत स्वत: सांगतें ती गोष्ट पुढें लिहितों.

---

## प्रकरण २६ वें.

—०—

### भुतांचा सांगितलेला उपाय.

जेव्हां एखादें भूत खेळतें तेव्हां सांगतें कीं, तुह्मीं मला सोमेश्वर पाटणास घेऊन जा. अथवा एखाद्या तीर्थास नेऊन माझी गति करा. ती अशी कीं, तुह्मीं घरचीं सर्व माणसें प्रभास क्षेत्रास जा. ह्मणजे मी तुमच्यापैकीं एकाच्या आंगांत राहून तेथें येईन. ह्मणजे तिकडे माझी गति होईल. किंवा गया तीर्थास जाऊन माझें गया श्राद्ध करा. ह्मणजे माझी गति होईल.

नंतर त्याचीं सर्व आप्त माणसें प्रभासास जाऊन, पारायण बलिश्राद्ध करितात- त्या प्रभासास कार्तिक पौर्णिमेस अशीं भूतानें पछाडलेलीं हजारों माणसें जमा होतात. तेथें एक पिंपळाचें झाड आहे, तें दृष्टीस पडतांच, तो भुतानें पछाडलेला इसम खेळूं लागून

सांगतों कीं, आतां मी येथेंच राहीन. नंतर त्या मनुष्यांचा भूतांविषयींचा भ्रम जातो. किंवा कोणी गयातीर्थास जाऊन गयाश्राद्ध केल्यानें भूतांबद्दलचा भ्रम नाहींसा होतो.

तसेंच कित्येक भूतें सांगतात कीं, माझ्याकरितां नील * क्रिया करा, ह्मणजे माझी गति होईल. नंतर त्याचा वारस नीलक्रिया करतो. जसें माणसाचें लग्न लागतें तद्वत् गाईचा पाडा व पाडी यांचें लग्न लावून त्या दोघांच्या शेंपट्या एकजण हातांत धरून राहतो आणि मरणाराच्या कुटुंबांतील माणसें त्या शेंपटांवर पाणी, दूध व तीळ यांचें तर्पण करितात. त्याची रीत सर्व देवांच्या कर्मग्रंथांत लिहिली आहे. त्यांतील श्लोक असा आहे कीं,—

## श्लोक

**भूत योनिषु ये जाता प्रेत योनीषु ये गताः ॥**
**ते सर्वे तृप्ति मायान्तु नीलपुच्छेषु तर्पिताः ॥ १ ॥**

याचा अर्थ असा—कोणी माझ्या पूर्वजांपैकीं भूत योनींत उपजला असेल, किंवा प्रेत योनींत गेला असेल, त्यांनीं त्या नीलतर्पणानें तृप्त व्हावें. असे श्लोक एकशें पंचवीस आहेत. ते बोलून पाणी ओतात. किंवा जितकीं कुटुंबांतील माणसें मेलीं असतील, त्यांचीं नांवें घेऊन पाणी ओतात. नंतर भाताचे १०८ पिंड

---

* गाईचा पाडा व पाडी यांचें लग्न लावणें.

करतात. त्यांतील कांहीं मेलेल्या आप्तवर्गांच्या नांवानें करितात. नंतर पुढील श्लोक बोलून पिंडदान करितात.

॥ श्लोक ॥

विद्युच्चौरहता ये च दंष्ट्रिभिः पशुभिस्तथाः
तेषा मुद्ध रणार्थाय इमं पिंडं ददाम्यहम् ॥ १ ॥

या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, जे कोणी माझ्या पूर्वजांपैकीं, ज्यांचें वीज, चोर, दांतवाली जनावरें किंवा पशु इत्यादिकांपासून मरण झालें असेल, त्यांचा उद्धार होण्याकरितां हा पिंड मी देत आहें. असे श्लोक सुमारें १०० आहेत. अशा क्रिया केल्यानें कोणकोणाचा भूतांविषयींचा भ्रम मिटतो. आतां खेळणारें भूत पाळणूकीचे जे प्रकार सांगतें. ते लिहितों.

---

## प्रकरण २७ वें.

—०—

### भूतबाधेच्या पाळणूकीचे प्रकार.

जेंव्हां प्रभासक्षेत्रास जा किंवा गयाश्राद्ध करा इत्यादि पाळणूक भूत सांगतें, तेंव्हां आणखी ह्मणतें कीं, त्या तीर्थास जाल, तेथपर्यंत आजपासून मी एक क्रिया सांगतों ती पाळा. त्याप्रमाणें त्याच्या घरांतील माणसांपैकीं एकजण ती क्रिया पाळतो. ती

अशी कीं, कोणी उडीद, कोणी दूध, कोणी ताक, कोणी मूळ इत्यादि खाऊं नयेत. आणखी कठिण पाळणूक देतें ती तूप न खाण्याची किंवा गुडघ्यांतून हात घेऊन जेवण्याची क्रिया सांगतें.

तेव्हां त्याचें कारण असें कीं, जोंपर्यंत या भुताची गति करणार नाहीं. तोंपर्यंत हें अन्न विष्टेसमान आहे. अथवा त्याच्यापेक्षांही कठिण पाळणूक देतें. तेव्हां उभ्याउभ्यानें मातीच्या काळ्या परळांत घेऊन डाव्या हातानें खाणें ! किंवा कोणी पुरुषानें पागोटी डोक्यांत न घालणें.

मग तो पुरुष लहान पटका मात्र डोक्यांत घालतो. अथवा कोणी बायकोनें आंगांत चोळी व पुरुषानें पायांत जोडा घालूं नये. कोणी पायांनीं चालून तीर्थास जावें. अशा प्रकारच्या पाळणूका देतें, त्या त्याच्या कुटुंबांतील एकजण पाळतो.

नंतर जेव्हां योग येईल, तेव्हां तीर्थांत जाऊन पाळणूक सोडतात. कदाचित् तीर्थास जाणें न झालें, आणि त्याच्या घरांतील कोणी मनुष्य आजारी पडलें; तर पुनः भूत खेळून सांगतें कीं, तुह्मीं जी क्रिया पाळली आहे, तिचें अझूनपर्यंत कांहीं केलें नाहीं; त्यामुळें मला फार दुःख होतें ह्मणून मी तुह्मांस पीडा करितों. असें ऐकतांच, तो मनुष्य लागलाच तीर्थास जाऊन ती पाळणूक सोडून येतो.

जेव्हां कोणी माणूस आजारी होतें, तेव्हां त्याच्या आंगावरून

एक दागिना उतरून एका बाजूस ठेवितात. आणि सांगतात कीं, याला सुख वाटलें ह्मणजे १० ब्राह्मणांस जेवण घालूं. मग हा दागिना आमच्या कामीं येईल. जो गरीब मनुष्य असतो. तो नारळ, थाळी, किंवा तांब्या, उतरून ठेवितो. आतां भुतांच्या संतोषाकरितां त्रिपिंडी श्राद्ध करितात त्याची रीति लिहितों.

## प्रकरण २८ वें.

### त्रिपिंडी श्राद्धाचें कारण.

कोणी प्रभासादि तीर्थास जाऊन येतात. तरी भूत पुनः येऊन खेळूं लागतें. तेंव्हां सांगतें कीं, मला त्या तीर्थांत राहवेना. माझ्या मुलावर व घरांत माझी आशा राहिली आहे. यास्तव घरांतील एका कोनाड्यांत माझ्या नांवाचा नारळ ठेवून, त्याची पूजा करा. ह्मणजे मी त्यांत राहीन. माझ्याजवळ सकाळ संध्या-काळीं निरंतर धूप दिवा लावीत जा. आणि प्रत्येक वर्षी कार्तिक महिन्यांत माझें त्रिपिंडी श्राद्ध करा. ह्मणजे मी तुमचें रक्षण करीन. व हें न कराल तर मी या घरांत तुह्मांस राहूं देणार नाहीं, फार पीडा करून, तुमच्या मुलांसही जीवंत ठेवणार नाहीं. असें ऐकल्यावर घरांतील माणसें त्याच्या सांगण्याप्रमाणें करितात.

नंतर त्याच्या घरांत कोणी मनुष्य आजारी पडलें व कदाचित् खेळूं लागलें तर तें सांगतें कीं, तुह्मीं एक दिवस माझ्याजवळ धूप, दीप करण्यास चुकलां ह्मणून मी पीडा करीत आहें. तर आतां तुह्मीं पिंपळाच्या किंवा तुळसीच्या झाडास सव्वा महिनापर्यंत सकाळीं स्नान करून, स्वच्छ वस्त्र नेसून, कांहीं खाल्याशिवाय पाणी घालीत जा, ह्मणजे मी सुख देईन. अथवा असेंही सांगतें कीं. पांच ब्राह्मण जेववावे, व श्रीमंत घराणे असल्यास १०८ ब्राह्मण व सात कुमारिका कन्या जेववाव्या. अथवा ७ सवासिणी जेऊं घालाव्या. ह्मणजे मी सुख देईन. त्याप्रमाणें घरांतील माणसें करितात.

कोणी भूत खेळत नसलें तरी, भुतांची पीडा होऊं नये, यासाठीं प्रथमपासूनच दरवर्षी त्रिपिंडी श्राद्ध करितात. त्यांत ब्राह्मणाशिवाय इतर जातीचे लोक त्रिपिंडी श्राद्धांबद्दल तीन ब्राह्मण जेऊ घालतात, ते श्राद्ध करीत नाहींत ब्राह्मणलोक श्राद्ध करितात. श्रावकलोक कोणत्याही पूर्वजास मानीत नाहींत. त्यांची एक पाहिलेली गोष्ट मी पुढें लिहितो.

## प्रकरण २९ वें.

—०—

### श्रावक लोकांची गोष्ट.

एका ढुंढिया वाण्याचा भाऊ जेठा नांवाचा मरण पावला. तो

आपल्या बायकोच्या आंगांत येऊन बोलत असें कीं, माझी स्थापना घरांत करावी. व दरवर्षी त्रिपिंडी श्राद्ध करावें. तेव्हां त्याचा भाऊ ह्मणाला—तूं जर माझ्या आंगांत येऊन बोलसील तर तूं सांगशील तसें करीन.

तेव्हां भूत ह्मणालें—मी तुझ्या आंगांत येणार नाहीं, पण पीडा करीन. तुझ्या मुलास जगूं देणार नाहीं. असें त्यानें सांगितलें तरी त्याच्या भावानें तें खरें मानलें नाहीं.

पुढें त्याचा एक दीड वर्षांचा मुलगा मरण पावला. तेव्हां त्याच्या बायकोला संशय उत्पन्न झाला कीं, त्या भूतानेंच माझ्या मुलाचा जीव घेतला. नंतर त्याच्या बायकोच्या अंगांत येऊन ती खेळूं लागली. जेव्हां त्याच्या भावाची बायको खेळूं लागे तेव्हां तो छडी घेऊन तिला मारित असे. आणि तोंडानें जातों जातों असें सांगत असे. पण त्याची बायको खेळूं लागली तेव्हां त्याचा उपाय कांहीं चालला नाहीं.

नंतर तिला ढुंढिया गुरुजवळ नेऊन जैनशास्त्रांतील गोष्टी ऐकविल्या तरी तिचा भ्रम मिटला नाहीं. नंतर तो वाणी कंटाळून त्या गुरुस ह्मणाला—आतां मी काय उपाय करूं ? तेव्हां गुरुनें सांगितलें. नवकार मंत्र हिच्या कानांत सांग; ह्मणजे भूत पळून जाईल. नंतर त्यानें तसें केलें.

**नवकार मंत्र**—ॐ नमो अर्हताणं, ॐनमो सिद्धाणम् ॐ नमो आयर्याणम्. ॐ नमो उवझायाणं, ॐनमो लोएसव्व साहुणम्॥

आणखी अठम ( ह्मणजे जैन धर्माचे ३ उपास, ऊन पाणी पिवून स्नान केल्याशिवाय ) करविलें; तरी तिचा भुताबद्दलचा भ्रम मिटला नाहीं. मग तो वाणी मनांत ह्मणाला—आतां दुसरा उपाय करावा. ( ह्मणजे श्राद्ध. ) पण जैनांत माझी अब्रु जाईल. नंतर ती बाई आपल्या माहेरीं गेली. तिला सहा महिने झाल्यावर आणण्याकरितां एक मनुष्य तिच्या बापाकडे पाठविला.

तेव्हां तिचा बाप ह्मणाला—आमच्या जांवयाचा जैन धर्म आहे तो पूर्वजास किंवा कोणत्याही देवास मानित नाहीं. पैसा खर्च करण्यासही मोठें जिवावर येतें. त्याचा भाऊ अधोगतीस गेला आहे, तो आमच्या मुलीस नडतो. पहा, आज दोन वर्षे झालीं ती आजारी आहे. एक मुलगा होता तोही मरण पावला. पण आमचा जांवई याबद्दलचा कांहींच उपाय करित नाहीं. एकदां चंडीपाठ केला व डांक वाजविली तेव्हां तिनें खेळून सांगितलें कीं, “ मी जेठा आहें, माझी स्थापना घरांत करून प्रत्येक वर्षी माझें त्रिपिंड श्राद्ध करा. नाहिंतर घरांतील माणसांनीं प्रभास क्षेत्रास जावें. ह्मणजे माझी गति होईल. ”

तेव्हां आह्मीं सांगितलें कीं, त्या घरांतील माणसें आमच्या

हुकमांत नाहींत, आमच्या मुलगी करितां आह्मीं पाहिजे तितका खर्च करूं, किंवा मुलीस घेऊन प्रभासास जाऊं ?

त्यावर तें भूत ह्मणजे खेळणार बाई ह्मणाली—तुमच्या घरांतील खर्चानें केलेलें मला कांहीं पोंचणार नाहीं. माझ्या घरचें किंवा माझ्या भावाच्या घरांतील खर्चेल तर तें मला पोंचेल. तुह्मीं प्रभासास गेले तरी माझें कांहीं म्हणणें नाहीं. माझ्या घरांतील माणसें प्रभासास जातील तेव्हांच माझी गति होईल.

नंतर आम्हीं सांगितलें—हिच्या अंगांवरील दागिने हिच्या घरचे आहेत, ते मोडून त्याचा खर्च करून सांगाल तो उपाय करूं ? तेव्हां तें भूत म्हणालें—तसें करणें तुमच्या मनांत असेल तर तें माझ्या घरीं जाऊन कराल तरच मला पोंचेल. असें त्या भुतानें सांगितलें. त्यामुळें आमचा उपाय कांहीं चालत नाहीं, तर आम्हीं काय करावें ? आणखी आम्हीं जांवयास सांगतों कीं, जर तुम्हास पैशांची अडचण असेल तर आम्हीं देतों. पण तुम्हीं तुमच्या भावाची गति चांगली होईल असें करा. तेंही जांवई ऐकत नाहीं, म्हणून आम्हीं आमच्या मुलीस तिकडे पाठवित नाहीं.

असें ऐकून तो न्यावयास आलेला मनुष्य भुताची सुटका करण्याबद्दल जामिन राहून, त्या बाईस सासरीं घेऊन गेला. नंतर तिच्या नवऱ्यास पुष्कळ लोकांनीं आग्रह केल्यावर, त्यानें चंडीपाठ केला. तेव्हां ती बाई खेकून सांगूं लागली कीं, मी जेठा

आहे, माझी अधोगति झाली आहे, यास्तव माझी स्थापना करून घरांत बसवावा. व दरवर्षी त्रिपिंडी श्राद्ध करावें आणि तुम्हीं घरांतील सर्व माणसांनीं एकवेळ प्रभासास जावें. असें ऐकून तें सर्व त्या वाण्यानें कवूल करून तसें केलें. पुढें त्याला एक मुलगा झाला.

त्या बाईचा भ्रम मिटल्यामुळें तिला सुख वाटूं लागलें. पण तो वाणी अद्यापही ह्मणतो कीं, काय करूं ? हें काम माझ्या बायकोनें मजकडून जुलमानें करविलें आहे खरें; तरी तें भूत माझ्या अंगांत येऊन खेळेल अथवा मी डोळ्यांनीं पाहीन, तेव्हांच तें खरें मानीन.

नंतर तो प्रत्येक वर्षी कार्तिक महिन्यांत त्रिपिंडीचे ३ ब्राह्मण जेववूं लागला. तो ब्राह्मणाकरितां जें जेवणाचें सामान आणी तें अगदीं हलकें आणित असे; कारण त्या जेवणाऱ्या ब्राह्मणांवर तो राजी मुळींच नसे त्यामुळें त्यांस तें अन्नही रुचिकर लागत नसे तेव्हां ती बाई खेळून पुनः सांगे कीं, ब्राह्मण जेवले तें मला पोंचलें नाहीं यास्तव पुनः त्यांस जेवण घाला. असें ऐकतांच त्या वाण्यास पुनः तसें करावें लागे.

नंतर तो वाणी प्रभासास जाऊन आला ह्मणून, त्याला मुलगा झाला. असें दुसऱ्या कित्येक बायकांनीं पाहून, मुलग्याच्या प्राप्ति करितां प्रभासास जाण्याविषयीं आपल्या नवऱ्यांस सांगितलें, तेव्हां

एकाच गांवांतील सुमारें १०० माणसें प्रभासाच्या मेळ्यास संवत् १८९९ सालांत गेली होतीं. जे त्रिपिंडी करित नव्हते तेही प्रत्येक वर्षीं त्रिपिंडी करूं लागले. जे प्रभासास जाऊन, आपली दाढी मिशी काढून आले त्यांची त्यांच्याच जातींतील लोक मस्करी करूं लागले. तेव्हां ते ह्मणूं लागले कीं, काय करावें ? बायकांच्या सांगण्यावरून, धोलेऱ्याजवळ भडयादरा पीराची जागा आहे, तेथें हिंदु लोकांस उभें राहणें योग्य नाहीं पण त्याची मानता करावी लागते.

अशा रीतीनें भुतांच्या गोष्टी जे मानित नाहींत, त्यांसही बायकांच्या सांगण्यावरून, कित्येक उपाय करावे लागतात. आतां एखादा मनुष्य परदेशीं मेला असेल, त्याची प्रेतगति मिटविण्यासाठीं हिंदुशास्त्राप्रमाणें पुतळीविधान करावें लागतें. त्याची हकिगत पुढें लिहितों.

## प्रकरण ३० वें.

—०—

### प्रेतपुतळीविधान क्रिया.

एक धोळक्याचा ब्राम्हण परदेशांत मेला, तो भूत होऊन, आपल्या मुलाच्या अंगांत येऊन म्हणाला—मला शूद्रांनीं जाळल्यामुळें माझी प्रेतगति झाली आहे. म्हणून माझ्या करितां पुतळी

धान करावें. म्हणजे माझी सद्गति होईल. असें ऐकतांच त्याप्रमाणें त्याच्या पुत्रानें केलें.

तें असें कीं, नदी किनारीं जाऊन, एका स्वच्छ व पवित्र जाग्यावर काळ्या हरणाचें कातडें पसरून, त्यावर पळसाच्या लांकडाचे ३६० बारीक तुकड्यांचा किंवा दर्भाच्या तुकड्यांचा एक पुतळा तयार करावा. तीं लांकडें किंवा दर्भाचे तुकडे रचण्याची रीति अशी आहे कीं,—

मस्तकाचे ठिकाणीं ४०, कंठाचेठायीं १० एकेका हाताचे जागीं पन्नास म्हणजे १००, हातांच्या बोटांचेठायीं १०, छाती २०, पोट २०, लिंग ४, दोन अंडाचेठायीं तीन तीन म्हणजे ६ एकेक मांडीचेठायीं पन्नास पन्नास म्हणजे १००, जांघेच्या ठायीं पंधरा पंधरा म्हणजे ३० व पायांचे बोटांचेठायीं १०

नंतर त्यावर दर्भाचें झांकण घालून, गरम कपड्यानें गुंडाळतात. मग जवाच्या पिठांत मध व तूप घालून, त्यावर चोपडून स्वच्छ मातीचा थर देतात मग मस्तकाचे ठिकाणीं नारळ अथवा गोल तुंबडें बांधतात, कपाळास केळीचें पान, दांतास डाळिंबाचे बीं किंवा महाळुंग ठेवितात कानास ताडपत्र, डोळ्यांस कवड्या, डोळ्यांच्या कोनास शेंदूर, नाकास तिळाचें फूल, बेंबीस कमळ अ- ा आंबा आणि स्तनाचे ठिकाणीं दोन गुंजा ठेवितात. वायूचे- मनशील, पित्तास हरताळ, कफास समुद्रफेंण, रक्तास मध,

विष्ठेस गाईचें शेण, मुत्राचेठायीं गोमूत्र, वीर्याचेठायीं पारा, लिंगास गाजर, अंडाजवळ केंसाचेठायीं ( डुकराचे केंस ) सुगंधी वाळा, केंसाचेठायीं लोंकर आणि मांसाचेठायीं जवाच्या पिठाचा लेप करितात.

नंतर दूध, दहीं, मध, तूप, साखर आणि पाणी निरनिराळीं घेऊन त्यांनीं न्हाऊं घालितात. धोतर नेसवितात, जानवीं २ घालितात. नंतर चंदन व फुलांचें हार इत्यादिकांनी शृंगारितात. बेंबीवर तुपाचा दिवा ठेवितात. व त्या पुतळ्याचें डोकें दक्षिणेकडे करून निजवितात.

नंतर मंत्रानें मरणाराचा जीव त्यांत आला आहे असें मानतात. बेंबीजवळ पेटवून ठेवलेला दिवा जाण्याच्या संधींत अंतकाळची क्रिया, दानादिक देऊन मरण क्रिया व प्रेतश्राद्ध करितात. तें भूत खेळून सांगत नाहीं, तरी पण परदेशांत मरण आलें किंवा शूद्रादिकांचा स्पर्श झाला इत्यादि भ्रम झाला कीं, त्याचे वारस पुतळी विधान करितात.

कोणी बायकांचेंही पुतळीविधान करितात, तेव्हां योनीचेठायीं मोठी कवडी ठेवितात. व छातीवर दोन बेलपत्रें ठेवितात. अशा प्रकारच्या रीति केल्यानें कित्येकांचा भूतांविषयींचा भ्रम नाहींसा होतो. आतां भूत काढण्याचें उपाय, चंडीपाठाखेरीज दुसरे पुष्कळ रीतिचे ऐकिले आहेत ते पुढें लिहितों.

## प्रकरण ३१ वें.

—o—

### चंडीपाठाखेरीज भत काढण्याचे दुसरे उपाय.

कित्येक वैष्णव लोक भूत घालविण्याकरितां "नारायण कवच" जें श्रीमद्भागवतांत सहाव्या स्कंदांत सांगितलें आहे, त्याचा पाठ करवितात. त्यांत हा श्लोक आहे.

**कुष्मांड वैनायक यक्ष रक्षभूत ग्रहां चूर्णय चूर्णयारीन् ॥**

या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, देव, माझे शत्रु जे कुष्मांड, वैनायक, यक्ष, राक्षस, भूत व ग्रह यांचें चूर्ण करो. या नारायण कवचानें, रामरक्षेनें, अथवा कोणाचा शिवकवचादिकानें भुतादिकां-विषयींचा भ्रम नाहिंसा होतो. आणि जे शूद्र चंडीपाठ किंवा नारायण कवचाच्या अधिकाररहित आहेत; त्यांस भुतांचें बिलगणें होतें. तेव्हां ते डांक बसवितात. तसेंच उत्तम जातीपैकीं एखाद्यास हलक्या भुताचें बिलगणें झाल्यास, तें चंडीपाठानें जात नाहीं, त्यावेळींही त्याच्या घरीं डांक बसवितात.

तें डांक वाजविणारे रावळीया किंवा वाघरी जातीचे असतात. ते दोघेजण रात्रींचे वेळीं खेळण्यास येतात. त्यांतील एकाच्या हातांत डांक असते आणि दुसऱ्याच्या हातांत कांशाची थाळी असते. ते अंगांत आलेल्याच्यासमोर बसून वाजवितात व एखाद्या देवीचा हुवा ( डांक ) गातात.

१ आपल्या मराठी शूद्र लोकांतही अशी डाक घालण्याचा प्रघात आहे.

## बेचरजीचा डुवा. ( डाकेचें गाणें. )

मानसरोवरी माय, चाल चुंवाळना चोकनी ॥
बरदाली बेचराय, आवे उगमणा गोरवनी ॥

## खोडीयारचा डुवा.

खरी देव खोडीयार, जेनो दीहे वाहो डुंगरे ॥
समरी साच देनार, आवे माता आकरी ॥ १ ॥

अशा रीतीनें चोंड्याचा डुवा, गडेचींचा डुवा, शिकोतरचा डुवा किंवा धावडीचा डुवा गातात.

## मेलडीचा डुवा.

डांक सांभळतां दूर, दोडी अमाला देहमां ॥
तूं हाजरा हजूर, माता आवे मेलडी ॥ १ ॥

असे डुवे त्यांस २०० किंवा ४०० येत असतात, त्या डांकेच्या आवाजानें भुताचा भ्रम असलेलें मनुष्य खेळूं लागतें. नंतर ते डांकवाले त्यास बोलावयास सांगतात, तेव्हां तें ह्मणतें—मी अमूक ठिकाणीं राहतों माझ्या जाग्यावर या मनुष्यानें लघ्वी केली किंवा थुंकला अथवा झाडयास बसला, ह्मणून मी यास पछाडलें आहें, याचा जीव घेतल्याशिवाय मी सोडणार नाहीं.

असें ऐकून त्याचे आप्त घाबरून जाऊन ह्मणतात कीं, तुला पाहिजे तें घे पण याची सुटका कर. मग तें भूत सांगतें-"१। शेर उडदांचे वडे, १। शेर चण्याच्या घुगऱ्या किंवा खीर, गव्हांचा सांजा एवढीं एका परडींत भरून, मध्यें गव्हांच्या पिठाचा दिवा ठेवून त्यांत चार वाती लावाव्या. मग तो उतारा रविवारच्या किंवा मंगळवारच्या संध्याकाळीं माझ्या ठाणकावर ठेवावा अथवा चार रस्त्याच्या चौकांत ठेवावा. ह्मणजे मी जाईन. हा उतारा किंवा दुसरेंही कांहीं मागतें." त्याप्रमाणें करावें. ह्मणजे भूतांबद्दलचा भ्रम मिटतो.

ज्यावेळीं खेळणार मनुष्य मेलेल्या माणसाचें नांव सांगतें, कीं, मी अमका आहें, त्यावेळीं त्याचे आप्त ह्मणतात—आम्हीं खरें कसें मानावें कीं, तूं अमकाच आहेस ह्मणून? तेव्हां तें खेळणारें मनुष्य गव्हांचे किंवा ज्वारींचे दाणे चिमटींत घेऊन देतें, आणि ह्मणतें कीं, मी अमूक असेन तर ( बेकी ) सम संख्या येईल.

मग त्याचे आप्तजन ते दाणे मोजून पहातात, तों एखादेवेळीं तसे सम येतात. तरीपण त्याचे आप्त पुनः ( एकी ) विषम अंक मागतात. त्याप्रमाणें आले नाहींत, तर खेळणार ह्मणतें कीं, आतां पुनः जसे मागाल तसे बरोबर दाणे देईन. असें ऐकतांच समंजस माणसास मोठें हंसण्यासारखें आश्चर्य वाटतें आणि

मूर्ख माणसांस त्याचा विश्वास येतो. एखादेवेळीं त्या डांकवाल्या-सही भूत कांहीं उत्तर देत नाहीं. तेव्हां पंचाक्षरी बोलावून आणितात.

---

## प्रकरण ३२ वें.

—o—

### पंचाक्षऱ्याची गोष्ट.

पुढें लिहिलेली देवी ज्याच्या शरिरांत येते, त्यांस पंचाक्षरी असें ह्मणतात. त्यांच्या स्वप्नांत ही देवी गोष्टी सांगते. किंवा एखाद्या पंचाक्षऱ्याजवळ प्रत्यक्ष बोलते. अशा गप्पा गुजराथेंत पुष्कळ चालतात. ते पंचाक्षरी ब्राह्मण, वाणी किंवा दुसऱ्याही जातीचे असतात. त्यांच्या घरांत देवी स्थापिलेली असते.

जेव्हां भूत जबाब देत नाहीं, तेव्हां डांकवाला ह्मणतो—आपल्या गांवांत एक धनगर बेचराजीचा पंचाक्षरी आहे, त्याच्या-जवळ बेचराजी प्रत्यक्ष गोष्टी सांगतों. एका माणसास जीनानें पछाडलें होतें; तेव्हां त्या पंचाक्षऱ्यास येतांना पाहतांच, ‘ जळतों जळतों ’ असें बोलूं लागलें. हें वाक्य भूतानें पछाडलेल्या माणसानें ऐकतांच, तें आपल्या आत्पांस सांगतें. मग त्यासमयीं त्या पंचाक्ष-ऱ्यास येतांना पाहतांच, ‘ जळतों, जातों. ’ असें तें भूत बोलूं लागतें.

कोणी त्या पंचाक्षऱ्यास बोलाविण्यास जातात, तेव्हां सांगतात कीं, दादाहो ! आमच्या आतपास किंवा शेजाऱ्यास भूतानें पछाडलें आहे. तें खेळतें खरें; पण कांहीं जबाब देत नाहीं. आह्मीं पुष्कळ उपाय करून थकलों पण तें भूत जात नाहीं. ह्मणून आज तीन दिवस डांक बसविली आहे, तीन रात्रीं आह्मीं जागरणानें हैराण झालों आहों. यासाठीं मेहरबानी करून तुह्मीं तेथपर्यंत चलाल तर बरें होईल. तुह्मांला बेचराजी साहाय्य आहे. तुह्मीं पुष्कळ लोकांची पीडा दूर केली आहे, तुह्मीं यशस्वी आहां. यास्तव तें भूत तुमच्यानें जाईल.

असें ऐकून, पंचाक्षरी सांगतो कीं, दादाहो, माझा बेचराजी मला हुकूम देईल तर मी तेथें येईन. असें सांगून आपल्या घरांतील देवीच्या स्थानाजवळ गव्हांची किंवा ज्वारीची ( पुंजी ) करून, ती समोर बसून ह्मणतो—हे माते, तें भूत काढावयास जाण्यास तुझा हुकूम असेल तर एक वचन दे. असें सांगून आपल्या हातानें त्या दाण्यांतील चिमटीभर दाणे घेऊन मोजूं लागतो. ते दाणे मागितल्याप्रमाणें बरोबर आले ह्मणजे पंचाक्षरी भूत काढण्यास जातो आणि दाणे मागितल्याप्रमाणें आले नाहींत ह्मणजे तो सांगतो, मी काय करूं ? माझी देवी हुकूम देत नाहीं. ह्मणून मी येत नाहीं.

नंतर तो मनुष्य दुसऱ्या पंचाक्षऱ्यास बोलाविण्यास जातो. मी ऐकिलें आहे कीं, घोघा बंदरांत सरकारानें बंदोबस्त केला आहे कीं, जो डांक वाजवील त्याचेपासून १। रुपया दंड घ्यावा. त्यामुळें तेथें खेळणारीं भुतें कमी झालीं आहेत. मी ह्मणतो कीं, सरकारानें बंदोबस्त करून, भूतानें पछाडलेल्या माणसास इस्पितळांत न्यावें. ह्मणजे तें भूत खरोखर बंद होईल. आतां पंचाक्षऱ्याचे उपाय लिहितों.

---

## प्रकरण ३२ वें.

—०—

### पंचाक्षऱ्यांचे उपाय.

नंतर पंचाक्षरी येऊन, भूतानें पछाडलेल्या माणसास आपल्या समोर बसवितो. आणि डांक वाजविणारास सांगतो कीं, माझ्या देवीचा डुवा बोलून वाजीव. मग पंचाक्षरी खेळूं लागून जमीनीवर हात आपटतो. त्या पंचाक्षऱ्याचे डोकीचे केस मोठे वाढलेले असतात, ते सोडून खेळूं लागतो. लोखंडाची सांखळी आपल्या आंगांवर मारून घेऊन, पेटलेला कांकडा तोंडांत धरतो अशा प्रकारें त्या भूतानें पछाडलेल्या माणसास भिववितो. त्यामुळें तें भूत ' जातों जातों ' असें ह्मणतें. त्या भूतास शपथ घालून, पंचाक्षरी काढून लावितो.

मग आपल्या देवीची पाळणूक देतो कीं, अमूक रुपये माझ्या देवीजवळ खर्च कर. नंतर त्या पछाडलेल्या माणसावरून तेलाचा वाटगा उतरून पंचाक्षरी पितो. इतके उपाय करून जर तें भूत बोललें नाहीं. तर तो पंचाक्षरी ह्मणतो—एक कांकडा पेटवून माझ्या हातांत द्या ह्मणजे मी तो आपल्या तोंडांत घालीन. आणि दुसरा कांकडा पेटवून याच्या हातांत द्या ह्मणतो तो आपल्या तोंडांत घालील.

तो कांकडा भूत लागलेलें मनुष्य हातांत घेत नाहीं. कारण कीं, हा पंचाक्षरी पुष्कळ दिवसांच्या अभ्यासानें पेटलेला कांकडा दांताखालीं दाबून धरून, पुनः काढून दाखवितो. व त्या पछाड-लेल्या मनुष्यास तसा अभ्यास नसतो. तेव्हां पंचाक्षरी खेळतां खेळतां, भ्रमवाल्या माणसाच्या तोंडांत कांकडा घालून भाजतो, किंवा चाबकानें मारून त्यास बोलावयास सांगतो.

किंवा लिंबु चिरून, त्यांत शेंदूर भरून, चव्हाट्यावर ठेवितो किंवा उडदांच्या पिठाचा पुतळा करून जाळून टाकितो. व तिरडी बांधून भुत्या त्यावर निजतो. मग त्याला चौघेजण उच-लून स्मशानांत घेऊन जातात. त्याच्यापुढें डांक वाजविणारे अस-तातच. याचें कारण असें कीं, तुझ्यावरील भूत माझ्या आंगांत घेऊन मी स्मशानांत नेऊन पोंचवितों,

---

१ असे उपाय बहुतकरून गांवच्या गांवांतील लोक करितात.

अशा प्रकारची मेहनत पांच सात दिवसपर्यंत किंवा त्याचा श्रम मिटेपर्यंत करितात. मग पंचाक्षरी डांक वाजविणारासह खेळत खेळत गांवाबाहेर जातो. त्यावेळीं उघड्या तरवारी दुसऱ्या माणसांच्या हातांत देतात. पंचाक्षऱ्याच्या हातांत सांखळ असते, अशाप्रकारें गांवाच्या सिमेवर जाऊन उतारा ठेवून येतो. आणि भूत काढून टाकलें असें सांगतो.

इतकें करूनही भूत न गेल्यास, पंचाक्षरी सांगतो कीं, याला जीनाचें पछाडणें झालें आहे. तो आमच्यानें जाणार नाहीं. तर आतां मुसलमानी इलम जाणणाराचा शोध करा. नंतर तशा मंत्रतंत्राचा उपाय करितात. ते लिहितों.

## प्रकरण ३४ वें.

—०—

### भूत घालविण्याचे मुसलमानी उपाय.

मुसलमानी मंत्र तंत्र हिंदुलोकांपैकीं कित्येक ब्राह्मण, जती आदिकरून शिकलेले असतात. ते उपाय जाणणारे हिंदु किंवा मुसलमान तें भूत काढण्यास येतात, तेव्हां लोबानचा धूप दाखवून, मोराच्या पिसानें झाडणी करितात.

मुसलमानी भूत काढण्याचा मंत्र खालीं लिहितों.

भिसमिल्ला, रहिमान रहीम, एक फूल दो फरमान उठो महमद लियो कबान, साह सुलतान, पुरा बांध, एक लाख ऐशीं हजार पैगंबरकी दुहाई, फलाणेके घट पिंडमें पीडा करे, तोडतोड मार मार दमे सैय्यद, अहंमद कबीर सतरसें बला, एककू लावे जंजीर बांध, बावाहैदर, भूत बला, तबसो डाकिणी, शाकिणी बांध, वाहकके ताईला महंमद रसुलल्लीह्ला ॥ १ ॥

ह्या मंत्राचें साधन करितात. तेव्हां दररोज १२१ वेळ ४१ दिवसपर्यंत जपतात. लोबानचा धूप व तुपाचा दिवा लावितात. नंतर शेवटच्या दिवशीं नदीवर जाऊन, तांदूळ २॥ शेर, दूध २॥ शेर, साखर -॥ शेर हीं शिजवून नदीवर घेऊन जातात आणि तेथें मुसलमानाकडून फात्याचा मंत्र पढून वांटून टाकितात. असें केलें असतां मंत्र सिद्ध झाला असें समजतात.

नंतर भूत, प्रेत किंवा झोटिंग यांस काढावयास जातात, तेव्हां चमेलीचीं ७ फुलें घेऊन, त्यांतील एक फूल ७ वेळ मंत्रून हुंगवितात, पाणी मंत्रून पाजितात, व सात वेळ झाडणी करितात. तेव्हां जीन खेळून बोलतो कीं, हा मनुष्य माझ्या स्थानावरून गेला पण मला सलाम केला नाहीं. म्हणून मी यास पछाडलें आहे. तर आतां एक हुक्का, तंबाखूची पिशवी, एक दगडाची कुंडी, एक दांडा आणि सव्वा गज काळें किंवा हिरवें कापड,

एवढ्या जिनसा माझ्या स्थानाजवळ आणून ठेवा. म्हणजे मी जाईन. असें ऐकून त्याप्रमाणें करितात. त्या मंत्राची चिठ्ठी फारशी अक्षरांत लिहून ताईतांत ठेवितात. ( आकृती नंबर २ पहा. )

---

## प्रकरण ३५ वें.

—०--

### भत घालविण्याचे वैद्यकीय उपाय.

कोणी वैद्यास बोलावून विचारतात कीं, हें भूत असेल ? किंवा कांहीं रोग असेल ? तेव्हां वैद्य सांगतो कीं, वैद्यकीय ग्रंथांतील या भुतांच्या गोष्टी आहेत खऱ्या. योग रत्नाकर नांवाचा एक मोठा वैद्यक ग्रंथ आहे. त्याच्या आठव्या भागांत लिहिलें आहे कीं, सहा प्रकारचे उन्माद रोग होतात. त्यांत एक फार हर्षानें होतो. तो असा कीं, जर एखाद्या गरीबास पुष्कळ धन अकस्मात् मिळालें म्हणजे त्या आनंदाच्या लहरींत उन्माद रोग होतो. तसेंच एखाद्या आकस्मिक शोकानेंही होतो. अकस्मात् होणें तो मोठ्या भयानें, विष खाल्यानें, नासकें अन्न खाल्यानें, फार क्रोधानें अथवा भूतादिकांच्या आगमनानें उन्माद रोग होतो.

ते उन्माद ६ प्रकारचे आहेत. १ वात उन्माद, पित्तउन्माद, ३ श्लेष्म उन्माद, ४ संन्निपात उन्माद ५ विष उन्माद, आणि ६

भूतोन्माद. त्या उन्मादांचीं लक्षणें अशीं आहेत कीं, मनुष्य शून्य होतें. कांहीं बोलत चालत नाहीं. अथवा ' चंचल ' म्हणजे उठून उठून पळणें, चार दिशांकडे पाहणें, बुद्धिनाश होणें, सर्व गोष्टी विसरून जाणें, नाचणें, हंसणें किंवा एखादेवेळीं रडणें. !

१ वात उन्मादानें शरीर मुरडणें, २ पित्त उन्मादानें फार क्रोध येणें, ३ कफ उन्मादानें अरुचि होणें म्हणजे कांहीं खाणें पिणें आवडत नाहीं, ४ संन्निपात उन्मादानें सर्व प्रकारची समजूत टळणें, ५ विष उन्मादानें मूर्च्छा येणें, ६ भूत उन्मादानें दुष्ट वचन बोलणें, आणि गांधर्व उन्मादानें पोटांत दुखणें. यक्षादि उन्मादानें आनंद नाहींसा होणें हीं सहा उन्मादाचीं लक्षणें जाणावीं.

ते ६ उन्माद मिटण्याचे उपाय त्या ग्रंथांत निरनिराळे आहेत. त्यांत भूत उन्मादाचा उपाय असा आहे कीं, त्या उन्मादाचें मनुष्य ताबडतोब भिईल, असा प्रकार केला असतां, तो उन्माद मिटेल. तो असा कीं, त्या मनुष्यास कांहीं भयंकर जिन्नस, किंवा उघडी तरवार, दाखवावी. त्याला दोरीनें मारावें किंवा कृत्रिम सर्प अकस्मात त्याच्या आंगावर सोडावा. अथवा वाघ, हत्ती, दाखवावे, एखाद्या राजपुरुषाकडून भिववावा. त्या उन्मादवाल्या मनुष्याची उमर, सामर्थ्य, देश, समय यांचा विचार करून उपाय करावा. म्हणजे चित्त स्थिर होईल.

आणखी त्या ग्रंथांत त्याच ठिकाणीं लिहिलें आहे कीं, पितर,

देव, ऋषि, व गांधर्व इत्यादिकांपासून उन्माद झाला असेल. त्यांचा उपाय वर सांगितलेला नव्हे. असा उन्माद मिटणें कठिण आहे.

आणखी सांगितलें आहे कीं, बकरीच्या मुत्रांत हिंग वांटून धूप दिल्यानें बलवान् ग्रहांचे उन्माद मिटतात व भूतांची पीडा असल्यास तीहि जाते. तसेंच शिरसाचीं फुलें, लसूण, पिंपळी, सिरस, हळद, दालचिनी, मंजिष्ट, व सुंठ इतक्या जिनसा बकरीच्या मुत्रांत वांटून त्यांची दिवटी करून, सावलींत सुकवावी, तिचें काजळ पाडून डोळ्यांत घातल्यानें उन्माद व अपस्मार रोग नाहींसे होतात. अशा उपायांनीं कित्येकांचे भूतांचे भ्रमही मिटतात. आतां ज्योतिषसंबंधीं उपाय लिहितों.

## प्रकरण ३६ वें.

—०—

### भूत काढण्याचे ज्योतिषी उपाय.

जेव्हां कोणी इसम ज्योतिषास विचारावयास जातो कीं, आमचा आप्त किंवा शेजारी आजारी पडला आहे. तो कशानें पडला असेल ? आणि तो कोणत्या उपायानें चांगला होईल ? असें ऐकतांच जोशी त्यावेळचें लग्न ( रास ) तपासतो. ( त्याची रीत लिहिली असतां विस्तार फार होईल ह्मणून लिहित नाहीं. )

त्यावेळीं जर मेष लग्न असेल तर जोशी सांगतो कीं,—याला पितरांची पीडा आहे. त्याच्या शरीराचा दाह, चिंता, ताप व उलटी असे प्रकार होत असतील. यास्तव ब्राह्मण जेववावा. तर्पण व पिंडदान करावें. पांच दिवसपर्यंत पिंपळाच्या झाडास घड्यानें पाणी घालावें ह्मणजे दुःख जाईल.

वृषभ लग्न असल्यास जोशी सांगतो—गोत्राचा दोष आहे. यापासून ताप, तृषा, अशक्तता व कान आणि डोळे यांस विकार होतो. त्याच्या निवारणार्थ दुर्गेचा पाठ करून, नैवेद्य करावा व खिरीचा यज्ञ केल्यानें दोष दूर होतो.

मिथून लग्न असल्यास देवींचा दोष जाणावा. त्यापासून पाठीस दुःख व भ्रमिष्टासारखें होणें यास उपाय—देवीची स्थापना करून, पूजा करावी व गुग्गुळाचा होम १०८ वेळ करावा. ह्मणजे पीडा जाईल.

कर्क लग्न असल्यास—मोठ्या शंखिणीचा दोष जाणावा. त्याच्या योगें अन्नपचन न होणें, वायु होणें, तोंडास व डोक्यास पीडा होणें हीं लक्षणें होतात त्याच्या निवारणार्थ खीर व वड्यांचा नैवेद्य करावा. व संध्याकाळीं चव्हाट्यावर दिव्यासह उतारा नेऊन ठेवावा.

सिंह लग्न असेल तर प्रेताचा दोष जाणावा. तेव्हां शरीरास

कंप, वायुचा जोर होईल, तेव्हां दर्भानें पुतळी विधान करावें आणि पिंडदान व तर्पण करावें.

कन्या लग्न असल्यास कर्माची पीडा जाणावी. तेव्हां शंकरावर अभिषेक करवावा. होम करावा. त्या मनुष्यास अशी पीडा होईल कीं, संन्निपात, मूर्छा, फार वायु आणि पित्ताचा जोर होईल.

तूल लग्न असेल तर, क्षेत्रपाल—ह्मणजे एखाद्या जाग्यांतील देवापासून दुःख होतें. तेव्हां छातींत व पाठींत पीडा होईल. त्यासाठीं लाल फुलें, शेंदूर, तेल, उडीद व लोखंड यांचें दान ब्राह्मणास द्यावें. ह्मणजे पीडा मिटेल.

वृश्चिक लग्नांत वेताळ दोष. त्यानें ताप येऊन डोळ्यांस इजा होईल. यास्तव क्षेत्रपालांची पूजा व चंडीविधान केल्यानें मिटेल.

धन लग्न असल्यास महामारीचा दोष जाणावा. त्यानें डोक्यास तिडका शूळ, कंठास पीडा होते. त्यासाठीं खीर, वड्याचा नैवेद्य करून, संध्याकाळीं दिव्यासह उतारा चव्हाट्यावर ठेवावा.

मकर लग्न असल्यास, रस्त्याची देवी किंवा क्षेत्रपाळ यांची पीडा. त्यानें डोळ्यांस पीडा व ताप येईल. त्याच्या निवारणार्थ मातीचा पुतळा करून, लाल पुष्पांनीं पूजा करावी. व शंकरावर अभिषेक करावा ह्मणजे पीडा जाईल.

कुंभ लग्न असेल तर, पूर्वज किंवा गोत्रज देवांचा दोष

जाणावा. तेव्हां मन उदास राहून डोक्यास पीडा होईल. यास्तव पिंपळास पाणी घालावें, पिंडदान करावें, व ब्राह्मण भोजन घालावें, ह्मणजे पीडा मिटेल.

मीन लग्न असल्यास शंखिणीचा दोष जाणावा. त्यानें पोटांत जळजळ होऊन, ताप येतो. त्यावेळीं गुग्गुळाचा होम करावा. ब्राह्मण जेववावे. असें केल्यानें पीडा दूर होईल. याशिवाय ज्योतिषसंबंधीं उपाय पुष्कळ आहेत. ते गुजराथी लोक करितात. आतां तिसऱ्या विभागाचा सारांश लिहितों.

---

## प्रकरण ३७ वें.

—०—

### तिसऱ्या विभागाचा सारांश.

गुजरात वर्नाक्युलर मंडळीनें ठरविलें आहे कीं. वहिमानें मानलेल्या भुतांस शरीरांतून काढण्याकरितां काय काय उपाय करितात ? ते लिहावे. त्यावरून मी विचार केला. तेव्हां गुजराथेंत भूत काढण्याबद्दल हजारों उपाय करितात. त्यांतील कित्येक उपाय वेदांतील कर्मकांड ग्रंथांतील आहेत. कित्येक बौद्ध मताचे आहेत व कित्येक मुसलमानी मतांचे आहेत, त्यांतील मुख्य मुख्य उपाय यांत लिहिले आहेत.

त्यांत पंचाक्षऱ्याचे उपाय, वाचा वर्धन इत्यादि उपाय पूर्वींचे

नाहींत असें समजतें. आतां या तिसऱ्या विभागाचा सारांश असा आहे कीं, ज्या उपायांपासून, भुतांचा भ्रम धरणाऱ्या माणसांच्या मनांत विश्वास येतो कीं, आतां माझ्या शरिरांतून भूत गेलें. तेव्हां तें भूत जातें. अथवा कांहीं रोगानें किंवा दुःखानें पुनः भूत माझ्या अंगांत आलें, तेव्हां भूत येतें.

कित्येकांस भूत काढणाऱ्यांच्या पराक्रमाचा विश्वास येत नाहीं त्याचें भूत कधींही जात नाहीं. आणि कित्येक समजतात कीं, भूत खरोखर एखादे दिवशीं माझा जीव घेईल. त्याप्रमाणें तें जीव घेतें. भ्रमिष्ट मनुष्यास पाहिजे तितके दाखले देऊन, पाहिजे तेवढें शिक्षण द्या; तरी भ्रम मिटणार नाहीं व भुतांची गोष्ट खरी मानून उपाय करूं लागतील. ते लागू पडतील. आतां चौथ्या विभागांत भ्रम उत्पत्तिचा विस्तार लिहितों.

---

इतिश्री कविदलपतराम विरचिते भाषा गद्यबंधेभूतादिक भ्रम भंजन ग्रंथे भ्रमछेदन वर्तमानोपाय वर्णनं नाम तृतिय विभागम् ॥ ३ ॥

तिसरा विभाग समाप्त.

# भूत-पिशाच्च निर्णय.

## विभाग ४ था

### प्रकरण ३८ वें.

#### भ्रम उत्पत्तिचा विस्तार.

जसे गुजराथेंत भुतांचे भ्रम होतात, तसे दुसरेही पुष्कळ प्रकारचे भ्रम आहेत. मंत्र शास्त्रांचे ग्रंथ पुष्कळ वर्षांपासून चालत आले आहेत. त्यांत ६ प्रकारचे मंत्र आहेत १ मारण २ मोहन ३ स्तंभन ४ आकर्षण ५ वशिकरण व ६ उच्चाटण. मारण ह्मणजे एखाद्यास मारण्याचा मंत्र. मोहन ह्मणजे कान व डोळे यांस भ्रम उत्पन्न करण्याचा मंत्र. स्तंभन ह्मणजे चालत असेल ते बंद करण्याचा मंत्र. आकर्षण ह्मणजे ओढून घेण्याचा मंत्र. वशिकरण ह्मणजे एखाद्यास वश करण्याचा मंत्र. उच्चाटण ह्मणजे कोणासही पीडा करण्याचा मंत्र. ते मंत्र वेद, बौद्धमत, कुराण व पुराण यांतील आहेत. त्यांनीं वर लिहिलेलीं कामें होतील असा लोकांचा समज

आहे. आणखी सोनें, रुपें करण्याचा भ्रम, किमयेचा भ्रम व शकुनाचा भ्रम असे पुष्कळ प्रकारचे भ्रम आहेत. त्यांची हकिगत विस्तारानें लिहिली असतां ग्रंथ मोठा होईल, यास्तव थोडक्यांत लिहितों.

## प्रकरण ३९ वें.

### मारण मंत्र.

संवत् १९०१ च्या अश्विन महिन्यांत भावनगरचा राजा वजेसिंगजीचा मुलगा दादबा नांवाचा, शियोर गांवांत मरण पावला. त्याचवेळीं त्याचा सावत्र बंधु नारुभाई यानें भावनगरच्या पंचवीस ब्राह्मणांस प्रयोग करण्यास बसविलें होतें, त्यावरून शियोरच्या लोकांस असा संशय आला कीं, दादा कुंवरास मारण्याकरितांच हा प्रयोग करवीत आहे.

नंतर त्या मुलाच्या आईनें आपल्या मुलाच्या रक्षणार्थ, पुष्कळ देशी, परदेशी मंत्र तंत्र जाणणारे ब्राह्मण, जती, फकीर इत्यादिकांस बोलावून आणिलें. असे सुमारें १०० जाणणारे जमा झाले होते. त्यांतील कित्येक ब्राह्मण मृत्युंजय मंत्रानें शंकरावर संपूट रुद्राभिषेक करीत होते, कोणी बगलामुखीचा पाठ चालविला होता, आणि एक कलकत्त्यांतील वाणी तेथें होता; त्यानें पुष्कळ तऱ्हेचे मंत्र,

तंत्र केलें होतें. तरी त्या सर्वांचें कांहीं न चालतां तो मुलगा मरण पावला होता.

नंतर अशी बातमी पसरली कीं, नारुभाईनें होम केला, त्यांत बकऱ्याच्या तोंडांत भाताचा कोंडा भरून, तो बकरा अग्निकुंडांत टाकला. त्या प्रयोगांत बसलेले ब्राह्मण तेलानें न्हाले होते. त्यांत गिरजाशंकर मुख्य होता त्याला भीति उत्पन्न झाली कीं, दादाबा-कडील माणसें मला हत्यारानें मारून टाकतील.

त्या भीतिस्तव नारुभाईनें त्याच्याबरोबर नेहमीं फिरण्याकरितां पांच शिपाई दिले होते. त्यावेळीं पुष्कळ लोक असें समजले कीं, या ब्राह्मणानें प्रयोग करून दादाबास मारला आहे. अशा प्रकारच्या पुष्कळ गप्पा या मरणाबद्दलच्या ऐकण्यांत येतात.

एखादें मनुष्य अकस्मात् मेल्यास गुजराथी लोक समजतात कीं, या मनुष्यास कोणी मूठ मारली. त्यामुळें मेला. मुठीनें झाड सुकतें, दगड फुटतो. अशा दंतकथा पुष्कळ आहेत. आतां मोहनमंत्राची गोष्ट खालीं लिहितों.

## प्रकरण ४० वें.

—०—

### मोहनमंत्र.

मोहनमंत्राच्या गोष्टी मंत्र शास्त्रांत आहेत. पण हल्लीं गुजराथेंत मोहनविद्या वाढत्या प्रमाणावर चालत आहे. ती अशी कीं, डोळ्यांस व कानांस मोह उत्पन्न करण्याची कळा जाणणारे, एखादी वस्तु विहिरींत टाकून, दुसऱ्या जागेंतून काढून दाखवितात. अनोळखी मनुष्याचें नांव कर्ण पिशाच्य विद्येनें सांगतात, लुगडें जाळून टाकून तें पुनः आखें करून दाखवितात, आंब्याचें झाड त्वरित उत्पन्न करितात, चामड्याचा सर्प करितात, खड्यांचे रुपये करितात, रिकाम्या हातांतून अनेक जिन्नस काढतात. असे चमत्कार पाहून मूर्ख लोक समजतात कीं, कोणी वीर येऊन असें काम करितो. पण ही गोष्ट शास्त्राच्या उलट आहे आणि असें काम करण्यास देवाची लाज वाटत नाहीं.

स्तंभन मंत्र ग्रंथांत आहेत. त्यांत लिहिलें असतें कीं, या मंत्रानें शत्रूचें सैन्य येत असल्यास थांबतें. वाद्यांचें तोंड बंद होतें, प्रतिवादीची बुद्धि मंद होते, वाहतें पाणी बंद होतें व पळणारा चोर उभा राहतो.

आकर्षण मंत्राच्या गोष्टी मी ऐकिल्या आहेत कीं, एका राजा-

च्या राणीनें दासीकडून बाजारांतून सुगंधी तेल मागविलें होतें. तें घेऊन दासी येत होती, तिला एक जती भेटला. तो तिला ह्मणाला—या तेलांतून एक काडी भरून मला घेऊं दे. मग त्यानें आकर्षण मंत्र पढून त्या तेलांत सळई फिरवून बुडवून घेतली. त्यांत त्या दासीस कांहीं समजलें नाहीं. नंतर तें तेल राणीनें वाटींत ओतलें, तों तें फिरूं लागलें. तेव्हां राणी दासीस ह्मणाली—तुला रस्त्यांत कोण मिळालें होतें ? ती ह्मणाली—आपल्या जतीनें यांतून एक सळई बुडवून तेल घेतलें; दुसरें कोणी मला रस्त्यांत भेटलें नाहीं. मग तें तेल तेथें एक दगड पडला होता, त्यावर ओतून टाकलें. तेव्हां तो दगड रात्रींत तेथून उडून त्या जतीच्या आश्रमांत जाऊन पडला. ती बातमी राजास कळतांच, त्या जतीस मारून टाकला.

वशिकरणाच्या गोष्टी गुजराथेंत पुष्कळ चालतात. त्यांत कित्येक बायका आपल्या नवऱ्यास वश करण्याकरितां, एखाद्या मंत्र जाणणारापासून, दोरा किंवा चिठी करून घेऊन, ताईतांत ठेवतात. किंवा एखादी जिन्नस मंत्रवून खावयास देतात.

कारभारी लोक राजास वश करण्याकरितां, मंत्रोपाय करितात. व कित्येक पुरुष बायकांस वश करण्याकरितां मंत्र जाणणारापासून फसतात.

उच्चाटण ह्मणजे कोणा शत्रूस मारून टाकतांना दया येईल तेव्हां

किंवा बदफैली बायको आपल्या नवऱ्याला वेडा करण्याकरितां उच्चाटण मंत्राचा उपाय करवितात.

किमयेबद्दलही कित्येक ग्रंथांत लिहिलें आहे. पण सांप्रतकालीं सोनें किंवा रुपें बनत नाहीं. अशा गोष्टीपासून पुष्कळ लोक फसतात.

शकुनाबद्दल भ्रम, ह्मणजे जो कोणी मनुष्य कामाकरितां घरांतून बाहेर निघतो, तेव्हां चांगला शकून झाल्यास तो मनांत राजी होऊन कामास जातो. आणि वाईट शकुन झाल्यास मागें फिरतो. किंवा जरूरीच्या कामासाठीं जाणें झाल्यास, मनांत राजी नसून, वाईट शकुनामुळें काम होणार नाहीं असें मनांत समजतो. आतां मी या ठिकाणीं लिहितों कीं, शकुनांत अरुंधतीचें ( मनोत्साहाचें ) मत घ्यावें. आणखी सांगितलें आहे कीं, जेव्हां मनास उल्हास येईल तोच शकून उत्तम समजावा. आतां भ्रम शोधन विस्तार पुढें लिहितों.

---

## प्रकरण ४१ वें.

—o—

### भ्रम शोधन विस्तार.

हा ग्रंथ फार मोठा होईल, याकरितां मंत्राच्या शोधाचे प्रकार थोडक्यांत लिहितों.

वडनगरांतील कांहीं मंडळी परदेशांत कमाईकरितां गेली. तेथें ते सिद्धसाधक होऊन, निरनिराळे वेष धरून गांवांत राहिले. इतक्यांत तेथील सावकाराचा मुलगा मरण पावला. त्याची तिरडी उतरून जोग्यानें त्यास जीवंत केला. आणि भविष्य सांगितलें कीं, राजाचे चार घोडे मरतील. असें ऐकून त्या चार घोड्यांस विष घालून मारून टाकले व प्रयोग करून राजाचें आयुष्य वाढविलें.

सोन्याची आंगठी लपवून, ओतलेली पितळेची आंगठी विहिरींत टाकून, ती आंगठी दुसऱ्या ठिकाणाहून काढून देऊन भ्रम उत्पन्न करितात.

एक लुगडें जाळून टाकून, तसेंच दुसरें लुगडें दाखवून ठकावितात.

कोऱ्या कागदावर रुईच्या चिकानें अक्षरें लिहून, त्यावर सुकी पिंजर टाकून, तीं कुंकवाचीं अक्षरें दाखवून, हा ब्रह्मदेवाचा लेख आहे; असें समजावून मोठ्या राजासही फसवितात.

रिकामा हात दाखवून, कित्येक जातीच्या वस्तु त्यांत काढून दाखवितात. तें सर्व हाताच्या चलाखीवर आहे. तें मंत्रानें झालें असें समजूं नये. कारण कीं विलायतेंतील पुष्कळ लोक अशा क्रिया जाणतात.

स्तंभन व आकर्षणाच्या दंतकथा या जगांत चालतात, त्या लिहिल्यास पुरणार नाहींत.

एके ठिकाणी ताडाचीं ९ झाडें होतीं; तीं आकर्षण मंत्र जाणणारानें उडविलीं. तीं उडतांना पाहतांच, स्तंभन मंत्र जाणणारानें पंधरा कोसांवर थांबविलीं. त्यांसच अमदाबादेंत हल्लीं नवताड असें ह्मणतात. पण त्याचें कारण कांहीं दुसरें असेल!

एक मोठें लिंबाचें झाड एकाच्या घराजवळ होतें, तें सरकारानें तोडण्याचा हुकूम दिला. तेव्हां मंत्र जाणणारानें तें झाड जमिनींत लपवून, वर टोपलीचें झांकण घातलें. पुढें पांच दिवस झाल्यावर तेंच झाड प्रगट झालें. अशा दंतकथा पुष्कळ चालतात.

एका शिवधर्म पाळणाऱ्यास एका मुसलमान जादुगारानें शिवलिंग देऊन सांगितलें—तुझा महादेव खरा असेल तर हें लिंग सांभाळून ठेव. नाहींतर माझ्या पीराजवळून मागवून घेईन. नंतर त्यानें ही गोष्ट एका वृद्ध मनुष्यास सांगितली, तेव्हां त्यानें जाणलें कीं, तें लिंग बरासकापुराचें आहे. तें थोड्याच दिवसांनीं उडून जाईल.

एका राजाच्या दोघी राण्यांस एका ब्राह्मणानें वशिकरणाच्या दोन चिठ्या करून दिल्या होत्या. त्यांत लिहिलें होतें कीं, मोठ्या राणीचा मान वाढेल तर आह्मांस बरें होईल. आणि धाकट्या राणीचा वाढेल तरीही बरें आहे. नंतर त्या चिठ्यांपासून दोन्हीं

राण्याचें इच्छित काम झालें. तें राजास समजतांच,—ताईतांतून चिठ्या काढून वाचतांच हंसण्यासारखें झालें.

किमयेबद्दल कोणी विचार करीत नाहींत कीं, जर किमया करणारास सोनें, रुपें बनवितां येत असतें, तर तो आपण स्वतःच मोठा पैसेवाला होऊन बसला नसता काय ? दुसऱ्यास कशासाठीं सोनें करून दिलें असतें ? आतां अपशकुनाबद्दल लिहितों.

## प्रकरण ४२ वें.

### अपशकून.

एका गांवांतील पांच इसम अक्षतृतियेच्या पहांटेस उठून गांवाच्या बाहेर शकून पाहण्यास गेले. त्यांनीं कोल्ह्यादिकांचे शब्द ऐकतांच, ते मागें फिरले. त्यांतील एक मागें येतांना लघ्वीस बसला. व चौघेजण तेथें उभे राहिले. त्यावेळीं जवळच एक शेतकरी राहत होता. त्यानें आपल्या बायकोस विचारलें—या वर्षांत आपल्याला बैल घ्यावा लागेल कीं, नाहीं ? बायको ह्मणाली हे चार उभे आहेत त्यांस कांहीं व्हावयाचें नाहीं; पण हा एक बसला आहे त्याची या वर्षांत आशा नको. हा मरेल असें मला वाटतें.

असा अपशकून ऐकून, जो मनुष्य लघ्वीस बसला होता, त्याच्या मनाला खास वाटलें कीं, या वर्षांत मी जीवंत राहाणार

नाहीं. पुढें मी ऐकिलें कीं, तो मनुष्य त्या काळजीनें अगदीं शुष्क होऊन मरण पावला.

गुजराथेंत भूतांच्या भ्रमानें जशीं माणसें मरतात, तसेच दुसरे पुष्कळ जातीचे भ्रम आहेत, त्यांनीं भोळीं माणसें मरण पावतात. यास्तव मनुष्यांस समजूत येईल, आणि अशा भ्रमाबद्दलच्या गोष्टी खऱ्या न मानतील तर फार चांगलें. शास्त्रांतही अशा प्रकारच्या गोष्टी कोठें लिहिल्या नाहींत.

एका कुणबीण ह्मातारीच्या घराच्या छपरावर एक कपोतपक्षी बोलत असे. ह्यावेळीं ती म्हातारी रडत ओरडत असे. त्यावेळीं एक ब्राम्हण तेथें आला. त्यास म्हणाली—महाराज, हा पक्षी माझ्यामागें लागला आहे, यानें माझा धनी, दोन मुलगे व एक मुलगी यास खाल्लें आहे. आणि अजून माझ्या जिवावर उठलाच आहे. तो रोज येऊन माझ्या घरावर बसून ओरडत असतो.

मग त्या ब्राम्हणानें खडे मंत्रून दिले. ते सात दिवसपर्यंत त्याचे-समोर टाकले. तेव्हांपासून तो पक्षी येण्याचा बंद झाला. मग त्या म्हातारीनें त्या ब्राम्हणास ईश्वरासारखा मानला.

गुजराथेंत कोणाच्या घरावर कपोत पक्षी नित्य बसेल, किंवा घुबड बसेल तर त्याच्या घरांतील माणूस मरेल, असें लोक समजतात. तसेंच कोणा मनुष्यावर कावळा बसेल किंवा पाल पडेल, तर त्याचें आयुष्य कमी होईल. यास्तव त्यावेळीं आंगावरील कपडे

ब्राह्मणास देऊन स्नान करितात. राजा असेल तर शांति करून होम करितो हें काम तर ठीक आहे, कारण कीं, कोणत्याही प्रकारें पुण्य घडतें.

एखाद्या गरीब माणसांस द्रव्य खर्चून पुण्य करण्याची शक्ति नसेल, तर अशा शकुनांपासून विस्मय पावून जीव जाळूं नये. कारण कीं, त्यापासून उन्माद रोग होतो. यास्तव तशा लोकांनीं परमेश्वराचें नामस्मरण करावें. आणि निर्भय रहावें. सांगितलें आहे कीं, " येन मस्यंति गोविंदं न तेषा बाधते भयम् ॥ जे परमेश्वरास भजतात, त्यांस भय बाधत नाहीं.

जन्मपत्रिका किंवा वर्षफळ यांवर विश्वास ठेवून, अथवा संक्रांतिफलांचा निश्चय लाभ जाणून, व्यापाराकरितां वस्तूंचा संग्रह करूं नये. व येत्या वर्षांत राजयोग उत्पन्न होणार आहे. ह्मणून उदार होऊन घरांतील द्रव्याचा नाश करूं नये. आतां भ्रम छेदनाचा विस्तार पुढें लिहितों.

---

## प्रकरण ४३ वें.

—o—

### भ्रमछेदन विस्तार.

कित्येक प्रकारचे भ्रम मिटविण्यासाठीं, किंवा पुढें लिहिलेले

मारणादिक कामासाठीं मंत्राचे प्रयोग करितात. त्यांत जे वेदांचे मंत्र आहेत, त्यांचा अधिकार सांप्रतकालीं ब्राह्मणांशिवाय दुसऱ्या वर्णांस नाहीं. त्याकरितां तसे मंत्र लिहित नाहीं. मुसलमानी एक मंत्र ३५ व्या प्रकरणांत लिहिला आहे. तसेच बौद्धमताचे मंत्रही पुष्कळ आहेत, त्यांत घंटाकरण वीराचा मंत्र मुख्य आहे. त्याची रीत थोडक्यांत लिहितों. भूत काढण्याकरितां हे मंत्र पुष्कळ चालतात.

त्यांचे प्रयोग ज्यावेळीं हस्त मूळ व पुष्य हीं सूर्य नक्षत्रें असतील तेव्हां दिवसास पंचमी, दशमी किंवा पौर्णिमा आणि रात्रीस अष्टमी, चतुर्दशी किंवा अमावाश्या असेल, त्या तिथींवर याचें साधन करतात. त्यांत चांगल्या कामाकारितां दिवसास आणि मारण व उच्चाटण यांच्याकरितां रात्रीस करितात.

मंत्रसाधन बाग, देऊळ किंवा वरांत पवित्र जागा पाहून एकांतांत बसून करितात. प्रथम ' ॡीँ ॡीँ क्लीं गंगजलाय नमः ' या मंत्रानें स्नान करितात. ' उँ ॡीँ क्लीँ आनंद देवाय नमः ' या मंत्रानें शुद्ध वस्त्र परिधान करितात. नंतर ' उँ ॡीँ श्रीँ भूम्यादि देवतायैनमः या मंत्रानें पृथ्वीची पूजा करून त्या ठिकाणीं बसतात.

धूप, तूप व तेलाचा दिवा करितात. नंतर घंटाकरणाचें मनांत

स्मरण करून, चौकोनी यंत्रांत फिरता मंत्र लिहितात. ( आकृति नंबर ३ पहा. ) तो मंत्र ' ॐ नमो घंटाकर्णो महावीरः ' इत्यादि मंत्र २३००० बेचाळीस दिवसांत जपून पुरा करून मग होम करितात.

पुरुष आकाराचें यंत्र काढून त्यांत मंत्र लिहून, ती चिठी ताईतांत ठेवितात. त्यानें भूतप्रेतादि पळून जातात. राजाची भीति नाहींशी होते. या मंत्रानें प्रातःकाळीं एकवीस वेळ पाणी मंत्रून तीन वेळ हातांत घेऊन प्याल्यानें विद्या प्राप्त होते. हा मंत्र एकविस वेळ पढून थुंकीचा टिळा लावावा. तो टिळा राजानें पाहिला असतां, राजा वश होतो. हा मंत्र २१ वेळ पढून आपल्या पागोटीच्या पदरास गांठ दिली असतां, शत्रु वश होतो. हा मंत्र ७ वेळ पढून टिळा लाविला असतां आपली बायको वश होते. २१ वेळ पढून आपल्या आंगावरील कपड्यास गांठ दिली असतां, रस्त्यांत चोर, जनावर अग्नि, जळ इत्यादि आठ प्रकारच्या भीति नाहींशा होतात. या मंत्राचें मनांत स्मरण केल्यानें शाखिणीचें व ग्रहाचें भय मिटतें.

षट्कोन ( आकृति नंबर ४ पहा. ) यंत्र लिहून, सफेत कपडे आंगावर घेऊन, सफेत आसनावर पूर्वेकडे तोंड करून बसावें आणि सफेत माळेनें हा मंत्र ११ लक्ष वेळां जपून द्राक्षें, चारोळी, बदाम व खोबऱ्याची वाटी हीं होमांत टाकल्यानें धन मिळतें.

अष्टदल यंत्र ( आकृति नंबर ५ पहा. ) लिहून, मंत्र जपल्यानें व होम केल्यानें संतान होतें. हा मंत्र भुजपत्रावर लिहून, ताईतांत घालून, तो ताईत ज्या स्त्रीस द्यावा ती वश होईल.

ह्या घंटाकरणाचा एक कल्प आहे. त्यांत अशा पुष्कळ गोष्टी लिहिल्या आहेत कीं, या रीतीनें मंत्र जप व होम करील तर शत्रु मरेल. अग्नि, सिंह व चोर यांचें स्तंभन होईल.

आणखी सर्प, विंचू उतरण्याची रीत, तापाच्या दोऱ्याची रीत असे पुष्कळ प्रकार त्यांत लिहिले आहेत. पण या ठिकाणीं त्यांतील थोडकेच प्रकार लिहिले आहेत.

पंचकोन यंत्र ( आकृति नंबर ६ पहा. ) कागदावर लिहून, मारक्या गाईच्या किंवा हैशीच्या यांच्या गळ्यांत बांधलें असतां दूध काढूं देतील, या मंत्रानें मारण, उच्चारण, वशिकरण स्तंभन, आकर्षण व मोहन हीं सर्व कामें होतात. त्यांच्या होमाच्या व जपाच्या रीति निरनिराळ्या आहेत.

याचा सारांश असा आहे कीं, मी अशा प्रकारचे मंत्र, तंत्र पुष्कळ पाहिले आहेत. पण त्यांपासून कांहीं काम झालें नाहीं. हा केवळ भ्रम आहे. कित्येक खरे मंत्र असतील; पण सांप्रतकालीं ते सिद्ध होत नाहींत. असें समजून कोणत्याही गोष्टीचा भ्रम धरूं नये.

आपल्या सुखासाठीं देवाच्या नांवाचा मंत्र जपावा. पण त्या देवाबरोबर गप्पा सांगण्याची आशा धरूं नये. मंत्राच्या नांवानें

कोणी चमत्कार करून दाखवितात; पण ती हाताची चलाखी आहे. त्यांत मंत्राचें कारण लागत नाहीं.

एका सर्प उतरणाऱ्या माझ्या मित्रास मी सांगितलें कीं, मंत्र ह्मटल्यावांचून पाणी शिंपून उतरा पाहूं ? सर्प उतरतो कीं नाहीं उतरतो तो ! नंतर तसें करतांच सर्प उतरला खरा ! सर्प उतरणाराचा आणि उतरविणाराचा पक्का विश्वास असेल, तर परमेश्वराच्या नांवाच्या मंत्रानें देखील सर्प उतरतो ! त्याबद्दलची एक गोष्ट अमदाबाद शहरांतील नगरशेट हिमाभाई यानें मला सांगितली होती ती अशी—

त्या शहरांत एका मुसलमानाचा व एका जतीचा स्नेह जमला. तेव्हां त्यानें जतीस सांगितलें कीं, तुमच्याजवळ मंत्र पुष्कळ आहेत. त्यांतील ज्यापासून सर्व कामें होतील, असा एक मंत्र मला द्या. मग त्यानें नवकाराचा महामंत्र दिला. त्या मंत्रानें त्या मुसलमानानें सर्प, विंचू वगैरे पुष्कळजणाचे उतरले. तेव्हांपासून त्या शहरांत त्याच्यासारखा सर्प उतरणारा कोणी नाहीं; अशी त्याची प्रसिद्धी झाली.

नंतर एका वाण्यानें त्याची प्रार्थना करून, सर्प उतरण्याचा मंत्र त्याचेजवळ मागितला. तेव्हां त्यानें तो नवकार मंत्र त्यास सांगितला. तो ऐकून वाणी ह्मणाला—हा मंत्र आमच्या बहुतेक वाण्यांस येत आहे. असें सांगून तो बोलून दाखविला. त्यावरून तो मुसल-

मान समजला कीं, हा मंत्र तर सर्वांस येत आहे. मग यांत काय आहे ? पुढें त्या मंत्रापासून सर्प किंवा विंचू उतरला नाहीं.

---

## प्रकरण ४५ वें.

—०—

### दृष्ट न लागण्याचा उपाय.

चौदाव्या प्रकरणांत दृष्ट लागण्याबद्दल लिहिलें आहे. दृष्ट लागूं नये ह्मणून अगोदरच कित्येक उपाय करून ठेवितात, ते असे कीं, जेव्हां मुलाच्या आंगावर दागिने किंवा कपडे घालितात. तेव्हां त्याच्या कानाजवळ किंवा गालावर मशीचीं बोटें लावितात. त्याचें कारण कीं, काळ्या रंगाला किंवा लोखंडाला दृष्ट बाधत नाहीं.

आणखी मुलास दृष्ट लागूं नये ह्मणून तांब्याच्या पत्र्यावर पंधरा यंत्र किंवा विसायंत्र काढून मुलाच्या गळ्यांत बांधतात. कोणी बजरबट्टु किंवा पत्र्याचें बाहुलें गळ्यांत बांधतात. वनस्पतिच्या पानाची आंगठी, वाघाचें नख अथवा दांत सोन्याचांदींत मढवून गळ्यांत बांधतात. लोखंडाची आंगठी करून ती इतर दागिन्यांबरोबर गळ्यांत बांधतात. पागोटी बांधण्या एवढें मूल झालें ह्मणजे पागोटींत लिंबू ठेवितात. हनुमान पताका ( आकृति नंबर ७ प्रमाणें ) यंत्र भोजपत्रावर लिहून तें रुप्याच्या किंवा तांब्याच्या ताईतांत घालून गळ्यांत किंवा हातांत बांधतात.

पंचरंगी दोरा किंवा कुमारीनें कांतलेल्या सात सुतांचा दोरा करून, तो मंत्रून दिवाळीच्या रात्रीं अथवा रविवार, मंगळवारीं मंत्र जाणणारापासून सात गांठी मारून घेऊन तो दोरा ताईतांत घालून बांधतात.

मसणवटींतून लोखंडाचा खिळा कोणास मिळाला असेल, त्याचें अथवा मंगळवारीं संध्याकाळीं मसणवटींत जाऊन एक खिळा पुरून येतात, तो खिळा आठवे दिवशीं मंगळवारींच संध्याकाळीं काढून आणून त्याचें कडें करून, तें दिवाळीच्या रात्रीं किंवा ग्रहणांत मंत्र्यापासून मंत्रून घेऊन तें सोनें किंवा रुपें यांनीं मढवून ह्यातांत घालतात.

असे पुष्कळ उपाय दृष्ट लागूं नये ह्मणून अगोदरच करून ठेवितात. आतां कित्येक वस्तूंस दृष्ट न लागण्याचे उपाय लिहितों.

---

## प्रकरण ४६ वें.

—०—

### वस्तूंस दृष्ट न लागण्याचे उपाय.

एखाद्या पर्वणीच्या दिवसांत सुखडिया[1] लोक तऱ्हेतऱ्हेच्या मिठाई करून विकावयास बसतात. त्यांस कोणाची दृष्ट लागूं नये ह्मणून लिंबू किंवा लोखंडाचा खिळा ठेवितात. लग्नाकरितां किंवा एखाद्या

---

१ गूळ, साखर वगैरेचे लाडू विकणारे.

दिवशीं कोणाच्या घरीं शेव, वडे, पापड करतांना दृष्ट लागूं नये ह्मणून त्यांत लिंबु किंवा सुरी ठेवितात.

नवे दागिने, नवा रंगित घोडा, नवा पाळणा अशा नव्या वस्तूंस काळा दोरा गुंडाळतात. तो गुंडाळला नसेल आणि जर कदाचित् ती वस्तु फुटलेली किंवा नुकसान झालेली दिसली तर तिला दृष्ट बाधली असें समजतात. नव्या लुगड्यास काळ्या दोऱ्याचा कशीदा करितात.

चौकांत पुष्कळ मनुष्यास जेवण्याकरितां, दूधपाक करीत असतां, त्या दुधास कोणाची दृष्ट लागूं नये ह्मणून त्या कढईत कोळशाचा तुकडा टाकितात. तांदुळ, डाळ बाजारांतून आणतांना किंवा घरांत आणल्यावर, कोणाची दृष्ट बसली असेल, त्यासाठीं जेवण करणारीं मनुष्यें त्या अन्नांतील थोडें घेऊन, तपेल्यावर फिरवून चुलींत टाकतात.

अशा गोष्टी मी दृष्टीनें पुष्कळ पाहिल्या आहेत. ह्मणून येथें लिहिल्या. जेव्हां मूल आजारी किंवा दुर्बल होतें, तेव्हां त्याची आई जोशास विचारून उतारा काढते. त्याबद्दलचा प्रकार पुढें लिहिलों.

वरील दोन प्रकरणावर ४५ चे ठिकाणीं ४४ व ४६ चे ठिकाणीं ४५ समजावें.

## प्रकरण ४६ वें.

—०—

### दृष्टीचा उतारा.

मुलाची आई जोशास विचारते कीं, हें मूल कशानें आजारी किंवा दुर्बल झालें असेल? तेव्हां जोशी सांगतो कीं. या मुलास दूध पाजते वेळीं कोणी मनुष्य आलें असेल व त्याची दृष्ट लागली असेल? ( आईची व बापाचीही दृष्ट मुलास बाधते. ) त्याकरितां रविवार किंवा मंगळवारच्या दिवशीं कोऱ्या गाडग्यांत दूध घेऊन तें चार रस्त्याच्या चौकांत पाण्याचें कुंडाळें करून, संध्याकाळचे वेळीं त्यांत टाकून ये ह्मणजे दृष्ट बाधा दूर होईल.

अथवा जोशी त्या मुलाच्या आईस विचारतो कीं, या मुलास तुह्मीं कांहीं भरवित होतां, त्यावेळीं तेथें कोणी मनुष्य आलें होतें? त्याची दृष्ट लागली आहे. मग त्या मुलाची आई विचार करून सांगते—मी अमकी वस्तु या मुलास भरवित होतें, तेव्हां एक मनुष्य आलें होतें; त्याचीच दृष्ट लागली असेल?

नंतर जोशी सांगतो. ती वस्तु कोऱ्या गाडग्यांत घेऊन वर सांगितल्याप्रमाणें ठेवून यावें ह्मणजे सुख होईल. कदाचित् एखाद्या

मुलाची आई सांगते कीं, मला कांहीं माहीत नाहीं कधीं दृष्ट लागती ! तेव्हां जोशी उपाय सांगतो कीं, सांजा, भाकर, चण्याच्या घुगऱ्या, वडे, व खीर एवढ्या जिनसा कोऱ्या थाळींत अथवा रामपात्रांत ठेवून, पिंवळा कपडा, चार वाती लावलेला गव्हांच्या पिठाचा दिवा असा उतारा संध्याकाळीं चार गल्लीच्या नव्हाळ्यावर पाण्याचें कुंडाळें ( गोल कडें ) करून त्यांत ठेवावा.

उतारा ठेवावयास जातां येतांना तोंडानें कांहीं बोलूं नये. व त्या कुंडाळ्यांत ठेवतेवेळीं असें बोलावें कीं, " घे भोग आणि टाळ रोग. " या कुंडाळ्यास गुजराथेंत 'डांकीण कुंडाळें' ह्मणतात. त्या कुंडाळ्यावर रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्याचा पाय पडल्यास, तो पाय लुला होतो. असें लोक समजतात.

आतां मुलास दृष्ट लागली आहे कीं नाहीं ? याची परीक्षा करण्याकरितां दृष्ट काढतात; त्याचा प्रकार पुढें लिहितों.

## प्रकरण ४७ वें.

—०—

### दृष्ट काढण्याचा प्रकार.

दृष्ट अशी बांधतात कीं, कांशाच्या थाळींत धूर नसलेला विस्तव घेऊन, राईचे दाणे ७ व मिठाचे खडे ७ मुलाच्या माथ्यावरून उतरून त्या विस्तवावर टाकतात. व त्यावर कांशाचा वाटगा उपडा घालितात. तो चांगला तापेपर्यंत खालील मंत्र ह्मणतात—"आप

दृष्ट, बाप दृष्ट, घरची, बाहेरची, चोराची, चऱ्हाट्याची, वाटेची, गांवाची, सिमेची, मेलेलीची, गेलेलीची, भूताची, पलिताची, शाकिणीची, डाकिणीची, ज्याची दृष्ट असेल त्याची या पात्रांत येवो."

हा मंत्र ह्मणून त्या मुलाच्या डोक्यावरून उतरलेला पाण्याचा तांब्या त्या वाटग्यावर गाईच्या शेणासह ओततात. तेव्हां त्या वाटग्याच्या आजुबाजूस तें शेण चिकटून बसतें. त्यामुळें तो वाटगा सुटत नाहीं. त्यावरून त्या मुलाची आई समजते कीं, यास जबर दृष्ट लागली आहे

तो वाटगा सुमारें तीन दिवसांनीं निघतो. तेव्हां समजतात कीं आतां दृष्ट उतरून गेली. या वाटग्यावर पाणी ओततांना जर कदाचित् वाटग्याच्या तळांत पाणी गेलें तर वाटगा चिकटत नाहीं. त्यावरून मुलाची आई समजते कीं, यास दृष्ट लागली नाहीं. कांहीं दुसरें कारण असेल.

इतक्यांत कोणी शेजारीण येऊन सांगते कीं, घडुला[1] करा. ह्मणजे दृष्ट लागली असल्यास, लगेच समजेल. नंतर ती असें करते कीं, मुलावरून पाण्याचा भरलेला तांब्या उतरून, थाळींत ओतते. मग कोऱ्या लहान घड्यांत पेटलेलें गवत घालून तो घडा त्या थाळींत उपडा घालतांच, पाणी घड्यांत बुडबुड वाजूं लागतें. त्यावरून ती बाई समजते कीं, याला नजर लागली आहे. आणि

---

१ गुजराथेंतील दृष्ट काढण्याचा एक प्रकार.

जर तें पाणी बुडबुड वाजलें नाहीं तर समजते कीं, मुलास दृष्ट लागली नाहीं. हा घडा व दृष्ट बांधण्याची रीत ( ही रीत उत्पन्न करणाराचा हेतु असा दिसतो कीं, अशा रीतीनें मुलाच्या आईला धीर द्यावा कीं, दृष्ट बांधली आहे, आतां मुलास सुख वाटेल. ) यांचें कारण जाणण्यासाठीं मी करून पाहिली. त्यावरून समजण्यांत आलें कीं, विस्तवानें वायु जळून जातो त्यामुळें बुडबुड आवाज होतो. हा प्रकार दृष्टीच्या कारणानें होत नाहीं. आतां ' रथ फिरतो ' इत्यादि भ्रमाबद्दल पुढें लिहितों.

## प्रकरण ४८ वें.

—०—

### आंगावर रथ फिरण्याचा प्रकार.

एखाद्या मनुष्याचें आंग वायुरोगानें हालत असतें, तें वांकडें होऊन तसेंच राहतें. त्यावरून त्या रोगाचें नांव गुजराथेंत असें ठेवितात कीं, 'या माणसावर रथ फिरला आहे. त्याचें कारण असें आहे कीं—सकाळीं व संध्याकाळीं देवाचे रथ आकाशांत फिरत असतात. त्यावेळीं घराच्या निवाखालीं बसूं नये व उभें राहूं नये. तसेंच चार गल्लीच्या चौकांत राहूं नये. मैदानांत उघड्या माथ्यानें राहूं नये. अशा ठिकाणीं त्यासमयीं उभें राहिल्यानें त्यावर रथ फिरतो, असें लोक समजतात.

नवरात्राच्या दिवसांत, व रात्रींत देवांचे रथ आकाशांत फिरतात त्या समयीं जें सुंदर स्वरूपाचें मूल असेल, त्यास किंवा श्रीमंताच्या मुलांस कित्येक लोक आपल्या घराच्या बाहेर जाऊं देत नाहींत. अशीं दिवसांत भूतें प्रेतें देखील फिरतीं राहतात. त्या दिवशीं जो भिईल, झडपेल त्यास भूत पछाडतें.

आणखी लोक सांगतात कीं, घराच्या निवाखालीं. उमरठ्यावर बसून मुलास भरवील तर तें मूल मुकें होईल. रविवारीं किंवा मंगळवारीं उमरठ्यावर, व्हाईनावर ( उखळावर ) किंवा जांत्यावर बसून जो वारा घेईल, त्याचा जीव फिरेल किंवा वायु येईल.

सूप, चाळण डोक्यावर उपडी पाडील किंवा दिव्याखालून जाईल त्याच्या आंगावर केंसतुडें होतील. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यावरून ओलांडून जाईल, तर ओलांडणाराचें शरीर वाढणार नाहीं. तोच मनुष्य ओलांडा काढील तर दोष नाहीं.

चारजण खाटेवर बसले असतील, ते समयीं त्या खाटेखालून मांजर जाईल, तर त्यांतील एक मनुष्य मुकें होईल. यास्तव तीन किंवा पांच माणसांनीं बसावें. चार माणसांनीं बसूं नये.

जैनधर्माचा जती मृत्यु पावल्यास, त्याला पालखींत बसवून स्मशानांत नेतात, त्यावेळीं कोणी स्त्री त्या पालखी खालून जाईल तर तिला मुलगा होईल असें समजतात.

विटाळशी बायकोची सावली सर्पावर पडल्यास तो आंधळा होतो. मनुष्याच्या जखमेवर छाया पडल्यास, ती जखम बरी होत नाहीं. लोणच्याच्या भांड्यावर सावली पडल्यास तें लोणचें बिघडतें. इत्यादि पुष्कळ वहीम आहेत. आतां देवींच्या रोगावर सावली पडते त्याविषयीं लिहितों.

## प्रकरण ४९ वें.

—०—

### देवीचा रोग.

या वर्षांत माझ्या शेजारणीची मुलगी, सुमारें चार वर्षांची होती; तिला देवी निघाल्या. तिचीं आईबापें वृद्ध झालीं होतीं. त्यांस दोन मुलगे आणि एकच मुलगी होती, त्यामुळें त्या मुलीवर आईबापांचा जीव होता.

त्या मुलीची खाट घरांत ठेवून, आडवा पडदा बांधला, लिंबाचे टाळे दाराजवळ खोंचून ठेविले. व एका रामपात्रांत गाढवाच्या लेंड्या, गोमुत्र व लिंबाचीं पानें अशीं ठेविलीं होतीं. जर कोणी घरांतील मनुष्य कांहीं कामाकरितां बाहेर गेलें, तर आंत येतां त्या रामपात्रांत उजव्या पायांचा आंगठा बुडवून घरांत येई.

तसेंच कोणी आप्त, शेजारीं किंवा दुसरें मनुष्य पहावयास येईल तर त्या रामपात्रांत पाय बुडवून घरांत जाई. असा बंदोबस्त

केला होता. कारण कीं, जें मनुष्य देवीच्या माणसाजवळ जात असेल, त्याच्यावर देखील दुसऱ्या माणसाची सावली पडूं देत नाहींत. व त्या रामपात्रांत पाय बुडविल्यावर सावलीबद्दल दोष नाहीं.

विटाळशीची व व्यभिचारिणी स्त्रीची छाया त्या देवीच्या मुला-वर पडूं देत नाहींत. व न्हालेल्या मनुष्याचीही सावली पडूं देत नाहींत. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

त्याच्या घरांतील सर्व माणसें लिंबाचा टाळा जवळ ठेवितात: कारण कीं, कोणा अपवित्र माणसांची छाया त्यावर पडूं नये. असा बंदोबस्त केला होता. तरी तो रोग दिवसें दिवस वाढत गेला तेव्हां चांगल्या शिकलेल्या ब्राह्मणाजवळ शितळा देवी स्तो-त्राचा पाठ करविला. तें स्तोत्र रुद्रयामल ग्रंथांत आहे. व त्यांत शितळादेवीचें वर्णन केलें आहे कीं, देवीचें वाहन गाढवाचें आहे. वेष नंगा आहे. अर्धें सूप डोक्यावर घेतलें आहे. एका हातांत चिवळ व दुसऱ्या हातांत केरसुणी आहे. असें वर्णन करून पुनः लिहिलें आहे कीं,—हे महादेवी, तूं जगमाता आहेस, ब्रह्मा, विष्णु महादेव व इंद्रादिक देव तुझी निरंतर पूजा करितात. यास्तव तुझी प्रार्थना करितों कीं, या बालकास तूं सुख दे.

असा पाठ ब्राह्मणाजवळ करविला. देवीस प्रसन्न करण्याकरितां गाढवास गवत चारलें. गव्हांचा कोंडा खावविला. तरी रोग जास्त

वाढला. तेव्हां नवस केला कीं, या मुलीस बेचरजीच्या दर्शनास घेऊन जाईन. तेथें २५ ब्राह्मणांस जेवण घालीन.

आणखी तिच्या आईनें नवस केला कीं, बळीया देवींची पूजा करीपर्यंत मी आंगांत चोळी घालणार नाहीं. डोकीवर पेटती शेगडी घेऊन तोंडांत पायांतील जुना जोडा धरून तेथें जाईन आणि रुप्याचें नाणें, कागदाचा ताव १, दीड पावशेर साखर व द्राक्षें इत्यादि थंडाईच्या पुड्या व नवा घडा थंड पाण्यानें भरून घेऊन जाईन !

तिच्या बापानें नवस केला कीं, देवीचें दर्शन करविण्यापूर्वी मी डोकीस पागोटी बांधणार नाहीं. बळीया देवीच्या जागीं एक क्षेत्रपाळ राहतो तेथून गडबडां लोळत जाईन. तेव्हां बायको ह्मणाली—तुमच्या शरीरास सुख नाहीं. यासाठीं नजीक जाऊन गडबडां लोळण्याचें करा. त्यावर तो ह्मणाला—माझी मुलगी बरी होईल तर एवढें दुःख भोगीन.

नंतर कित्येक बायकांनीं नवस केला कीं, आह्मी नागव्या होऊन लिंबाचे टाळे नेसून बळीया देवीस जाऊं. अशाप्रकारें पुष्कळ देवांस नवस केले, परंतु त्या मुलीस कांहींच सुख वाटेना. तेव्हां तिचीं आईबापें रडूं लागलीं. त्यावेळीं पाहण्यास येणारीं माणसें त्यांस धीर देऊन रडूं नका ‘ बळीया बळीया ’ असें स्मरण करा.

तेव्हां तिची आई ह्मणाली—मरुं दे. तुमचा बळिया ! माझा दुस्मान ! दुष्टा ! माझ्या मुलीचा जीव घेण्याकरितां आला आहे. असें ऐकून दुसरीं माणसें ह्मणालीं—बाई, असें बोलूं नये. जसा एखादा राजा, कारभाऱ्यापासून दंड घेण्यासाठीं त्यास त्रास देतो, तसा बळीया मानतेसाठीं असे प्रकार दाखवितो. ह्मणून त्यास शिव्या देऊं नयेत.

आपल्या घरच्या मुलानें जाणून किंवा न जाणून बळीयाची मस्करी केली असेल तर त्यासाठीं त्याची प्रार्थना करावी. बळीयाच्या विनंतीचीं वचनें सांगितलीं तीं लिहितां मला लाज वाटते कीं, हे बळीया आह्मीं कोण्या दिवशीं जाणून तुझी मस्करी केली असेल तर तूं क्षमा कर, आह्मीं चुकलों. झक मारली ! तुझा ÷ खाल्ला ! आतां आमच्या मुलीस सुख दे.

असें करूनही ती मुलगी मेली. तेव्हां बळीयास पुष्कळ शिव्या देऊन हाय दुष्टा ! हाय घातक्या ! असें बोलून ऊर बडवून घेतला व बळीयाच्या नांवानें सर्व माणसें रडलीं. पुढें एक महिना लोटल्यावर त्याच्या मुलास देवी निघाल्या. तेव्हां याचप्रमाणें नवस केल्यावर, तो मुलगा चांगला होऊन जीवंत राहिला. तेव्हां जे जे नवस केले होते ते सर्व फेडले.

अशा प्रकारें गुजराथेंत कोणी मनुष्य आजारी झाल्यास किंवा मुलगा होण्यास, धन, व बायको मिळण्यास देवीस नवस करितात.

त्यामुळें एखादेवेळीं काम होणार असल्यास होतें, त्यावरून देवावर माणसाचा विश्वास बसतो. आणि कदाचित् तें काम न झालें, तर त्या देवास शिव्या देतात. ही मूर्खपणाची समजूत आहे. आतां हनुमन्नाटकाची एक गोष्ट लिहितों.

---

## प्रकरण ५० वें.

—०—

### हनुमन्नाटकाची गोष्ट.

एका गांवांत बहुरुप्यानीं नाटक केलें. त्यांत हनुमानाचें सोंग, काढलें होतें, त्यावेळीं एका माणसानें नवस केला कीं. हे हनुमान् तूं मला १०० रुपये देशील तर मी तुझ्यावर एक तेलाचा घडा भरून चढवीन.

तेव्हां हनुमान ह्मणाला कीं, जर तुला मी १०० रुपये देईन तर तूं माझ्यावर एक घडा तेल चढविशील ? तर मीच १०० रुपयांचें तेल घेऊन एक भांड्यांत भरून ठेवून त्यांतच बुडी नाहीं मारणार ?

नंतर दुसऱ्या माणसानें नवस केला कीं, हे हनुमान् ! तूं मला बायको मिळवून दे, तर मी तुझी चांगल्याप्रकारें सेवा करीन. तेव्हां, हनुमानानें सांगितलें—तुला बायको देण्यास माझेजवळ असेल तर मीच बायको शिवाय कां राहीन ?

अशा पुष्कळ नकला त्या नाटकवाल्यांनीं केल्या होत्या. यावरून विचार करावा कीं, नवस केल्यानें जर जीव जगता, तर श्रीमंत व राजे लोक मरतेच ना ? व कांहीं राजांचा वंशही बुडाला नसता.

यासाठीं कोणी देवावर भार ठेवून दुःख मानूं नये. देवाची मनोभावें पूजा करावी हें उत्तम. आणि जर मंत्रानें शत्रु मेले असते, तर कोणी शिपाई लोकांस चाकर ठेविलें नसतें.

आतां एक मोठा विचार करा कीं, सांप्रतकालीं जर कोणी मनुष्य सरकारांत जाऊन फिर्याद करील कीं, माझ्या आप्तास कोणी विष घालून ठार मारलें. तर सरकार त्याचा तपास लगेच करील. पण जर कोणी अशी फिर्याद केली कीं, अमक्यानें मूठ मारली अथवा प्रयोग केला, त्यानें आप्त मेला; तर ती गोष्ट सरकार ऐकणार नाहीं. व उलट त्या फिर्याद करणाराची मस्करी होईल.

ज्या देशांत इंग्रज सरकारचें राज्य आहे, त्या देशांत मंत्रांच्या गोष्टी खऱ्या झाल्या नाहींत, त्यावरून अशा फिर्यादी ऐकत नाहींत. असें जाणावें. या दुनयेंत जितक्या कला व शास्त्रें आहेत, त्यांचा तपास करण्यासाठीं साहेब लोक पुष्कळ पैसा खर्च करितात. जर मंत्र शास्त्रांच्या गोष्टी खऱ्या होत्या, तर त्या लोकांनीं कां मानल्या नसत्या ?

शोधक पुरुषांनीं कित्येक वेळां जादुविद्या खरी करणारास इनाम देण्याचें ठरविलें होतें; पण कोणीही खरी करून दाखविली नाहीं- त्यावरून समजावें कीं, या गोष्टी खोट्या आहेत. आतां अस्सल पुष्कळ भूतें होतीं त्यांची गोष्ट लिहितों.

## प्रकरण ५१ वें.

—०—

### अस्सल भूतांविषयीं गोष्ट.

संवत् १८६९ सालापूर्वी, भूतांचा भ्रम सांप्रतकालापेक्षां शंभर पटीनें जास्त होता. असें जुन्या माणसांच्या सांगण्यावरून समजतें. त्याचें कारण असें वाटतें कीं, त्यावेळचीं माणसें आजकालच्या माणसांपेक्षां भोळीं होतीं. कशावरून कीं, बुद्धि वाढण्याचीं कारणें नीतिशास्त्रांत पांच लिहिलीं आहेत. १ देशपर्याटन, २ पंडितमैत्री ३ चांगली स्त्री वरणें ४ राजसभेंत जाणें. ५ आणि पुष्कळ शास्त्रें वांचणें.

हे पांच प्रकार बुद्धि वाढण्याचे आहेत, ते त्यासमयीं बंद होते. कारण कीं लुटणाऱ्या चोरांच्या भीतीनें परदेशीं जाणें येणें फार कठिण होतें. कोणी मनुष्य काशीस जाऊन आल्यास, त्यास पाहण्यास त्या गांवांतील लोक जात असत. त्यांस मोठें आश्चर्य वाटत असे.

कलकत्ता शहर येथून स्वर्गी इतकें लांब आहे. कारण कीं, तें येथून किती कोस असेल ? तें कोणी जाणत नाहीं.

पंडितांबरोबर मित्रपणाही पुष्कळ माणसें करीत नाहींत कारण कीं, आज कित्येक गांवांत ही पूर्वींची चाल अजून आहे. एखादा व्यापाऱ्याचा मुलगा पंडित ब्राह्मणाची सोबत करून, कांहीं गणित विद्या शिकत असेल, तर तें पाहून त्याचा बाप सांगतो कीं, तुला त्रैराशिक, घनमूळ हीं गणितें शिकून कोणाचीं वर्षफळें, जन्मपात्रिका टिपणें वर्तवून मागून खावयाचें आहे ?

ही विद्या आपणास शिकणें योग्य नाहीं. व्यापारी होऊन अशी विद्या शिकतो त्याला खावयास अन्न राहत नाहीं. असे आह्मीं पुष्कळ पाहिले आहेत. यास्तव आपल्यास कानामात्रा शिकण्याचें कारण नाहीं. व गणितविद्याही शिकणें योग्य नाहीं. आपण सोळा अंक व कका शिकावें. नंतर तूप व गुळ मापण्याचीं कोष्टकें आपलें काम चालेल इतकीं शिकावीं आणि दुकानावर बसावें, अक्षर चांगलें काढावें, व्यापार शिकावा व व्यापारी लोकांची संगत करावी.

नंतर त्या व्यापाऱ्याचा मुलगा एखाद्या पंडिताच्या संगतीनें गुप्त रीतीनें चांगलें शिक्षण शिकला आणि विक्रमचरित्रासारख्या गोष्टी गुप्त रीतीनें वाचूं लागला, व तें त्याच्या बापास कळलें तर

तो मुलग्यास ठपका देई. अशी त्यावेळची चाल सांप्रतही कोठें कोठें आहे.

त्यावेळीं हुशार बायका तर नव्हत्याच. कारण कीं, बायकांस विद्यादि गुण शिकविण्याची हिंदुस्थानांत मनाई होती. जर एखादी बाई लिहिणें शिकत असेल तर दुसरी बाई तिला सांगते कीं, तूं लिहिणें वाचणें शिकूं नको. कारण कीं, जी विद्या शिकते तिचीं मुलें वांचत नाहींत. यास्तव विधवेनें शिकावें पण जिला मुलें असतील अशा विधवेनें शिकणें योग्य नाहीं.

आणखी लोक समजतात कीं, ज्या बायका शिकतात त्या भ्रष्ट होतात. आणि सांप्रत माझ्या पाहण्यातही असें पुष्कळ आलें आहे कीं, श्रीमंत लोकांच्या बायका शिकलेल्या आहेत, त्या भ्रष्ट पुरुषांनीं लिहिलेले कागद व दोहरे वाचतात. व कोकशास्त्रादि पुस्तकें वाचून वाईट वर्त्तनानें चालतात.

नीतिशास्त्र जाणणारांचा अभिप्राय असा आहे कीं, मनुष्यास जशी संगत लागेल, तशी बुद्धि होते. पुरुषास आपल्या बायकोची संगत पुष्कळ असते. यास्तव चांगली हुशार बायको असेल, तर तें चतुराईचें मूळ होय.

राजसभेंत स्वार्थाशिवाय कोणी जात नाहीं. आणि गेल्यानें चातुर्याच्या लाभासारखें होत नाहीं. कारण कीं, त्या सभा तशाच

प्रकारच्या होत्या; त्यांची रीत लिहिली असतां बाध येणार नाहीं.

शास्त्रें भिक्षुक लोकांशिवाय दुसरे कोणी वाचित नाहींत, अशी चाल होती. त्यामुळें त्यावेळचीं माणसें भोळीं होतीं, असें समजतें. व भूतेंही याच कारणानें पुष्कळ होतीं. तीं अशीं कीं, पुष्कळ ठिकाणीं भूतांच्या स्वाऱ्या निघत असत, व नाटकें होत असत. आणि सांप्रत कालींही कित्येक ठिकाणीं भुतांच्या स्वाऱ्या व नाटकें भोळ्या लोकांच्या पाहण्यांत येत असतील, त्यामुळें अशा गोष्टी सांगतात.

मी ऐकिलें आहे कीं, दुधेश्वराच्याजवळ दर्याखान पीराची स्वारी एखादेसमयीं बहुतकरून शुक्रवारीं निघते.

प्राचीनकालीं भुतांच्या मोठमोठ्या गोष्टी चालत असत. त्या अशा कीं, मारवाडांत नागर परगण्यांत सोमण नांवाचा गांव आहे, तेथील गोयब सुबा नांवाचा एक ठाकूर होता. तो मरून भूत होऊन, आपल्या बायकोजवळ रात्रीच्या वेळीं नेहमीं येत असे. त्यामुळें तिला चार मुलगे झाले होते. त्या भुताची गोष्ट त्या परगण्यांत बारा वर्षेंपर्यंत चालत होती.

त्यावेळीं नागोरचा राजा वखतसंघजी होता. त्यानें त्या गोष्टीचा तपास करण्यासाठीं भगवंतीदास नांवाचा ब्राह्मणास तिकडे पाठ-

विलें. त्यानें फार मेहनतीनें त्या भुतास पकडलें. त्यावेळीं समजण्यांत आलें कीं, तो मनुष्य शेजारच्या गांवाचा धनी होता, त्याच्याबरोबर ती बाई भ्रष्ट चालीनें चालत होती. पण त्यावेळचे लोक अशा भुतांच्या गोष्टी खऱ्या मानीत होते. ह्मणून असा प्रकार चालला होता. नंतर दिवसेंदिवस भूतें कमी होत गेलीं त्याचें कारण लिहितों.

---

## प्रकरण ५२ वें.

### भूतें कमी होण्याचें कारण.

सांप्रतकालीं इंग्रज सरकारानें जगावर मेहरबानी करून, विद्या शिकण्याच्या शाळा स्थापून अनेक प्रकारच्या विद्या वाढविल्या. देशोदेशींच्या चालीचे ग्रंथ व नकाशे प्रगट केले; त्यांवरून लोकांस देशोदेशींच्या रीति कळून आल्या.

कित्येक बीज लीलावती आदिक संस्कृत ग्रंथ होते. ते पांच वर्षेपर्यंत मेहनत करून, व्याकरण व अमरकोश शिकल्यावर, तो ग्रंथ समजविण्यांत येत होता. तसा फार कठीण ग्रंथ देशोदेशींच्या भाषांत प्रगट करून लहान मुलांस समजेल असा सुलभ केला.

फारशी, मराठी इत्यादि ग्रंथ होते, ते गुजराथी भाषेंत करून चालविले व दक्षिणेंत मराठी भाषेंत प्रगट केले. त्यामुळें माणसांची बुद्धि वृद्धिंगत होऊन, भूतादिकांबद्दलचा भ्रम कमी झाला.

कित्येक अज्ञानी लोक बोलतात कीं, इंग्रज सरकारच्या वाद्यांच्या आवाजानें भूतें पळून जातात; त्याचें कारण असें कीं, वाद्यांस गाईचें चामडें आहे. त्याच्या आवाजानें हिंदु लोकांचे देव पळून गेले. व दुसऱ्या बाजूस डुकराचें चामडें आहे, त्याच्या आवाजानें मुसलमानाचे देव पळाले, त्यामुळेंच भूतें कमी झालीं व मंत्रतंत्रादिक खोटीं पडलीं.

आणखी ऐकण्यांत येतें कीं, पूर्वीं अशी चाल होती कीं, ज्याच्या घरांत पूर्वज असेल, त्या माणसास लोक भीत होते, आपण त्याच्या बरोबर भांडलों तर त्याचा पूर्वज देव आपल्यास दुःख देईल. असा त्याचा पूर्वज देव कडक आहे. असें सर्व समजत असत. त्यामुळेंच घरोघर भूतें होतीं.

ज्याच्या घरीं भूत असेल, त्याची मोठी भीति धरीत असत. नंतर अशी चाल पडली कीं, नीच मनुष्य असेल तर तें मरून भूत होतें आणि चांगलें मनुष्य मरून स्वर्गांत जातें. असें समजून खेळणारांस त्याच्या तोंडावर शिव्या देऊन ह्मणतात कीं, तुझा

बाप नीच मनुष्य होता ह्मणूनच भूत झाला; असें ऐकूनच त्या मनुष्यास शरम वाटे.

कोणी ह्मणतो कीं, अमूक मनुष्य भूत झाला, त्याला मी आज पाहिला. असें ऐकून त्या मरणाराचा आप्त त्याच्याबरोबर भांडूं लागतो आणि ह्मणतो कीं, तो चांगल्या चालीचा व धार्मिक मनुष्य होता, तो स्वर्गांत गेला आहे, हा आमचा आप्त भूत होईल असें त्याचें वर्त्तन नव्हतें. असें त्याविषयीं खोटें बोलाल तर तुमचें आमचें भांडण होईल. हा आमचा आप्त भूत झाला असें ह्मणतां ? तर तो आमच्या दृष्टीस नाहीं पडणार ? तुमच्या दृष्टीस काय ह्मणून पडेल ? त्याला आह्मीं कधीं भूत झालेला पाहिला नाहीं. आणि तुह्मांस तो कोठून दिसला ? तुमचाच कोणी आप्त भूत झालें असेल ? व तो तुमच्या दृष्टीस पडला असेल ?

अशाप्रकारें भूत व डाकिणीच्या मिषानें एखाद्याचें नांव घेऊन मनुष्य खेळल्यास, त्याच्या आप्तांबरोबर भांडण होतें. या चालीनें भूतांचा भ्रम कमी होत आला आहे. कित्येक माणसें असें मानतात कीं, पृथ्वीवर चाळीस वर्षांपूर्वीं पुष्कळ भूतें होतीं. पण कोणी ईश्वरी महापुरुषानें अवतार घेऊन, त्या सर्व भूतांस चांगली गती दिली.

सांप्रतकाळींही कित्येक अज्ञानी लोक, आपल्या घरांतील मनुष्य मरून भूत झालें असेल, अशा समजूतीनें भूतांच्या गोष्टी प्रसिद्ध

करितात. त्यांत कांहीं शंका धरित नाहींत व भ्रमाच्या गोष्टी खऱ्या मानतात.

संवत १८९९ माघ शुद्ध ५ च्या दिवशीं एक मोठा योग घडेल अशी गप्प चालली होती. त्याविषयीं सहा महिन्यापूर्वी असें प्रसिद्ध केलें होतें कीं, काशीहून एक पत्रिका लिहून आली आहे तींत "येत्या वसंत पंचमीस धरणीकंप होऊन, सर्व घरें पडतील, व माणसें मरतील, त्यांतील कित्येक जीवंत राहतील. या गोष्टी कोणी खोट्या मानूं नये असें लिहिलें होतें."

त्यावरून पुष्कळ लोक आपण आतां मरणार असें नक्की समजून बसले होते. त्याच दिवशीं जर कांहीं प्रचंड वायु सुटता किंवा दुसरा कांहीं प्रकार घडता तर कित्येकांचीं काळजें फाटून गेलीं असतीं.

आतां कित्येक इष्टकार्य सिद्धी प्रित्यर्थ हंसण्यासारखे तोडगे माझ्या पाहण्यांतले व ऐकलेले पुढें लिहितों.

## प्रकरण ५३ वें.

—०—

### इष्ट कार्य सिद्धीसाठीं कित्येक तोडगे.

१ रविवारीं अथवा मंगळवारीं रात्रीं घुबड बोलत असेल, त्यावेळीं नग्न होऊन, सात तागाच्या दोऱ्यांस सात गांठी प्रत्येक

शब्दास एकेक द्यावी. नंतर कोणास ताप येत असेल, त्याच्या हातांत तो दोरा बांधला असतां, त्याचा ताप जातो. असें कित्येक लोक करितात.

२ ज्या स्त्रीस न्हाण येत नसेल किंवा मुलें होत नसतील तिनें दुसऱ्या ज्या बाईस मुलें होत असतील किंवा जी बाई गरवार असेल तिच्या नेसावयाच्या लुगड्याचा पदर फाडून न्यावा ह्मणजे पदर फाडणारणीला न्हाण येईल किंवा मुलें होतील.

मुलें होत नसणाऱ्या बायका अशीं कामें चोरून करितात. पण तसें करतांना पाहण्यांत आल्यास मोठें भांडण होतें. व कोणी पदर फाडून नेईल त्यासाठीं त्या बायकोवर चांगली नजर ठेवतात.

३ तसेंच रविवारीं अथवा मंगळवारीं कोणाच्या मुलास बिब्याचा डाग दिल्यास, त्या डाग देणारणीस मूल होत नसल्यास, मूल होतें. यासाठीं कित्येक बायका वांझ असतात, त्या अशीं कामें करितात. अमूक बाईनें डाग दिला हें मूल सांगेल ह्मणून बोलावयास येत नसेल, अशा लहान मुलास बहुतकरून डाग देतात. कारण कीं, ती डाग देणारी कोणाच्या समजण्यांत येऊं नये.

४. ज्या बायकांचीं मुलें वांचत नाहींत, त्या बुडालेल्या गलबताच्या खिळ्याचें कडें करून, उजव्या पायांत घालतात. त्याला गोझारूं कडें असें ह्मणतात. त्यानंतर मूल जगलें तरी ती बायको तें कडें जन्मभर काढीत नाहीं. आणि तिला जर मुलगा झाला

तर त्या मुलाचें नाक टोंचतात किंवा कोणी हातांत बांगड्या घालितात, कारण कीं, मुलगी समजून ' देव ' जीवंत ठेवील व त्याचें नांव बहुतकरून नथु असें ठेवितात, किंवा अपवित्र अशीं नांवें ( घेला, गांडा, कचरो, बोधो, वाबो, उको अशीं ) ठेवितात. कारण अपवित्र जाणून ' देव ' घेऊन जाणार नाहीं.

नाक टोंचून त्यांत बाळी घातली असल्यास, लग्नाचे वेळीं लेण उतरतेवेळीं सासु काढून घेते. कदाचित् लग्न न झाल्यास बारा वर्षांचा होतांच, आपल्याच हातानें काढून टाकतो.

आणखी कित्येक प्रकारचे नवस करितात कीं, हें मूल जगल्यास त्याचे डोईचे केंस अमूक देवाचे जागीं नेऊन उतरवूं. यावरून या मुलाचें डोकें त्या देवास देऊं असें होईल. कित्येक नवस करितात कीं, या मुलास पंधरा वर्षेपर्यंत आमच्या घरांतील कपडा घालणार नाहीं. कारण, लोक असें समजतात कीं, आपल्या घरांतील कपडे जितके वापरण्याचे त्याच्या कर्मांत लिहिलें असेल, तितकेच वापरून मरतो. ह्मणून आपल्या घरांतील कपडे अंगावर घालावयाचे नाहींत. ह्मणजे जीवंत राहील.

अशा रीतीचे देवास भुलविण्याचे पुष्कळ उपाय करितात. ते पाहूनच व ऐकून माझ्या मनाची स्थिति हंसण्यासारखी होते. हे मूर्ख लोक असा विचार करीत नाहींत कीं, कित्येक पुरुष जन्मपर्यंत बायकांचा वेष घेतात, कित्येक गोसाव्यांच्या बायका पुरुषांचा

वेष घेतात, कित्येक माणसें कपडा आंगावर घेतच नाहींत, तीं वनांत राहतात. पण जेथें राहतात, तेथून शोधून दैव त्याचा जीव घेतें. व घेला व कचरो अशा नांवाच्या माणसांचा जीवही नेतें. तर मग नांव घेला किंवा कचरा असलें तरी दैव कसा जीवंत ठेवील ? दैवाची दृष्टी सर्व ठिकाणीं फिरत असते. त्यामुळें कोणी १५० वर्षे वयाचा मनुष्य कोठें पाहण्यांत येत नाहीं.

गिरनार पर्वतावर एक अघोरी बावा ५०० वर्षांच्या वयाचा आहे, अशा गप्पा मी पुष्कळ ऐकल्या आहेत. परंतु स्वतः पाहिल्याशिवाय अशा गोष्टी मी खऱ्या मानीत नाहीं.

आतां भुतांच्या अस्तित्वाचें कारण लिहितों.

## प्रकरण ५४ वें.

—०—

### भूतांच्या अस्तित्वाचें कारण.

या पुस्तकांत कित्येक ठिकाणीं शास्त्राच्या विरुद्ध गोष्टी लिहिल्या गेल्या असतील, त्यासाठीं पंडित लोकांनीं क्षमा करावी, ह्मणून आतां भूतांच्या प्रमाणाची गोष्ट लिहितों.

‘ भूत कोठेंही नाहीं ’ असें ह्मणावें. तर हिंदु शास्त्राच्या उलट होतें. ख्रिस्ती शास्त्रांत लिहिलें आहे कीं, ज्यावेळीं येशूजवळ भुतें

आली, तेव्हां त्यांतील भुतानें येशूस ह्मटलें—' मी तुह्मांस ओळखितों, तुह्मीं परमेश्वराचे पुत्र आहांत, ह्मणून मी तुह्मांस भितों.' नंतर त्या भुतास त्याच्या शरीरांतून काढलें. यास्तव भुतें खोटीं ह्मणावीं तर खिस्ती शास्त्रही खोटें होतें.

मुसलमानी शास्त्रांत भुतास सैतान ह्मणतात. ह्मणून तेंही शास्त्र खोटें होईल. सवत्र भुतांची गोष्ट खरी असेल तर असेल, पण सांप्रतकालीं भुतांच्या दहा गोष्टी एकत्र केल्या, तर त्यांत एखादी गोष्ट खरी असेल, असें अनुमानावरून व शास्त्रांच्या आधारावरून मी लिहितों. पण माझ्या पाहण्यांत खरी गोष्ट आजपर्यंत आलेली नाहीं.

या वर्षांत कार्तिक महिन्यांत अमदाबाद शहरांत एका ब्राह्मणाचा एक वर्षाचा मुलगा भुतानें विहिरींत टाकला. अशा गोष्टी पुष्कळ ऐकल्या आहेत, पण जेव्हां माझ्या समक्ष भूत मुलास विहिरींत टाकील, तेव्हां माझ्या मानण्यांत येईल, ऐकलेली गोष्ट खरी असली तरी ती मी मानींत नाहीं.

हिंदुशास्त्रांत भुतांच्या गोष्टी विस्तारपूर्वक लिहिल्या आहेत. त्यांचा अभिप्राय असा दिसतो कीं, जीं माणसें पवित्रपणें राहणार नाहींत व खोटें बोलणें इत्यादि पापें करतील, तीं मरून भूतें होतील व पुष्कळ दुःखें भोगतील. ह्मणून पवित्रपणानें राहावें, पाप करूं नये.

दुष्ट वर्त्तन करणाऱ्याच्या शरीरांत भूत शिरून दुःख देईल, त्यासाठीं चांगलें वर्त्तन ठेवावें. असा शास्त्रकारांचा अभिप्राय दिसतो. पण त्यावरून लोकांस भ्रम उत्पन्न होऊन फार दुःख होतें. यास्तव माझा अभिप्राय असा आहे कीं, लोकांच्या मनांतील भुतांचा भ्रम जावा व ह्मण आहे कीं, "मनसा भूत" ( मनांची कल्पना भूत ) आणि शंका ( भीति ) डाकिण" याचा अर्थ बरोबर समजेल, तर बिचारे भोळे लोक हैराण होणार नाहींत.

यासाठीं कांहीं कमजास्त गोष्टी विस्तारानें लिहिल्या गेल्या असल्यास त्या वाचून पंडित लोकांनीं क्षमा करावी.

आतां या चौथ्या विभागाचा सारांश असा आहे कीं, गुजराथ वर्नाक्युलर मंडळीनें ठरविलें आहे कीं, गुजराथेंतील 'भुतांचा व इतर वहीमांचा सविस्तर इतिहास लिहावा. त्यावरून मी विचार करून, जसा भुतांचा वहीम आहे तसे गुजराथेंत दुसरेही अनेक वहीम आहेत, ते जितके ऐकिले, तितक्यांची माहिती या विभागांत दिली आहे.

ती वाचून लोकांनीं समजावें कीं, मंत्र तंत्र, किंवा किमया इत्यादिकांच्या भ्रमानें कोणत्याही वेळीं फसूं नये. व इंद्रजालासारख्या खेळांच्या गोष्टी जाणणें असतील, तर विलायतेंतील ब्रयुस्टर साहेबानें एक पुस्तक लिहिलें आहे, त्याचें नांव ( न्यॉचरल

म्यॉजीक ) Natural Magie " स्वाभाविक इंद्रजाल " असें आहे. तें सन १८३४ सांत लंडन येथें छापविलें आहे, तें वाचावें. किंवा रसायन शास्त्राची पुस्तकें वाचावीं ह्मणजे समजेल. त्या ग्रंथांतील गोष्टी या पुस्तकांत लिहिण्याची जरूर नाहीं. कारण कीं, यांत फक्त गुजराथेंतील वहिमांच्या गोष्टी लिहिणें जरूर आहे. त्या लिहिल्या आहेत.

---

## प्रकरण ५५ वें.

—o—

### ग्रंथाचा सारांश.

या संपूर्ण ग्रंथाचा सारांश असा आहे कीं, एक तर जेणेंकरून गुजराथेंत भुतांचा भ्रम उत्पन्न होतो. अशा पूर्वापार भुतांच्या गोष्टी चालतात. त्या, व शास्त्रांत ज्या भुतांच्या कल्पना लिहिल्या आहेत, त्यांचा हेतु नीट लक्षांत घ्यावा. आणि पुढें लिहिल्याप्रमाणें असें जाणावें कीं, भूतें देव जाती आहेत. त्यांच्यांत माणसांपेक्षां बळ व पराक्रम जास्त आहे. यास्तव मनुष्यास पाहून तीं भूतें पळून जातील किंवा लपतील असें नाहीं.

कित्येक भोळ्या माणसांच्या शरीरांत शिरतात व समंजस माणसांच्या शरीरांत शिरूं शकत नाहींत. अशी भूतांची रीति नाहीं. शास्त्रांत लिहिलें आहे कीं, पवित्र मनुष्याच्या शरीरांत भूत शिरूं

शकत नाहीं. तेव्हां हिंदु शास्त्राच्या अभिप्रायांत मुसलमान लोकां- पेक्षां अपवित्र कोणी नाहीं. तेव्हां हिंदु भुतांची परीक्षा करतेवेळीं ह्मणावें कीं तूं एखाद्या समंजस मुसलमानास आह्मीं दाखवूं त्याच्या शरीरांत शिरून बोल.

तसेंच मुसलमान भुतास ह्मणावें कीं, हिंदु मनुष्य आह्मीं दा- खवूं त्याच्या शरीरांत शिरून बोल. आणखी ह्मणावें कीं, जसें पाटणच्या राजाच्या सांगण्यावरून एक लांकूड आणलें होतें. तसें एक मोठें लांकूड उचलून आण. व आह्मांस दिसेल असें उभें कर. अथवा करणवाघेला बरोबर भूत लढत होतें; तशी तूं प्रत्यक्ष आमच्या बरोबर लढाई कर. अशा रीतीनें खऱ्या गोष्टीप्रमाणें परीक्षा घेतल्यानें तें भूत खरें आहे किंवा गप्प आहे तें लगेच समजण्यांत येईल.

दुसरें, कोणाची सावली किंवा जनावर, कोनांतील आंधारांत भुताचा आकार दिसणें, किंवा असेंच कांहीं पाहण्यांत येईल तर त्याचा शोध केल्याशिवाय हें भूतच असें मानूं नये.

तिसरें एखाद्या भोळ्या माणसांस भुतानें पछाडलें असल्यास तें काढण्यासाठीं तिसऱ्या विभागांत उपाय लिहिले आहेत, त्यांतील ज्या उपायांनीं त्या मनुष्यास विश्वास येईल कीं, ‘ आतां माझ्या शरीरांतील भूत गेलें. ’ तो उपाय करावा. त्यांत साधल्यास एक

खरा उपाय आहे तो हा कीं, चाबूक घेऊन मारावें, अथवा नकळत डाग द्यावा ह्मणजे भूत पळून जाईल.

एखाद्या समंजस माणसाचा भुतांबद्दलचा भ्रम काढण्याचा उपाय हा आहे कीं, अशा प्रकारचे ग्रंथ वाचावे व विचार करावा. विद्येचा अभ्यास करून, आपल्या बुद्धीनें मनांत शोध करावा.

विलायतेंत सरवालट्रस्कॉट यांनीं तयार केलेलें पुस्तक आहे. त्याचें नांव ' वुईचरॅफ्ट अॅन्ड डेमोनालोजी ' Witchcraft and demonology

ह्मणजे डाकिणी संबंधीं आणि भूत प्रेतांसंबंधीं गोष्टी. तें पुस्तक सन १८३१ मध्यें लंडन शहरांत दुसऱ्या वेळीं छापिलें आहे.

विलायतेंत देखील अज्ञानपणामुळें भुतांचा भ्रम पुष्कळ होता. त्याबद्दलचे दाखले त्यांत लिहिले आहेत; ते वाचावे. हेच भ्रम मिटविण्याचे उपाय आहेत.


अशा रीतीचे भ्रम व मंत्रतंत्रांच्या गोष्टी इत्यादिकांचा शोध चांगल्या रीतीनें करावा. गप्पांच्या गोष्टींवर विश्वास ठेवूं नये. भूत, मूठ, यांची भीति सोडून देऊन, परमेश्वराची [illegible] मनांत ठेवून, खोटें बोलणें इत्यादि पाप करूं नये. [illegible]वी सेवा करावी. कपटी व दुष्ट वर्तन करणारांची संगत धरूं नये. एखाद्या ढोंगी मनुष्यापासून फसूं नये. असा या [illegible]र्ग ग्रंथाचा सारांश आहे.

आहीरनाम्यांत ४ कलमें आहेत. त्यांचा तपास करावा. अशा प्रकारच्या मंडळीच्या ठरावावरून, माझ्या देशी मित्रांच्या सुखाकरितां हा ग्रंथ मी माझ्या सद्गुरुच्या प्रतापानें लिहिला आहे.

इति श्री कविदलपतराम विरचिते भाषागद्यग्रंथे भूतादिक भ्रमभंजन ग्रंथे भूतभ्रमादिक वार्त्ता विस्तारवर्णनम् नाम चतुर्थ विभाग समाप्तोऽयं ग्रंथा ॥ ४ ॥


चवथा विभाग समाप्त.

नंबर १ ला.





नंबर २ रा.


بسم اللہ الرحمن الرحیم ایک بیوں دو فرمان انہو محمد لو
کہان شاہ سمعان پیر بہانندہ ایک کالا اسمی جوہو
بیجہبری یا دہائی طلا طیلی گشت بندہ میں بیجرا کرسہ تورہ
تور ہار جامہ مسجد احمد کبیر ستر سکہ بلا ایک سو
کا دہنی زنجیر باجرہ ملو احمد ہیبوت بلانو سعود ابکی
سا کنی ماسرہ تجنی کا الہ الا اللہ محمد الرسول اللہ




नंबर ४ था.




## नंबर ५ वा.



घंटाकर्णोमहावी
र देवदत्तस्यस
र्वोपद्रवक्षयकुरु
कुरुस्वाहा:



## नंबर ६ वा.



ॐ घंटाकर्णो महावीरः सर्वव्याधि विनाशकः
पित्तकफोद्भवाः
तत्रराजभयं
१
नाकाले मरणं तस्य न च सर्पेण
दंश्यते अग्निचौरभय नास्ति ह्रीँ
घंटाकर्ण नमोस्तु ते ठः ठः ठः स्वाहाः

## नंबर ७ वा.

| | | |
|---|---|---|
| ८ | १ | ६ |
| ३ | ५ | ७ |
| ४ | ९ | २ |



## नंबर ८ वा.



॥ सवाई ॥

सत्यपुनी दलपत कहे लखी, स्नेह न विश्व करे सब कोई ॥
चंदकी जौन्ह न चाहत चोर, चकोर न चाहत चंद बिछोई ॥
पंथ लखी बहु ग्रंथनको, यह ग्रंथ रच्यो, जन देखहि दोई ॥
पंडित पावहि प्रेम अखंडित, खंडित प्रेम अपंडित होई ॥ १ ॥

॥ दोहरा ॥

बे हजारमां बाकि छे चोराणुं चित आण ॥
विक्रम * वर्षे विरचियो. पूरण ग्रंथ प्रमाण ॥ १॥

* १९०६

हें पुस्तक त्रि. के. लोंढे, कांदेवाडी कल्याण मोतीची चाळ नंबर २ " विश्वंभर " छापखाना यांत छापिलें–आणि तें प्रो. गोविंद मोरोबा कार्लेकर, पत्ताः–डंकनरोडनजिक दुर्गादेवीच्या शेजारील घर, २४१ मुंबई नं० ४ येथें प्रसिद्ध केलें. शके १८३३ सन १९११

# सुधारून दिढीनें जास्त वाढविलेली चार भागांची नवी आवृत्ति.

## सचित्र शरीरबल विद्या.

( कसरत शाळा व तालिमखाना १२५ चित्राकृतिंसह. )

प्रत्येक मनुष्यानें आपली शरीरसंपत्ती सुधारून शरीरबल वाढविल्याखेरीज कोणताही व्यवहार नीट चालावयाचा नाहीं. प्रो० **राममूर्ती, दोरास्वामी, सँडो** इत्यादि मल्लांच्या आतुल शरीर सामर्थ्याचे अद्भुत प्रयोग पाहून, पुष्कळ लोकांचें लक्ष्य शरीरबल वाढविण्याकडे लागलें आहे, असें पाहून गतवर्षी याचे फक्त २ भाग असलेली आवृत्ति छापिली होती, ती इतकी लोकप्रिय झाली कीं. पांच सहा महिन्यांतच त्या आवृत्तिच्या दोन हजार प्रती संपून पुष्कळ मागण्या येत असल्यामुळें हल्लीं पुढें लिहिल्याप्रमाणें चार भागांची सुधारून दिढीनें वाढविलेली ही नवी आवृत्ति छापिली आहे.

**भाग १ कसरत शाळा**—यांत घरच्या घरीं बिछान्यावर तसेंच खुर्च्या, स्टुलें, शिड्या, काठ्या दोऱ्या व झोंपाळे, यांच्या साह्यानें अनेक तऱ्हेच्या कसरती कशा कराव्या, यांची माहिती ६६ चित्राकृतिंसह दिली आहे.

**भाग २ रा—तालीमखाना**—यांत तालमींतील जोर काढणें, जोड्या फिरविणें, मल्लखांब, व ५२ कुस्त्यांचे डावपेंच व त्यांच्या तोडी कशा कराव्या यांची माहिती ६० चित्राकृतिंसह दिली आहे. वरील दोन्हीं भाग पूर्वींचे असून, पुढील ३ रा व ४ था हे दोन भाग नवीन जास्त या आवृत्तींत घातले आहेत.

**भाग ३ रा**—यांत प्रख्यात युरोपियन मल्ल **प्रो. सँडो** व आधुनिक भीमसेन **प्रो. राममूर्ती** यांचे शरीरबल वाढविण्याविषयींचे स्वानुभविक प्रयोग व क्रिया यांची माहिती दिली आहे.

**भाग ४ था**—यांत धातु, वीर्य व शरीरबल पुष्टिवर्धक असे सुमारें ८० वर औषधी उपाय ( चूर्णें, गोळ्या, मोदक, पाक वगैरे करण्याची माहिती ) दिले आहेत. सारांश प्रत्येक मनुष्यास आपलें शरीरबल वाढविण्यास हें पुस्तक फार उपयोगी आहे. वरील चारी भागांचें एकच पुस्तक बांधलें असून, एकंदर चित्रें १२५ आहेत. पुस्तक डेमी १२ पेजी १६८ पृष्ठांचें असून, जाड पुठ्यानें बांधलें आहे. याची किंमत १॥ रुपया आहे. तरी तूर्त ट. व्ही. पी. खर्चासह फक्त १ रुपया पडेल. पुस्तकें आह्मांकडे मिळतात.

# श्रीसंत संघ

**अक्षरबोध श्रीसंत संघ**—यांत आधुनिक १०३ संतांचे लहान लहान अस्सल फोटो, सात देवता व तीन पदें आहेत किं० ८४ एका व्ही. पी. नें चार प्रती जातात.

**श्रीसंत संघ मालिका**—यांत आधुनिक प्रसिद्ध संतांचे नऊ फोटो आहेत, ८४ एका व्ही. पी. नें चार प्रती जातात.

या शिवाय वाटेल त्यां संतांचे ( जवळ जवळ २०० ) अस्सल फोटो आह्मांकडे मिळतात. माहिती पत्राद्वरें विचारून घ्यावी. आपला पत्ता सुवाच्य असावा.

५५९

पत्ताः—**रामसेवक चित्रालय,**

निक[illegible]